

# आपला भारत २०
# केंद्र शासित प्रदेश

ग्र. ग्रं. सं. ठाणें
वि.
क्र.
REFBK-0021486





आपला भारत २०



## भिन्नतेत या अभिन्न

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ भारती
लक्ष हस्त, लक्ष पाद, हृदय एक भारती ।
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरिहि एक संस्कृती ॥ १ ॥

भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ।
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥ २ ॥

भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न तरी, एक गगन-माती ।
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर संकृती
कमलपुष्प हासते पाकळयांतुनी किती ॥ ३ ॥

राजा मंगळवेढेकर

१५/२/००
२१८५९
भू-प्रवास
५८८०

# केन्द्रशासित प्रदेश

राजा
मंगळवेढेकर

REFBK-0021486

नितीन प्रकाशन
पुणे

अनुक्रम

निसर्गरम्य गोमंतक .... ५
काळेपाणी–अंदमान .... ३०
द्वीपसमूह–लक्षद्वीप .... ४७
मिझोंचा मिझोरम .... ५७
अद्ययावत चंदीगड .... ७९
श्रीअरविंदाची पॉंडिचेरी .... २४
द्वीपसमूह–निकोबार .... ३९
उगवता अरुणाचल .... ५१
राजधानी दिल्ली .... ६८
लोकसाहित्य .... ८३

प्रकाशक
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ
पुणे - ३०

प्रथमावृत्ती
८ सप्टेंबर १९७६

© राजा मंगळवेढेकर

किंमत
पाच रुपये

या पुस्तकास महाराष्ट्र राज्य
कागद वाटप समितीने
पुरविलेला सवलतीच्या दरातील
कागद वापरला आहे.
समितीचे आभार !

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

[library stamp] २९७८६ ५-५४४२४

# निसर्गरम्य गोमंतक

भारताच्या पश्चिमेस कोकणपट्टीमध्ये सृष्टीसौंदर्याने नटलेला गोमंतक वसलेला आहे. गोव्याची निसर्ग सुंदर भूमी ही विस्तीर्ण समुद्रकिनारा, नारळी पोफळींच्या संपन्न बागा, हिरवेगार डोंगर, आणि खळाळणाऱ्या नद्या यानी संपन्न अशी यक्षभूमीच आहे. निसर्गाप्रमाणेच गोमंतकीय माणसानी आपल्या अंगच्या कलागुणानी या भूमीला संपन्न व किर्तीमान बनवलेले आहे. गोमंतकाला मंदिराची भूमी असेही म्हणता येईल. इतकी मंदिरे इथे आहेत. पोर्तुगीजांच्या दीर्घकालीन राजवटीमुळे ख्रिस्ती धर्माचा बराच प्रसार इथे झाला आणि त्यामुळे त्यांची गिरिजाघरे– चर्चेस् देखील येथे बरीच आहेत.

गोमंतक या शब्दाची व्युत्पत्ती गाईंनी युक्त असा प्रदेश अशी लावली जाते. कोणे एके काळी या प्रदेशात गोधन विपुल होते. गोवा हा शब्द गौबा या शब्दाचा अपभ्रंश आहे. 'गौबा' हा शब्द टॉलेमीच्या 'टॉलेमायुस' नामक ग्रंथात आढळतो. कर्नाटक प्रदेशातील दोन कानडी शिलालेखातही या प्रदेशाचा उल्लेख गोवे असाच केलेला आहे. विजयनगरच्या चौदाव्या शतकातील एका ताम्रपटात 'गोवाभिधा कोकण-राजधानीम्' असा गोव्याचा उल्लेख आढळतो. गोमंतक हा शब्द महाभारतात देखील सापडतो. पूर्वी गोवापुरी असेही या प्रदेशाला म्हटल्याचे आढळते.

कोकणाप्रमाणे गोमंतक ही देखील परशुरामभूमी आहे असे मानले जाते. परशुरामाने तप करण्यासाठी येथील समुद्र हटवून ही भूमी निर्माण केली अशी आख्यायिका प्रचलित आहे.

आजच्या गोमंतकाच्या पश्चिमेस अरबीसमुद्र असून उत्तरेला महाराष्ट्रातील सावंत-वाडी-वेंगुर्ल्याचा भाग येतो. पूर्वेला कर्नाटकातील बेळगाव जिल्हा आणि दक्षिणेला कारवार हा निसर्ग संपन्न भूभाग येतो. गोवा हा आज एक केंद्रशासित प्रदेश म्हणून भारताच्या नकाशावर आहे. दीव आणि दमणसह या प्रदेशाचा क्षेत्रविस्तार

३,८१३ चौ. कि. मी. आहे. आणि येथील लोकसंख्या ८,५७,१८० आहे. या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी पणजी नामक शहरात असून हे शहर मांडवी नदीच्या तीरावर उभे आहे. या केंद्रशासित प्रदेशात दमण, दीव आणि गोवा असे तीन जिल्हे शासनाच्या सोयीसाठी केलेले आहेत. या प्रदेशांत विविध जाती-जमातींचे आणि धर्मांचे लोक रहातात. त्यांत सर्वांत जास्त हिंदूच आहेत. त्यांची लोकसंख्या ३,८४,३७८ इतकी आहे. आणि त्याच्या खालोखाल ख्रिश्चन धर्मी लोकांची संख्या २,२७,२२० इतकी आहे. १४,६०० मुस्लीम असून बौद्ध-जैन या धर्मांचेही लोक येथे आढळतात.



गोमंतकातील निसर्गदृश्य

गोमंतकामध्ये लहान-मोठ्या अशा बऱ्याच नद्या आहेत, त्यात मांडवी, जुवारी आणि तेरेखोलची खाडी ह्या मोठ्या नद्या आहेत. सह्याद्रीने आपले बरेच बाहू या प्रदेशात पसरलेले आहेत. सोंसोगड नावाचा डोंगर पूर्वेला आहे. तर उत्तरेला सत्तरीमहालात वाघेरीचा डोंगर आहे. मोरलेगड, सिद्धनाथ आणि चंद्रनाथ ही आणखी येथील डोंगराची नावे आहेत. हा सर्व प्रदेशच दाट झाडीने झाकाळलेला आहे.

## साक्षी इतिहास

ही भूमी तशी फार प्राचीन असली तरी इ. स. पूर्वी ३ ऱ्या शतकात तेथे नांदत असलेल्या मौर्य साम्राज्यापासूनचा इतिहास उपलब्ध आहे. मौर्यसत्ता क्षीण झाल्यापासून सातवाहिन किंवा आंध्रभृत्य यांचा अंमल या प्रदेशावर सुरू झाला. या वंशातील एक राजा पुलुयामी आंध्र याच्या कारकीर्दीत पश्चिम भारतावर शक, यवन आदी क्षत्रप टोळ्यांनी हल्ले केले आणि हा प्रदेश क्षत्रप राजाच्या हाताखाली गेला. क्षत्रपाच्या मावळत्या काळात त्याच्या सेनापतींनीच या प्रदेशावर आपली सत्ता दृढ केली. दुसऱ्या शतकातील ही आभिराची राजवट म्हणून इतिहासात नमूद आहे. चौथ्या शतकापासून ते दहाव्या शतकापर्यंत या प्रदेशावर बनवासी कदंब याची राजवट होती. राष्ट्रकूट आणि शिलाहार यांच्याही कारकीर्दी या काळात येथे झाल्या. कोकणपट्टीत दहाव्या शतकाच्या अखेरपर्यंत राष्ट्रकुटाची सत्ता होती. आणि त्याजवेळी राष्ट्रकुटाचे मांडलीक म्हणून शिलाहार राजे गोमंतकावर राज्य करीत होते. अकराव्या शतकामध्ये कदम्बाच्या एका शाखेचे परत येथे राज्य सुरू झाले आणि त्यांच्यातील जयकेशी नावाच्या राजाने चांदर या गावाहून आपली राजधानी गोपकपट्टण येथे नेली. याच गावाला गोवापुरी असे म्हणत असत. गोवापुरी हे तत्कालीन प्रसिद्ध बंदर होते आणि या बंदरातून परदेशाशी व्यापार चालत असे. तत्कालीन शिलालेखातून गोवापुरीतील भव्य इमारती, सुंदर उद्याने, गजबजलेला व्यापार याची वर्णने आढळतात. जयकेशीने आपले प्रबळ आरमारही स्थापन केले होते. याने आपली राजसत्ताही वाढवली होती. पुढे १२१२ च्या सुमारास यादवांनी कदम्बावर आक्रमण करून गोवापुरी लुटली. त्यानंतरच्या सुमारे एक शतकाच्या काळात यादवाची राजवट गोमंतकावर नांदत होती.

महंमद खिलजीने १३१४ मध्ये दक्षिणेवर स्वारी करून यादवांचे राज्य जिंकले. त्यामुळे गोव्यामधील यादवाची सत्ताही आपोआपच संपुष्टात आली. नंतर या मुसलमान आक्रमकांनी गोव्यावर चाल करून तेथील उरले-सुरले कदम्बांचे राज्यही नष्ट केले आणि तेव्हापासून ही भूमी मुसलमानी अंमलाखाली गेली. मुसलमान आक्रमकांनी अन्यत्र जे केले तेच येथेही केले आणि लुटालुटी बरोबरच हिंदूंची मंदिरेही उध्वस्त करून टाकली.

दक्षिणेत त्यावेळी विजयनगर येथे हिंदूंचे साम्राज्य नांदत होते. तेथील माधव

मंत्र्याने १३६६ साली गोव्याच्या भूमीवर स्वारी करून तेथील मुसलमानी राजवट संपुष्टात आणली. यानेच नंतर सप्तकोटीश्वराचे मंदिर पुन्हा बांधून काढले. साधारण पुढच्या सुमारे शतकभर गोमंतकावर विजयनगरच्या राजांची सत्ता अबाधितपणे नांदली. हा काळ सर्वच दृष्टीने गोमंतकाच्या सुखसमृद्धीचा व शांतीचा असा गेला.

त्यानंतर मात्र इतिहासाचे चक्र पुन्हा उलटले आणि महमूद गावन नावाच्या बहामनी राज्याच्या एका सरदाराने १४६९ मध्ये आक्रमण करून गोवा आपल्या ताब्यात घेतला. परंतु काही काळातच बहामनी राज्याचे तुकडे पडले आणि युसफ आदिलशहा नावाच्या एका बहामनीसरदाराने विजापूर येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. आदिलशहाने गोव्यामधील बहामनी सुभेदाराकडून आपले प्रभुत्व कबूल करून घेतले. तेव्हापासून म्हणजे १४८९ पासून ही भूमी विजापूरच्या आदिलशाहीखाली नांदू लागली. महमद गवान याने ज्यावेळी गोव्यावर हल्ला केला होता त्या वेळी त्याच्याबरोबर युसफ आदिलशहा हा देखील गोव्यामध्ये आलेला होता. त्या वेळीच त्यांला हा प्रदेश आवडला होता. म्हणून विजापुरातील राज्य स्थापने नंतर तो अधुनमधून गोव्यात येऊन राहात असे. येथील निसर्ग सौंदर्य आणि समुद्रसानिध्य लक्षात घेऊन त्याने आपली राजधानी विजापूराहून येथे आणण्याचाही बेत केला होता. आणि त्या दृष्टीने आज जुना गोवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरात प्रासादतुल्य वाडे, मशिदी, वगैरे इमारती बांधल्या होत्या. पणजी शहरात आज गोवा सरकारचे सचीवालय ज्या इमारतीत आहे, ती भव्य इमारत आदिल-शहानेच बांधलेली आहे. आदिलशहाची राजवटही फार काळ गोव्यावर टिकली नाही. १५१० साली १७ फेब्रुवारीच्या दिवशी येथील मुसलमानी सत्ता संपुष्टात आली आणि गोव्याची भूमी पोर्तुगीजाच्या ताब्यात गेली.

आदिलशाहीच्या स्थापनेच्या सुमारासच ७ मे १४९८ रोजी वास्को-डी गामा या पोर्तुगीज यात्रिकाने केरळमधील कालिकत बंदरात पाय ठेवला होता. येथून पुढे हिंदुस्थानशी पोर्तुगीजाचा व्यापारामुळे वाढता संबंध राहिला. वास्को-डी-गामाने पोर्तुगीजाचे भारतातील दळणवळण आणि व्यापार याचे बस्तान पुढील काळात बरेच चांगल्या रीतीने बसवले. त्यासाठी त्याने अरब व्यापाऱ्याचाही आपल्या मार्गातील अडथळा काढून टाकण्यासाठी त्याचा अमानुष रीतीने छळ केला होता. त्याच्या नंतर आफोंस द आल्बुकर्क हा पोर्तुगीज सरदार भारतात आला. येताना त्याने आपल्याबरोबर मोठी फौजही आणली होती. येथे आल्यावर

त्याने तिमैय्या नावाच्या विजयनगरच्या सरदाराला फितवून घेतले आणि त्याच्या सहाय्याने समुद्रमार्गे गोमंतकावर स्वारी केली. या वेळी म्हणावा असा प्रतिकारही गोमंतकातून झाला नाही आणि अल्बुकर्कच्या हाती ही भूमी आली. तिमैय्या सरदाराने अल्बुकर्कला जी मदत केली ती केवळ ही भूमी मुसलमानांच्या ताब्यातून सोडवून विजयनगरच्या हिंदु साम्राज्याला पुन्हा जोडावी या हेतूनेच केली होती. पोर्तुगीच हे केवळ व्यापारासाठीच येथे येत आहेत अशी त्याची कल्पना होती. परंतु अल्बुकर्कने गोवा हाती पडताच तिथे आपले राज्य स्थापण्याचे ठरवले. नंतर आदिलशहाने पोर्तुगीजांना हाकलून लावून गोवा ताब्यात घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले, परंतु त्याला त्यात यश लाभले नाही. आणि गोमंतकाच्या भूमीत पोर्तुगीज सत्ता दृढ झाली.

पुढील काळात महाराष्ट्रात मराठ्यांच्या सत्तेचा उदय झाला. आदिलशाहीतील काही सरदार मराठी सत्तेविरुद्ध चकमकी करून गोव्यात पोर्तुगीजांच्या आसऱ्याला पळत असत. तेव्हा शिवाजीमहाराजांनी १६६८ मध्ये बार्देस प्रांतावर स्वारी केली होती. त्यावेळी पोर्तुगीज व मराठे यांच्यात तह झाला आणि त्यामुळे संघर्ष वाढला नाही. गोव्यातील फोंडे येथील मर्दनगड नावाचा किल्ला आदिलशाहीच्या ताब्यात होता. शिवाजीमहाराजांनी १६७५ मध्ये स्वारी करून हा किल्ला जिंकून घेतला. या वेळी पोर्तुगीजांनी विजापूरच्या बादशहाला मदत केली होती. या संदर्भात शिवाजीमहाराजांनी पोर्तुगीजांकडे चौथाई मागितली होती. आणि ती देण्यात पोर्तुगीजांनी चालवलेली टाळाटाळ लक्षात घेऊन शिवाजीमहाराजांनी गोव्यावर स्वारी करण्याचा बेत आखला होता. शिवाजीमहाराजांच्या मृत्युनंतर पोर्तुगीजांनी मर्दनगड किल्ला जिंकण्याच्या उद्देशाने त्यावर हल्ला केला होता. त्यावेळी संभाजीमहाराजांनी फोंड्यास येऊन तेथून पोर्तुगीजांना हुसकून लावले होते. आणि त्यांच्या ताब्यातील बार्देस व साष्टी हे प्रांत जिंकून घेऊन गोवा शहरालाही वेढा घातला होता. यावेळी पोर्तुगीज संभाजीमहाराजांना शरण येण्याच्या विचारात होते. काँदिदआल्वोर, या पोर्तुगीज गव्हर्नरने आपला राजदंड सेंट झेवियरच्या थडग्यावर ठेवूनही दिला होता. परंतु दुर्दैवाने मोंगलांचे सैन्य त्यावेळी कोकणात उतरले होते म्हणून संभाजीमहाराजांना गोव्याची स्वारी तशीच अर्धवट टाकून तेथून परत फिरावे लागले.

१७३९ साली पोर्तुगीजांना गोव्यामधून घालवून देण्याच्या हेतूने पहिल्या बाजीरावाने प्रयत्न केला होता. याच सुमारास चिमाजीअप्पाने वसईवर स्वारी

करून पोर्तुगीजाच्या सत्तेला चागलाच हादरा दिलेला होता. पोर्तुगीजाच्या ताब्यात गोवा, सासष्टी आणि बार्देस हे तीनच तालुके प्रथमतः होते. पुढे विजापूर दरबारचे माडलीक सौंदेकर यांच्या ताब्यात असलेले अंत्रुज, जाबावली, पंचमहाल आणि काणकोण हे भाग त्यानी मिळवले. कालातराने पेडणे, मतग्राम आणि सत्तरी हे तालुके सावंतवाडीचे भोसले यांच्याकडून बळकावले. सध्या गोवा म्हणून जो प्रदेश ओळखला जातो तो हा सगळा प्रदेश असून १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात पोर्तुगीजाच्या अमलाखाली आला.

पोर्तुगीजाची सत्ता नष्ट करण्याच्या हेतूने खुद्द गोव्यातही काही उठाव झाले होते. १६५४ मध्ये कास्यु नावाच्या एका खिस्ती मिशनऱ्याने विजापूरकराच्या चिथावणीने एक कट रचला होता. परंतु तो उघडकीस आल्यामुळे सिद्धीस जाऊ शकला नाही. १७८७ मध्ये पिंटोनचे बंड या नावाने इतिहासात प्रसिद्ध असलेला एक कट रचण्यात आला होता. परतु हाही कट उघडकीस आल्यामुळे बारगळला.

राण्यांची बंडे म्हणून गोव्याच्या इतिहासात झालेले उठाव प्रसिद्ध आहेत. सत्तरी महालावर राण्याची सत्ता होती. सत्रोजी राणे नावाच्या एका राजपूत क्षत्रियाने गोव्यातून सत्तरी महाल बसविला होता. पोर्तुगीजानी हा प्रदेश काबीज केल्यानंतर राण्याच्या हक्कावर व स्वातंत्र्यावर गदा आली. त्यावेळी सत्तरीतील राण्यानी उठाव करण्यास सुरवात केली होती. त्याना त्याच्या प्रजेचीही साथ होती. राण्यानी पोर्तुगीज सत्तेविरुद्ध अनेकवेळा उठाव केले होते १८५२ साली दिपाजी राणे याच्या नेतृत्वाखाली झालेला उठाव हा फार मोठा होता. तो ३-३॥ वर्षे चाललेला होता. सर्व गोव्यातूनच या उठावाला लोकाचा पाठिंबा लाभलेला होता. शेवटी पोर्तुगीजानी दिपाजी राणे याच्याशी तह करून हा उठाव मोडून काढला. त्यानंतर गोव्यात पोर्तुगीजाची सत्ता बराच काळ अबाधितपणे नादली. डॉ. सालाझारच्या कारकीर्दीत गोव्यातील नागरिकाचे सर्व हक्क हिरावून घेतले गेले याच सुमाराला भारतातील स्वातंत्र्याचा लढा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली प्रकर्ष पावला होता. त्याचे पडसाद पोर्तुगीजाच्या गुलामीत असणाऱ्या गोमंतकीय जनतेच्या मनात उठल्याशिवाय राहिले नाहीत.

१९४६ साली प्रसिद्ध समाजवादी पुढारी डॉ राममनोहर लोहिया यानी गोव्यात जाऊन सालाझारच्या हुकुमशाहीविरुद्ध तेथील जनतेला साद घातली. स्वातंत्र्यासाठी उत्सुक असलेल्या गोमतक जनतेनेही पोर्तुगीज सत्तेविरुद्ध आपला

स्वातंत्र्याचा लढा सुरू केला. गोव्यातीलस्वातंत्र्य लढ्याचे पर्व येथून पुढे पुनश्च सुरू झाले. सालाझारच्या सैतानी सत्तेने हा लढा चिरडून टाकण्यासाठी अमानुष अशी दडपशाही आरंभली. परंतु नॅशनल काँग्रेस गोवा या राष्ट्रवादी संघटनेमार्फत गोव्यात आणि गोव्याबाहेरूनही हा लढा चालू ठेवण्याचा प्रयत्न गोमंतकीय राष्ट्रभक्तानी सुरू केला. सालाझारने अनेक देशभक्तांना गोव्यातून हद्दपार केले. तर काहींना पोर्तुगालमधील लिस्बनच्या तुरुंगात दीर्घ काल बंदीवान करून टाकले.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वाभाविकपणेच गोमंतकीय जनतेलाही आपल्यावरील पोर्तुगीज सत्ता संपुष्टात यावी असे तीव्रतेने वाटू लागले. परंतु ब्रिटिशांप्रमाणे गोव्यातून निघून जाण्याची पोर्तुगीजांची तयारी नव्हती. गोवा हा जणू भारताचा भाग नसून ती आपलीच वसाहत आहे अशा उद्दामपणाने सालाझारची पावले पडू लागली. १९५४ साली नॅशनल काँग्रेसने सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिण्याचे ठरवले. आणि त्यानुसार पुनश्च गोव्यातील स्वातंत्र्य लढ्याला भरती आली. गोमंतकीय देशभक्ताप्रमाणेच गोव्याबाहेरील भारतीय सत्याग्रहींनी देखील गोव्याच्या दास्यविमोचनासाठी या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला आणि कठोर असा देहदंडही भोगला. या सत्याग्रहासाठी गोवा विमोचन समितीची स्थापना करण्यात आली होती. साथी पीटर अल्वारिस हे या सत्याग्रह मोहीमेचे प्रमुख सूत्रधार होते. आझाद गोमंतक दल आणि गोवा लिबरेशन आर्मी या दोन संघटनाच्या मार्फतही गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न चाललेलेच होते. १९६१ साली भारत आणि पोर्तुगाल याच्यातील राजकीय संबंध गोव्याच्या प्रश्नावरून फारच ताणले गेले. त्याच सुमारास भारताच्या साबरमती नावाच्या बोटीवर गोवा पोलीसानी गोळीबार केला. तेव्हा भारत सरकारने गोवा सरकार विरुद्ध लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला आणि १७ डिसेंबर १९६१ च्या मध्यरात्री भारतीय सेना गोव्यात घुसली; त्याबरोबर पोर्तुगीज कमांडरने १८ डिसेंबर रोजीच आपली शरणागती जाहीर केली. गोव्याच्या गव्हर्नर जनरलने १९ तारखेला भारतीय सेनापतीच्या हाती आपली लेखी शरणागती दिली. २० डिसेंबर रोजी या घटनेवर भारतीय लोकसभेने शिक्कामोर्तब केले आणि अशारीतीने पोर्तुगीजांच्या गुलामीतून सुमारे ४०० वर्षांनी गोमंतक मुक्त झाला आणि भारतीय संघराज्यात समाविष्ट झाला.

## लोक आणि लोकाचार

गोमंतकातील बहुसंख्य लोकांची रहाणी व बोलणी ही कोकणातल्या माणसा-

सारखीच जवळपास आहे. पोर्तुगीजांच्या राजवटीमध्ये ख्रिस्ती धर्माचा बराच प्रचार तेथे झाला. धर्मप्रचाराच्या नावाखाली येथील मूळच्या लोकावर सक्तीही करण्यात आली व धार्मिक छळही त्याच्या वाट्यास आला तेव्हा बऱ्याच लोकानी धार्मिक जाचाला कंटाळून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. आज गोमंतकात हिंदूंच्या खालोखाल



गोव्यातील हिंदूंचा एक धार्मिक सण

ख्रिश्चन लोकांचीच संख्या अधिक आहे. गोव्यातील ख्रिश्चन हे स्वतःला रोमन कॅथॉलिक म्हणवितात. गोवा मुक्तीच्या पूर्वी राज्यकर्त्यांचा धर्म म्हणून ख्रिस्ती लोकांना शिक्षण, नोकऱ्या इत्यादी बाबतीत अधिक सवलती मिळत होत्या. त्यामुळे संपन्नता व सामाजिक दर्जा या बाबतीतही हा वर्ग पुढारलेलाच होता.

गोमंतकीय किंवा गोवन अशा शब्दानी गोव्यातील लोकांना ओळखण्यात येते. गोमंतकीय माणूस हा रंगारूपाने आणि शरीरयष्टीने महाराष्ट्रातील कोकणी माणसासारखाच आहे. कोकणी माणसाप्रमाणेच तो काटक आणि कष्टाळू आहे. गोव्यातील लोकाचा मुख्य व्यवसाय शेती हाच असून भात हे त्याचे प्रमुख अन्न आहे. भातशेतीप्रमाणेच मच्छीमारी हा इकडील लोकाचा प्रमुख व्यवसाय आहे. विविध-प्रकारच्या मच्छीमारीसाठी हा प्रदेश प्रसिद्ध आहे. गोमंतकाला सुमारे १०० कि. मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. सुमारे २५० कि. मी. लांबीच्या नद्या व खाड्या याशिवाय १०० हेक्टर कि. मी. लांबीचे छोटे तलावही आहेत. दमण आणि दीव या प्रदेशानाही अनुक्रमे १२ कि. मी. व २१ कि. मी. चा समुद्रकिनारा लाभलेला आहे, त्यामुळे या प्रदेशात मच्छीमारीचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. या विपुलतेमुळेच या प्रदेशातील ९०% लोक मासे खाणारे आहेत. मच्छीमार करणाऱ्या कोळ्याचा फार मोठा वर्ग या भागात आहे.

हिंदु लोकांमध्ये चातुर्वर्ण्य पद्धती रूढ आहे. येथील बहुजन समाजात भागवत धर्माचा प्रचार झालेला आहे. सारस्वत ब्राह्मणामध्ये शैव आणि वैष्णव असे पंथ आढळतात. नागेश, मंगेश, रामनाथ हे सारस्वत ब्राह्मणाचे कुळदेव म्हणून प्रसिद्ध आहेत. लोहार, सुतार, न्हावी, धोबी, महार, चांभार वगैरे गावगाड्यातील बलुतेदार पूर्वी गावोगावी असत.

गोव्यातील खेडेगावातून आढळून येणारी एक विशेष संस्था म्हणजे तेथील ग्रामसंस्था होय. गावाभोवतालच्या जमिनी गावकऱ्यांच्या सामुदायिक मालकीच्या असाव्यात, त्या सर्वांच्या असाव्यात, त्या सर्वांनी कसाव्यात त्यातील उत्पन्न सर्वांनी वाटून घ्यावे अशी व्यवस्था होती. गावचा कारभार चालवण्यासाठी गावकरी आपल्या मधूनच पंचमंडळी निवडीत असत. या पंचमंडळा-मार्फतच गावाची व्यवस्था ठेवली जाई. गावातील भांडण-तंडण मिटवून न्यायनिवाडाही पंचमंडळामार्फतच होत असे. तसेच गावाच्या उत्कर्षाच्या योजना आखून त्या पार पाडण्याची व्यवस्थाही केली जात असे. स्वयंपूर्णग्राम अशी कल्पना यामागे होती. पोर्तुगीजाच्या राजवटीत कालपरत्वे ग्रामसंस्थाच्या रचनेत बरेच बदल झाले. त्याना सहकारी शेतकी सोसायट्याचे स्वरूप दिले गेले. 'कॉमिनदादी' या नावाने ही संस्था ओळखली जाते. आज गोव्यातील लागवडी-खाली असलेल्या जमिनीपैकी $\frac{१}{३}$ जमिन ग्रामसंस्थाच्या सामुदायिक मालकीची असून $\frac{२}{३}$ वैयक्तीक मालकीची आहे.

गोव्यामधील हिंदू लोकांची लग्नकार्ये आणि बहुतेक सण समारंभ हे महाराष्ट्रातील हिंदूंप्रमाणेच आहेत. पूर्वीच्या काळी ग्रामसंस्थेमार्फत गावोगावी देवालये बांधण्यात आली होती. पोर्तुगीजानी धर्मछळ सुरू केला. आणि येथील पुष्कळशा देवस्थानांची वाताहात झाली. पुढे स्थिरस्थावर झाल्यावर पुनश्च त्या देवदेवतांची स्थापना



श्रीशांतादुर्गा मंदिर

करण्यात आली. सारस्वत ब्राह्मणांच्या देवांपैकी सप्तकोटीश्वर या देवाला कदम्बांच्या कारकीर्दीत राजदैवत म्हणून मान मिळाला होता. काणकोण येथे मल्लिकार्जुनाचे देऊळ आहे. हे मूळचे द्रविडवंशाच्या हबू लोकांचे मंदिर होते असे म्हणतात. जांबावली येथील दामोदराचे मंदिर हे गोमंतकातील प्रसिद्ध देवालय मानतात. पोर्तुगीजांच्या पूर्वी हे देवस्थान मडगाव शहरात होते. तेथून हा देव जांबावली या गावी नेण्यात आला. दामोदराचे भक्त सर्व जातीजमातीत आहेत.

गोमंतकातील सर्वांत प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय देवालये फोंडे महालात आहेत. ही सर्व देवालये सारस्वत ब्राह्मणातल्या भिन्न भिन्न ब्राह्मणांची कुलदैवते आहेत. शांतादुर्गा हे देवस्थान कवळे या गावी आहे. कौशिक गोत्री सारस्वत ब्राह्मणांची ही कुळदैवते आहेत. ही मूळ केळोशी येथे

होती. तेथून तिला कवळे क्षेत्री आणण्यात आले. बाजीराव पेशव्यांनी कवळे हा गाव या देवस्थानला इनाम दिला होता.

श्रीमंगेशीचे मंदिर प्रियोळ गावी आहे. मंदिराला असलेल्या भागाला मंगेशी असेच म्हणतात. स्मार्त आणि वैष्णव अशा गौडसारस्वताचा श्रीमंगेश हा



श्रीमंगेश – मंदिर

कुळदैवत आहे. हा देव मुळात कुशस्थळी या गावी होता. श्रीमंगेशाचे देवस्थान हे जागृत देवस्थान आहे अशी इकडे लोकश्रद्धा आहे. महत्त्वाच्या कार्यात श्रीमंगेशाला व शातादेवीला कौल लावण्याची प्रथा गोमंतकात आहे.

मंगेशीच्या जवळच भार्दोळ हे गाव आहे. या गावातील म्हाळसा देवीचे मंदिर प्रसिद्ध आहे. म्हाळसादेवी पूर्वी सासष्टीत वेरणे या गावच्या डोंगरात होती. पोर्तुगीजानी डोंगरावरील मंदिर उध्वस्त केल्यानंतर ती भार्दोळ या गावी आली. म्हाळसादेवीचे मंदिर बरेच मोठे, प्रशस्त आहे. गोव्यामधील कित्येक जातीजमातींचे म्हाळसा हे कुळदैवत आहे. माघ महिन्यात येथे देवीची जत्रा भरते व ती बरेच दिवस चाललेली असते.

बांदिवडे या गावातील श्रीमहालक्ष्मीचे मंदिरही प्रसिद्ध आहे. महालक्ष्मीचे मंदिर पूर्वी कोलवे या गावी होते. पोर्तुगीजाच्या धर्मच्छळाच्या काळात ते बांदिवडे

गावी आणण्यात आले. येथंच श्रीनागेशाचेहा प्रसिद्ध देवस्थान आहे. देवस्थाना-जवळील तलाव निसर्गरमणीय आहे. कवळे गावाजवळ श्रीरामनाथाचे मंदिर आहे. हे मंदिरही मोठे प्रशस्त आहे. या शिवाय गावोगावी आणखीही देवस्थाने आहेत गोव्यातील ही मंदिरे पहाताना त्याच्या आजुबाजूचे निसर्गलावण्य तर नजरेत भरतेच, परंतु मंदिराच्या प्रशस्तपणाबरोबरच तेथील कमालीची स्वच्छता आणि टापटीप दृष्टीत भरल्याखेरीज रहात नाही. स्वच्छते बरोबरच विविध रंगाची आणि गंधाची फुले आणि सौम्य, शांत अशा नंदादीपाचा प्रकाश या मंदिरांमधून आढळतो. भाविकाचे मन प्रसन्न व्हावे असेच निर्मळ आणि पवित्र वातावरण असते.

ख्रिश्चन धर्मीयाचीही बरीच गिरिजाघरे-चर्चिस् गोव्यात आहेत. अल्बुकर्कने गोव्यावर ताबा मिळवला त्याचवेळी कॅथॉलिक मिशनऱ्यानी तेथे प्रवेश करून धर्म-प्रचाराच्या कामाला सुरुवात केली. डोमिनिकन, फ्रान्सिसकन्, जेसुईट, ऑगस्टिन इत्यादी नावाने धर्मांतरासाठी काही संस्था त्यानी स्थापन केल्या आणि गोव्यातील भागही वाटून घेतला. सामदामादि अनेक प्रकारानी त्यांनी हिंदूंचे धर्मांतर घडवून आणले. त्याचबरोबर त्यानी ठिकठिकाणी गिरिजाघरे बाधली कित्येक ठिकाणी हिंदूंची मंदिरे उध्वस्त करून त्याजागी गिरिजाघरे उभारली. गोव्यातील राजकीय



चर्च–जुना गोवा

सत्ता पुढे ख्रिश्चनधर्मीयाच्याच हातात असल्यामुळे येथील गिरिजाघरे अत्यंत भव्य आणि प्रशस्त अशी आहेत. १६ व्या शतकात गोवा, बारदेस आणि सासष्टी या तालुक्यातल्या जवळजवळ प्रत्येक गावी गिरिजाघरे बाधण्यात आली.

आज ज्याला जुना गोवा म्हणून ओळखले जाते त्या ठिकाणचे बोजेझुसचा कॉनवेंट हे गिरिजाघर १९०५ साली बांधलेले आहे. सेंट फ्रान्सिस झेविअर या ख्रिश्चन साधूचे शव तेथे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहे. हे गिरिजाघर अतिशय भव्य असून त्याच्या भिंतीवर सेंट झेविअरच्या जीवनातील अनेक प्रसंग चित्रमय केलेले आहेत. हे गिरिजाघर गोव्यामधील गॉथिक शिल्पशैलीचा एक नमुना म्हणून ओळखले जाते. अल्बुकर्कने ज्या दिवशी गोवा शहर काबीज केले तो दिवस सेंट कॅथेरिनचा होता. त्यामुळे १५१० मध्ये अल्बुकर्कने तिच्या स्मरणार्थ कॅथेड्रल ऑफ गोवा नावाची एक भव्य वास्तु उभारली. या कॅथेड्रलमध्ये १४ अल्टर्स असून एक प्रचंड घंटाही आहे. सेंट कॅथेरिनच्या जीवनातील घटना, येशूख्रिस्तावरील खटला, सेंट ख्रिस्तोफर इत्यादी अनेक प्रकारची चित्रे येथेही आहेत.

सेंट फ्रान्सिस ऑफ आसिसीचा कॉनवेंट ही वास्तूही १६ व्या शतकाच्या प्रारंभी बांधण्यात आली.

१५७२ मध्ये सेंट ऑगस्टिन याचे काही शिष्य गोव्यात आले होते. त्या वेळी त्यानी पवित्र पहाडावर सेंट ऑगस्टिनचे कॉनवेंट आणि चर्च बाधले. हे चर्च 'अवर लेडी ऑफ ग्रेस' हिला समर्पित केलेले आहे.

सेंट मोनिकाचा कॉनवेंट ही गोव्यामधील ख्रिश्चन भिक्षुणींची मठासारखी वास्तू असून ही गोवा शहरातील सर्वांत उंच आहे. या मठाच्या भिंतीवर बायबलमधील कथाप्रसंग चित्रित केलेले आहेत. पूर्वी या मठाला तटबंदी होती. बुरुजही होते. परंतु आता ते भग्नावस्थेतच शिल्लक आहेत.

एकेकाळी प्रसिद्ध असलेले सेंट पॉलस कॉलेज आज ढासळलेल्या स्थितीतच आहे. एकेकाळी पूर्वेकडील ख्रिश्चन धर्माचे हे आद्यपीठच होते. १५४१ मध्ये या कॉलेजची स्थापना झाली होती. सेंट फ्रान्सिस झेविअर याच्याकडून नियुक्त झालेले मिशनरी येथे धर्मशिक्षण देत असत. १५५६ साली येथे पहिला छापखाना सुरू करण्यात आलेला होता आणि १५५७ साली येथून प्रथमच छापील ग्रंथ प्रसिद्ध झाला होता.

बिशपच्या प्रदेशातील मोठे चर्च म्हणून ओळखले जाणारे एक भव्य चर्च आहे. हे मोठे चर्च दमण येथे आहे. या चर्चचे जुने नाव होली नेम ऑफ जिझस असे होते. १५२८ मध्ये पोर्तुगीज कप्तान मार्टिन्स एल्फोन्सो याने दमण जिंकून घेतले परंतु दमणमध्ये पोर्तुगीजांचा प्रवेश १५५९ मधील फेब्रुवारीत झाला होता.

याशिवाय अवर लेडी ऑफ रोझरी, पिलरचे चर्च आणि मठ, राइस मागोचे

चर्च, रॉशॉल सेमिनरी, द इमॅक्युलेट कन्सेप्शन चर्च इत्यादी बऱ्याच वास्तू गोव्यात आहेत. पोर्तुगीजाच्या दीर्घकालीन वास्तव्यामुळे आणि ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामुळे पोर्तुगीज संस्कृतीची छाप गोव्याच्या लोकजीवनावर उमटलेली दिसून येते.

### भाषा आणि साहित्य

गोव्याची लोकभाषा प्रामुख्याने मराठीच आहे. परंतु रोजच्या व्यवहारात आणि बोलण्यात कोकणीचाही वापर तेवढाच केला जातो. आजवर कोकणी ही मराठीचीच बोली असे मानले जात असे. या विषयावर अलीकडच्या काळात बरेच वादही झाले आहेत. परंतु १९७६ सालीच भारताच्या साहित्य अकादमीने कोकणीला स्वतंत्र भाषेचा दर्जा प्रदान केलेला आहे.

प्रारंभीच्या काळात मिशनरी लोकांनी कोकणीचा अभ्यास करून धर्म-प्रचारासाठी कोकणीत काही पुस्तकेही लिहीली. १६३२ साली 'क्रिस्तावाच्या दौत्रिनीची अर्थु' हे रिबेयनचे कोकणी पुस्तक छापण्यात आले. १८७३ साली रुद्रिगीश या लेखकाने कोकणी-पोर्तुगीज शब्दकोश लिहिला. अलीकडे कोकणी-मध्ये कथा, काव्य इ. वाङ्मय प्रकार ग्रंथरूपाने प्रसिद्ध होऊ लागले आहेत. बा. भ. बोरकर, र. वि. पंडित इत्यादी कवींनी कोकणीत उत्कृष्ट काव्यरचना केलेली आहे. पूर्वी ख्रिस्ती लेखकानी बऱ्याच कथा कोकणीत लिहिल्या, परंतु त्या रोमन लिपीत छापलेल्या आहेत. या साहित्य प्रकाराला 'रोमान्स' असे नाव आहे.

महाराष्ट्रातल्या प्रमाणेच गोमंतकातही मराठीची जोपासना तिच्या जन्म-काळापासून होऊ लागली. महाराष्ट्रातील संतानी लिहिलेल्या साहित्याचा प्रसार गोव्यातही त्याचवेळी झाला. कृष्णदास शामा नावाच्या गोमंतकीय लेखकाने १५ व्या शतकात लिहिलेली भागवताच्या दशम स्कंधावरील टीका उपलब्ध आहे. या लेखनावर मराठी संताचा प्रभाव पडलेला आहे. १६ व्या व १७ व्या शतकात ख्रिस्ती मिशनऱ्यानी धर्मप्रचारासाठी मराठीही पुस्तके लिहिली. त्यात फादर स्टिफन्स याने लिहिलेले 'क्रिस्ती पुराण' फार प्रसिद्ध आहे. हा मराठी भाषेचा मोठा अभिमानी होता. त्याने मराठी भाषेची थोरवी अशा शब्दात गायलेली आहे :

> 'पखिआमाजी मयोरु
> व्रुखियांमध्ये कल्पतरु
> भासांमध्ये मानु थोरु
> मराठीयेसी.'

एका फ्रेंच मिशनऱ्याने लिहिलेला 'पिटर पुराण' नावाचा ग्रंथही प्रसिद्ध असून त्यात सेंट पिटरचे चरित्र वर्णिलेले आहे. आणखीही काही मिशनऱ्यांनी लिहिलेली पुस्तके त्या काळी प्रसिद्ध झालेली होती. परंतु त्याच वेळी पोर्तुगीजाच्या ताब्यात असलेल्या प्रदेशातील मराठी भाषेवर निर्बंध लादण्यात आलेले होते. धर्मांतर करून नवीन ख्रिश्चन झालेल्या लोकांच्या हातात हिंदूंचे धर्मग्रंथ पडू नयेत म्हणून त्याची होळी केली जात होती. तसेच हिंदूनी हे ग्रंथ आपल्याजवळ आपल्या घरात बाळगू नयेत अशी सरकारी फर्माने निघालेली होती. परंतु तरीही मराठीची उपासना अबाधित राहिली. विष्णुदास नामा यानी लिहिलेला 'प्रल्हाद-चरित कथा', 'तुकाराम बाबा वर्दे यानी लिहिलेला 'सुभाषितरत्नावली,' महेश्वर-बाबा सुखटणकर याचा 'अमरविवेक', नायकस्वामी कृत 'शिवगीतेवरील टीका', केरीकरांचा 'शुकरंभा संवाद', पांडोबा कैसरे याचे 'द्रौपदी स्वयंवर', सोयरु-भट्ट कृत 'विवेकचुडामणी' सोयरोबानाथ आंबिये या संत कवीने लिहिलेला 'सिद्धांत संहिता' इत्यादी त्या काळातील गोमंतकीयाची मराठी रचना प्रसिद्ध आहे. सोयरोबानाथ आंबिये यानी लिहिलेला 'अद्वैयानंद पूर्णेश्वरी' हा ग्रंथ ज्ञानेश्वरीप्रमाणे गोमंतकीयांना आदरणीय वाटतो. सोयरोबानी बरीच भक्तीपर गीतेही लिहीलेली आहेत आणि त्याची ही गीते आजही गोमंतकात भक्तलोक आवडीने गात असतात.

त्या नंतरच्या काळात म्हणजे १९ व्या शतकात कृष्णजगन्नाथभट्ट बादकर नावाच्या कवीने प्रासादिक अशी काव्यरचना केली. याना मराठीत संगीत नाटकाचे जनक मानले जाते. डोंगरी येथे होणाऱ्या रामनवमीच्या उत्सवात त्यानी अनेक संगीत आख्यायिका बसवून सादर केल्या होत्या. ती पहाण्याचा योग अण्णासाहेब किर्लोस्कर यांना लाभला होता. किर्लोस्करानी अशी नाटके लिहून महाराष्ट्रात सादर करावीत असे बादकरानी त्याना सांगितले अशी आख्यायिका आहे. पुढच्या काळात धर्मानंद कोसंबी, रामकृष्ण कामत चंदगडकर, शामाराव सरदेसाई, यशवंतराव सरदेसाई, दत्तात्रेय पै, पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर, अ. का. प्रिओळकर इत्यादी व्यासंगी पंडितानी, कवींनी आणि संशोधकानी मराठीची अमोल सेवा केलेली आहे. आधुनिक मराठी साहि-त्यातही गोमंतकीय लेखक, कवींनी महत्त्वपूर्ण अशी भर घातलेली आहे. या काळात कवीवर्य बा. भ. बोरकर आणि शंकर रामाणी, कथाकार लक्ष्मणराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर, दा. अ. कारे, महादेवशास्त्री जोशी, जयवंतराव सरदेसाई,

मो. ग. रांगणेकर, चंद्रकांत काकोडकर आदी साहित्यिकांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले. साहित्यविषयक व कलाविषयक गोष्टींना प्रोत्साहन देण्यासाठी गोव्यात आता कला अकादमीची स्थापना झाली आहे.

**कलाप्रिय गोमंतक**

गोमंतकीय माणूस हा सौंदर्यवादी आणि रसिक आहे. गोमंतकाच्या भूमीने संगीत, नाटक, चित्र, नृत्य इत्यादी कलाक्षेत्रात अनेक नामवंत कलाकार भारताला दिले आहेत दिनानाथ मंगेशकर, मोगुबाई कुर्डीकर, केसरबाई केरकर, ज्योत्स्ना भोळे, लता मंगेशकर, आशा भोसले, रामकृष्णबुवा वझे इत्यादी थोर गायक गोमंतकाच्या भूमीतच झाले. दलाल, मुळगावकर, लक्ष्मण पै, यांच्यासारखे चित्रकार येथे होऊन गेले. रघुवीर सावकार, दिनानाथ मंगेशकर इत्यादी अभिनय कुशल नट येथे निर्माण झाले. गोमंतकीय माणसाला नाटकाचे खास वेड आहे. नाटकाची परंपरा येथे प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. मराठीतील पहिले नाटक व नाटककार बादकर गोव्यातच होऊन गेले. मराठी रंगभूमीवर गाजत असलेले अनेक अभिनयकुशल नटनटी गोमंतकीय आहेत. रामनवमी, स्थानिक देवदेवतांचे उत्सव इत्यादी प्रसंगी गोव्यात गावोगावी मोठ्या हौसेने नाटके होत असतात. ख्रिस्ती लोकही आपल्या सणसमारंभाच्यावेळी नाटके करतात. कोंकणी भाषेतही काही नाटकांचे प्रयोग होतात.

काला, गौळण काला, गोपाळ काला, जागर हे गोमंतकातले खास लोकनाट्य प्रकार आहेत. काला या नाट्यप्रकारातले संगीत हे खास गोमंतकीयच असून अन्यत्र ते कुठेही आढळत नाही या वेळी झूला नावाचा ताल वाजविण्यात येतो. हाही वैशिष्ट्यपूर्ण असतो. गौळणकाल्याची रचना नाटिकेसारखी असते. ही संगीतमय असते. विविध प्रकारच्या संगीताची योजना या प्रकारात केलेली असते. एखाद्या संगीतिकेप्रमाणे यातील पात्रांचे संवादही संगीतातूनच चालतात. गोपाळकाला या नाट्यप्रकारात अध्यात्मिक कूटाचे सवाल-जबाब विविध पद्धतीच्या रागदारीत चालतात. भजनासारखे यातील संगीत असते. जागर हे लोकनाट्य देवस्थानाच्या उत्सवाच्या वेळी चालते.

नृत्याची आवडही गोमंतकात फार आहे. ग्रामीण भागात विविध तऱ्हेची नृत्ये चालतात. देवस्थानात उत्सवाच्या वेळी आणि पालखीपुढे भाविणींचे नृत्य चालते.

धालो हा खास गोमंतकीय नृत्यप्रकार आहे. पौष महिन्यात गावोगाव धालो नृत्योत्सव चालतो. गावातील मानकऱ्याच्या घरापुढील अंगण स्वच्छ सारवतात. तुळशीवृंदावनापुढे समया लावतात. आणि त्या प्रकाशात स्त्रिया हे नृत्य करतात. सात ते दहा दिवस हा नृत्योत्सव चालतो. धाल्याची सुरुवात पाती नावाच्या नृत्यप्रकाराने होते. समोरासमोर रांगा करून स्त्रिया उभ्या राहतात. त्या एकमेकींच्या कमरेभोवती किंवा गळ्याभोवती हात गुंफतात. नंतर गीताचा एकेक चरण म्हणत पहिली रांग दुसरीच्या पुढे जाते व चरण पुरा करून मागे सरकते. त्यावेळी दुसरी रांग गीताचा दुसरा चरण म्हणत पुढे येते. अशारीतीने हे गीतगायन व नृत्य चालते. पात संपली म्हणजे मग फेरफुगडी चालू होते. पातीची गाणी संथ गतीची असतात, पण फेरफुगडीची गाणी ठेक्याची असतात.



आदिवासी नृत्य

या गाण्याची स्वररचना, लयीमधील वैविध्य हे वैशिष्ट्यपूर्ण असते. गामेतंकातील ग्रामीण स्त्रियांना लय व चालीची फार जाण असते. धाल्यातील पातीचा हा एक नमुना

आमची लेक नारी कोणाक पिर्यो गे ऽ कोणाक पिर्यो गे
आमची लेक नारी घरतरी माया गे ऽ घरतरी माया गे
आमची लेक नारी कोणाक पिर्यो गे ऽ कोणाक पिर्यो गे
आमची लेक नारी तुळशीमाया गे ऽ तुळशीमाया गे
फोडिलो नारळ कातिल्य शिरणी वाटिल्यो तुळसावृंदावनी गे ऽ
वाटिल्यो तुळसावृंदावनी गे ।
वाटिल्या जाल्यार बरें जाले सखिया साद तुमी घाला गे ऽ
सखिया साद तुमी घाला ।
मौनी आयल्या मौनी गेल्या केश्यानी वोळोखिल्या गे ऽ ।
केशानी वोळोखिल्या ऽ गे ।
पायाक सळमुदी त्या वैर जनरी त्यानी
वोळोखिल्या गे
त्यांनी वोळोखिल्या गे

गोमंतकाची भूमी लावण्यखनी आहे. कलंगूट, कोलेंवा, बागतूर, इत्यादी बीच-समुद्रकाठची स्थळे रमणीय आहेत. पणजी शहराजवळ मीरा-मार या नावाने ओळखली जाणारी चौपाटी प्रवाशाचे आकर्षण स्थळ आहे. येथून सूर्यास्ताचा देखावा अतिशय सुंदर दिसतो. पणजीपासून काही अंतरावरच दोनापौला नावाचे एक प्रेक्षणीय स्थळ आहे. समुद्रातच एक टेकडी असून तिच्यावरून आजूबाजूचे दृश्य अतिशय विलोभनीय दिसते.

पणजी हे राजधानीचे शहर आहे. माडवीच्या काठी गोव्याची राजधानी उभी आहे. येथील सरकारी इमारती, प्रशस्त रस्ते, सुंदर उद्याने, अलिशान हॉटेल्स आणि आजूबाजूला हिरवी गर्द झाडी इत्यादी आकर्षणाने गोव्याची राजधानी नटलेली आहे.

मडगाव, म्हापसा, वास्को-द-गामा इत्यादी शहरे भरभराटलेल्या स्थितीत आहेत. गोवा मुक्तीनंतर शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य इत्यादींच्या विकास योजनाही गोमंतकात आता कार्यान्वित झालेल्या आहेत.

दीव आणि दमण हे दोन छोटे प्रदेशही केंद्रशासित असून ते गोमंतकाच्या शासनाखालीच येतात. गुजरात राज्याच्या नैऋत्येला अरबी समुद्राच्या किनारी दमण वसलेले आहे. दमणचे क्षेत्रफळ ७२ चौ. कि. मी. आहे. दमणची लोकसंख्या

सुमारे ३८,७४१ आहे. तेथे बहुसंख्येने गुजराती हिंदूंचीच वस्ती आहे. तेथील दैनंदिन शासन व्यवहार एका जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार चालतो.

दीव काठेवाडच्या दक्षिणेला समुद्रकिनारी वसलेले आहे. याचे क्षेत्रफळ ४० चौ. कि. मी. आहे आणि लोकसंख्या २३,९०९ आहे. याचा राज्यकारभार एका अडमिनिस्ट्रेटरकडे सोपवलेला आहे. दीव हे एक छोटेसे बेट असून याच्या जवळच पालीकोट आणि गोगोल नावाची दोन लहानलहान बेटे आहेत. दीवच्या ॲडमिनिस्ट्रेटरच्या अमलाखालीच येथलाही कारभार चालतो. दीव-दमणपासून वायव्येकडे १५० मैलांवर येते. गोगोल गुजरातमधील जुनागढच्या जवळ येते. सिंबोरच्या खाडीत पानीकोट हे बेट आहे. तेथे समुद्रात बांधलेला किल्ला आहे. गोव्याप्रमाणेच दीव-दमणची राजधानी पणजीच आहे.

दादरा आणि नगरहवेली हे प्रदेशही केंद्रशासितच आहेत. सिल्व्हासा हे येथील राज्यकारभाराचे मुख्य ठाणे आहे. या प्रदेशाचे क्षेत्रफळ ४९१ चौ. कि. मी. असून तेथील लोकसंख्या ७४,१६५ आहे. गोमंतकाच्या राज्यपालाचीच सत्ता या प्रदेशावर चालते.

♠ ♠

# श्रीअरविंदांची पाँडिचेरी

पाँडिचेरी हा दक्षिणेतील एक लहानसा केंद्रशासित प्रदेश आहे. वस्तुतः पाँडिचेरीचे स्थान तामिळनाडूतच येते. मद्रासपासून पाँडिचेरी हे शहर केवळ १६० कि. मी. अंतरावर आहे. परंतु पोर्तुगीजाप्रमाणेच बरीच वर्षे फ्रेंच सत्ताही भारताच्या काही भागात नांदत होती. ब्रिटिशाच्या काळातही पाँडिचेरी हे फ्रेंचाची वसाहत म्हणून राहिली. भारतातील इतर राज्याप्रमाणेच पाँडिचेरीची भूमी फार प्राचीन आहे. हिच्या प्राचीनत्वासंबंधी अशी एक आख्यायिका सांगितली जाते की पूर्वी ही नगरी 'वेदपुरी' या नावाने ओळखली जात होती. वेदपुरीचा आणि अगस्तीचा बराच संबंध आलेला होता. उत्तरेतून विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत आलेला अगस्ती हा पहिला आर्य मानला जातो. वेदपुरी हे नाव या नगरातील वेदपुरीश्वर या नावाने आजही ओळखल्या जाणाऱ्या नगरदेवतेवरून पडले असावे असे दिसते. पाँडिचेरी हे नाव या शहराला केव्हा मिळाले हे मात्र निश्चित सांगता येत नाही. तथापि फ्रेंचाच्या कारकीर्दीतच ते रूढ झाले असावे. येथून ५-६ मैलांवरच अलीकडेच उत्खनन करण्यात आले असून त्यात सापडलेल्या वस्तूंवरून या शहराचा संबंध ग्रीक व रोम या देशाशी पूर्वी असावा असे तज्ज्ञांचे मत आहे.

दक्षिणेत राज्यकारभाराच्या उलथापालथीत अनेक राजवटी आल्या व गेल्या. त्याचाही संबंध या भूमीशी आला. विशेषतः पल्लव, राष्ट्रकूट, चोल, विजयनगर, चालुक्य ह्या वंशातील राजांनी या भागावर राज्य केले होते. नंतर १६७४ पासून कधी हॉलंड या देशाची तर कधी फ्रेंचाची तर कधी इंग्लंडचीसुद्धा सत्ता या प्रदेशावर नांदली. पाँडिचेरीच्या आजूबाजूला वीरपट्टणम, बाहुर, सिकंदरकोईल, तिल्लिनूर इत्यादी मंदिरे आहेत. त्यातील देवदेवतांच्या मूर्ती आणि शिल्पाकृती अत्यंत कलापूर्ण असून प्राचीन काळच्या राजांचे कलाप्रेम प्रकट करतात. बाहुर आणि विरुवने या ठिकाणी सर्व विषयाचे शिक्षण देणारी मोठी विद्यापीठे होती आणि संस्कृत नाटकाचे प्रयोगही

येथे होत असत.

विलियानूरचे प्रसिद्ध मंदिर पाँडिचेरीतच असून भारतातील वास्तु-कलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून ते प्रसिद्ध आहे. या मंदिरासंबंधी एक आख्यायिका इकडे प्रचलित आहे. या भागात कोणे एके काळी बेलाच्या झाडाचे जंगल होते. चोल वंशातील एक तरुण राजा धर्मपाल याला कोड झाले. त्यावर उपाय म्हणून त्याने या जंगलात येऊन रहावे व येथील तलावात रोज स्नान करावे म्हणजे त्याचे कोड जाईल असे त्याला साधून सांगतले. त्यानुसार धर्मपाल या जंगलात येऊन राहिला. येथल्या तळ्यात रोज स्नान करू लागला. आणि काही दिवसानी त्याचे कोड खरोखरच बरे झाले. रोगमुक्त झाल्यावर धर्मपाळने या जंगलातच एक मंदिर बांधले. तेच विलियानूर मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

१९६३ मध्ये फ्रेंचांनी ज्या पाच वसाहती स्थापन केल्या होत्या, त्यात पाँडिचेरी ही सर्वांत मोठी वसाहत होती. प्रसिद्ध फ्रेंच मुत्सद्दी डुप्ले यानेच भारतात फ्रेंच्यांच्या सत्तेचा पाया घातला. भारतावर फ्रेंच साम्राज्य प्रस्थापित करावे अशी त्याची महत्वाकांक्षा होती. आणि या महत्वाकांक्षेनेच त्याने ब्रिटिशाच्या ईस्ट-इंडिया कंपनीशी युद्धही केले होते. परंतु त्यात त्याचा पराभव झाला. पाँडिचेरीच्या समुद्र-तटावर डुप्लेचा पुतळा त्याचे स्मारक म्हणून आजही उभा आहे.

१६७४ मध्ये किल्ल्यासारखी तटबंदी असलेल्या मद्रासजवळील संथाम शहरातून फ्रेंच ईस्ट-इंडिया कंपनीचा एजंट फ्रान्सिस मार्टीन याला डचानी पराभूत करून हुसकून लावले होते. परंतु या पराभवाने निराश होऊन फ्रान्सिस फ्रान्सला परत गेला नाही, तो पाँडिचेरी येथे जाऊन राहिला. त्यावेळी त्याच्याजवळ केवळ ६० फ्रेंच सैनिक होते. त्यावेळी पाँडिचेरी हे एक लहानसे गाव होते. ते जिंजीच्या राजाच्या अंमलाखाली होते. मार्टिनने ते त्याच्याकडून विकत घेतले. त्यानंतर त्याने या गावाला तटबंदी बांधली आणि हळूहळू या गावाला एका मोठ्या समृद्ध व व्यापारी केंद्राचे स्वरूप दिले. पाँडिचेरीचे वाढते वैभव डचाना खपले नाही. त्यावेळी डच हे समुद्रावर सर्व सत्ताधीश असल्यासारखे होते. म्हणून त्यानी १६९३ मध्ये पाँडिचेरीवर आक्रमण करून फ्रेंचाकडून आपल्या ताब्यात घेतले. पाँडिचेरीवर डचाची सत्ता सुरू झाली. परंतु काही कालानंतर फ्रेंच व डच याच्यात एक तह झाला व त्यानुसार पाँडिचेरी परत फ्रेंचाच्या अंमलाखाली आली. पुढे १८१६ पर्यंतच्या काळात चार वेळा इंग्रजानी फ्रेंचाच्या या वसाहतीवर

आक्रमण केले आणि आपली सत्ता तेथे प्रस्थापित केली. परंतु १८१४ मध्ये इंग्रजानी येथून आपली सत्ता काढून घेतली व हा प्रदेश फ्रेंचांच्या ताब्यात देऊन टाकला. पाँडिचेरीमध्ये चार प्रशासित शहरे आहेत. कर्कल, माहे व कारोमंडलच्या तटावरील यनाम. कर्कल या शहराचे क्षेत्रफळ १५८ चौ. कि. मी. असून तेथील लोकसंख्या ८,४०,००१ आहे. या शहराची स्थापना १७३९ मध्ये दुमा याने केली होती. माहे या शहराचे क्षेत्रफळ १०४ चौ. कि. मी. असून येथील लोकसंख्या १९,४८५ आहे. यनामचे क्षेत्रफळ २०·७ चौ. कि मी. असून लोकसंख्या ७,०३२ आहे. फ्रेंचांच्या कारकीर्दीत त्याची जहाजे या ठिकाणी थाबत असत.

पाँडिचेरी हे शहर या प्रदेशाची राजधानी असून ते काळ्या व गोऱ्या लोकांच्या वस्तीत विकासलेले आहे. गोऱ्या फ्रेंचांची वस्ती ज्या भागात आहे तो भाग फ्रेंच ढंगावर वसवलेला असून प्रशस्त रस्ते, सुंदर इमारती, प्रसन्न उद्याने या भागात आहेत. याच भागात हायकोर्ट, सचिवालय इत्यादी सरकारी इमारती आहेत.

येथील राजभवनाच्या पुढे एक सुंदर उद्यान आहे. या उद्यानाच्या मध्यभागी एका नर्तिकेचा पुतळा आहे. तिच्या हातात दोन कुंभ असून त्यातून पाणी वहात असते. या स्मारकासाठी एक आख्यायिका सांगतात :

१६ व्या शतकात विजयनगर येथील सम्राट कृष्णदेवराय आपल्या प्रजेची देखभाल करण्यासाठी विलियानूरकडे आला होता. मदुरापालयम्‌कडे जाताना एका आकर्षक घरावर त्याची दृष्टी गेली. तो तेथेच थबकला. त्या घरातून धुंद असा सुगंध येत होता. राजाला वाटले की येथे एखादे मंदिर असावे. म्हणून त्याने नतमस्तक होऊन वंदन केले. परंतु नंतर त्याला कळले की हे एका नर्तिकेचे घर आहे. त्यामुळे राजाला राग आला व त्याने तत्काळ ते घर पाडून तेथे तलाव बांधण्याची आज्ञा दिली. ही वार्ता नर्तिकेला कळताच ती धावत राजाकडे आली व हात जोडून म्हणाली, " महाराज, मला क्षमा करा. येथे तलाव बांधण्याची संधी मलाच द्या. " आजही तो तलाव त्या नर्तिकेचे स्मरण देत आहे. फ्रेंचांच्या कारकीर्दीत तिचा पुतळा येथे उभारण्यात आला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिशाप्रमाणेच फ्रेंच लोकही येथील सत्ता सोडून जातील अशी कल्पना होती, परंतु तसे घडले नाही. आणि उलट

येथील स्वातंत्र्यवादी देशभक्तावर अत्याचारच सुरू झाले. परंतु येथील जनतेमधील स्वातंत्र्याची आकांक्षा प्रबल झालेली होती आणि त्यामुळे फ्रेंचाना आपली येथील सत्ता टिकवणेही कठीण होऊन बसले होते. १९४८ मध्ये चंद्रनगर येथील फ्रेंचाची वसाहत भारतीय संघराज्यात विलीन झाली होती. १९५२ मध्ये माहे येथील सत्ता स्वातंत्र्यवाद्याच्या हातात आली होती. नोतापरम हा पाँडिचेरीतील प्रदेशही अलग होऊन स्वातंत्र्यसैनिकांच्या हातात आला होता. या सगळ्या घडामोडींमुळे फ्रेंच सरकार व भारत सरकार याच्यात वाटाघाटी होऊन २१ ऑक्टोबर १९५५ रोजी फ्रेंचानी पाँडिचेरी भारत सरकारच्या स्वाधीन केली. औपचारिकपणे १ नोव्हेंबर १९५४ रोजी हा प्रदेश भारतीय संघराज्यात आला. तेव्हापासून पाँडिचेरी हा भारतामधील केंद्रशासित प्रदेश बनलेला आहे.

पाँडिचेरी हे शहर समुद्रकाठी वसलेले असून ते अतिशय सुंदर आहे. येथे मोठी व्यापारी पेठ असून अनेक प्रकारचे कारखानेही आहेत. सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणाची सोयही येथे असून या प्रदेशाचा सर्वांगीण विकासही होत आहे. परंतु फ्रेंच लोकाच्या दीर्घकालीन वास्तव्यामुळे लोकजीवनावर भारतीय संस्कृती-बरोबरच फ्रेंच संस्कृतीचा ठसाही उमटलेला दिसतो. या भागात तामीळ आणि फ्रेंच या भाषा बोलल्या जातात.

पाँडिचेरी शहरातच योगी अरविंद याचा आश्रम आहे. बरीच वर्षे योगी अरविंदाचे वास्तव्य या ठिकाणी होते अध्यात्मिक जीवन-मार्ग स्वीकारण्यापूर्वी श्री. अरविंद घोष हे बंगालमधील क्रांतीकारी पक्षातील एक अध्वर्यू होते. वंगभंगाच्या आदोलनात अरविंदानी मोठ्या हिरीरीने भाग घेतलेला होता. अरविंद घोष याचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी बंगालमधील एका सधन कुटुंबात झाला होता. त्याच्या वडिलाचे नाव कृष्णधन घोष व आईचे नाव स्वर्णलतादेवी असे होते ७ वर्षांचे असतानाच अरविंद आपल्या आईवडिलाबरोबर इंग्लंडला गेले होते. तेथेच त्याचे उच्च शिक्षण झाले. परदेशातून परतल्यावर बडोद्याच्या शिक्षण विभागात ते काम करू लागले थोड्याच दिवसात बंगालमध्ये राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ सुरू झाली. कलकत्यात 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन' नावाची संस्था स्थापन झाली. अरविंदानी बडोद्याची मासिक ८०० रु. वेतनाची नोकरी सोडली व अवघ्या १५० रुपयावर राष्ट्रीय भावनेने कलकत्याच्या नॅशनल कौन्सिलमध्ये ते काम करू लागले. राष्ट्रीय शिक्षणाचे ते भोक्ते होते आणि संस्थेतील विद्यार्थ्यांने

राजकारणात भाग घेऊ नये हा संस्थेचा नियम त्याना पटला नाही. म्हणून त्यानी तीही नोकरी सोडली व ते राजकारणात पडले. ते जहालमतवादी होते. इंग्रज लोक केवळ अर्ज विनंत्या करून स्वराज्य देतील यावर त्याचा मुळीच विश्वास नव्हता.

अरविंदानी ' वंदे मातरम् ' नावाचे साप्ताहिक काढले होते. १९०५-६ च्या सुमारास बंगालमध्ये क्रांतीची ज्वाला भडकवण्याच्या कामी अरविंदाच्या वंदे मातरम्‌ने मोठी कामगिरी बजावली होती. अलिपूर बॉम्ब कटामध्ये अरविंदाना इंग्रजानी गोवून तुरुंगात टाकले होते. या कारावासातच अरविंदानी आध्यात्माचे सखोल चिंतन, मनन केले आणि तेथेच त्यानी राजकारण सोडून आध्यात्मिक मार्ग पत्करला. १९१० मध्ये अरविंद पॉंडिचेरिला आले. येथे आल्यावर त्यानी योगा संबंधी अनेक लेख व पुस्तके लिहिली. त्याचा या विषयावरील अधिकार जगन्मान्य झाला. त्यानी १९१४ साली तत्त्वज्ञान आणि अध्यात्म याना वाहिलेले ' आर्य ' नावाचे इंग्रजी मासिक सुरू केले. या मासिकात लिहिलेल्या लेखातूनच ' लाइफ-डिव्हाईन '- दैवीजीवन हा जगप्रसिद्ध ग्रंथ निर्माण झाला. अरविंदाच्या तत्त्वज्ञानाने आकर्षित झालेले लोक त्याच्याभोवती गोळा होऊ लागले. त्याचे शिष्य बनले. त्याच्या शिष्यात जगभरचे अनेक धर्माचे व पंथाचे लोक आहेत. १९२० च्या सुमारास पॉंडिचेरी येथेच अरविंदानी आपला योगाश्रम स्थापन केला. या आश्रमात अनेक साधक जमा झाले. पॉल रिचर्ड नावाच्या फ्रेंच पंडिताची पत्नी श्रीमती रिचर्ड याही एक साधक म्हणून अरविंदाच्या जवळ १९१४ च्या सुमारास येऊन राहिल्या होत्या. त्यानी अध्यात्म विषयात अरविंदाच्या मार्गदर्शनाखाली खूपच प्रगती केली. आश्रमातील साधक त्याना मदर म्हणून संबोधित असत. ' माताजी ' या नावानेच त्या सर्वत्र ओळखल्या जात असत. आश्रमाची सर्व जबाबदारी त्यानीच



श्रीअरविंद

साभाळली. अरविंदांनी बरेच ग्रंथ लिहिले असून काही कविताही लिहिल्या आहेत. ' ल्व्ह अँड डेथ ' हे त्याचे प्रसिद्ध काव्य आहे. ' लाइट्स ऑन योग,' ' दि आयडियल ऑफ दि कर्मयोगिन्', 'योगिक साधना' इत्यादी त्याचे योगावरील ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ऋग्वेद, उपनिषदे, गीता, आणि अध्यात्म–विद्याचे सर्व संप्रदाय स्वतंत्र बुद्धीने अभ्यासून त्यातील गूढ अर्थ आपल्या अभिनव व समृद्ध शैलीने त्यानी माडला आहे. दृश्य सृष्टी, अदृश्य अध्यात्मिक विश्व आणि दैवी-मानवी ध्येयवाद या सर्वांचा परामर्श घेणारे अध्यात्मवादी तत्त्वज्ञान त्यानी नव्या स्वरूपात रचले आहे. त्याच्या तत्त्वज्ञानाचे सार ' पूर्णयोग ' या दोन शब्दात सागता येईल. मानवी जीवात्म्याची दिव्य परमात्म्यामध्ये परिणती होते, तसेच प्राकृत जीवनाची दिव्य जीवनात परिणती होते हे अरविंदाच्या पूर्णयोगाचे उद्दिष्ट आहे. अरविंदाचा सर्व आध्यात्मिक विचार अरविंद दर्शन म्हणून या क्षेत्रात प्रतिष्ठा पावलेला आहे.

३ डिसेंबर १९५० ला श्रीअरविंदानी आपली इहलोकीची यात्रा संपवली. पाँडिचेरीमध्ये त्याच्या आश्रमात अत्यंत साध्या परंतु प्रसन्न वातावरणात श्रीअरविंदाची समाधी आहे. त्याच्या पश्चात जवळजवळ २३ वर्षे माताजींनी त्याचा आश्रम साभाळला. आणि नंतर त्याही निजधामास गेल्या. आश्रमात त्याचीही समाधी आहे. आजही अरविंद आणि माताजी याच्या प्रेरणेने हा आश्रम चाललेला आहे. जगभरचे साधक येथे येऊन राहिलेले असतात आणि शिस्त पाळून व श्रम करून आध्यात्मिक मार्गाची उपासना करीत असतात. आश्रमाची मोठी शेती असून ग्रामोद्योगासारखे उद्योगही येथे चालवले जातात. साधक स्त्रीपुरुष शेतीत व या उद्योगात श्रम करून गरजेच्या वस्तू स्वत तयार करतात. साधनेला अनुकूल असेच येथील स्वच्छ, शात व पवित्र वातावरण आहे. अरविंदाच्या कल्पनेनुसार आत्मविकास साधण्याच्या दृष्टीने सर्वतऱ्हेची अनुकूलता असावी या दृष्टीने मद्रास व पाँडिचेरी या शहराच्या दरम्यान एक आतरराष्ट्रीय नगरी उभारण्याचे काम सध्या चालू आहे. ' ऑरोविल् ' हे या नूतन नगरीचे नाव आहे. भारत व यूनेस्को याच्या व्यतिरिक्त जगातील ५४ देशानी या नगरीच्या निर्मितीसाठी सहाय्य केलेले आहे.

♠ ♠

# काळे पाणी– अंदमान

अंदमान या शब्दावरोबरच काळ्या पाण्याची आठवण होते. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात अनेक देशभक्तांना त्यावेळच्या इंग्रज सरकारने देशद्रोही ठरवून कठोर अशा कारावासासाठी इथे धाडलेले होते. बहुधा जन्मठेपेचीच शिक्षा झालेले कैदी येथे असत.

अंदमान आणि निकोबार या नावाने ओळखला जाणारा ५५० हून अधिक बेटाचा समूह बंगालच्या उपसागरात आग्नेय दिशेला आहे. अनेक शतकापर्यंत या द्वीपसमूहासंबंधी लोकाना काहीच माहीत नव्हते. त्यामुळे ही बेटे अंधारातच असल्यासारखी होती. परंतु आता या संबंधी झालेल्या संशोधनानंतर काही विद्वान अंदमान-दीपसमूहाचे प्राचीनत्व रामायण-महाभारत कालापासून मानतात. रामायणातील काही उल्लेखावरून या द्विपांमध्ये लोकवस्ती होती आणि या द्वीपसमूहाला ' अंगमान ' म्हणत असत असे आढळते. अंगमान येथे राहणारे हनुमान होते. म्हणजेच वानर होते. या आधारावरून हा कपी प्रदेश होतो आणि हनुमान द्वीप या नावाने ओळखला जात होता असे अनुमान काढले जाते. हनुमान याचेच विकृत रूप पुढे अंदमान झाले असावे.

अंदमान द्वीपसमूहामध्ये सुमारे २०० द्वीप आहेत. त्यातील काही फारच लहान आहेत. अंदमान द्वीपसमूहाचे क्षेत्रफळ ६,६८२ चौ. कि. मी. आहे. या द्वीपसमूहाची लांबी ३५२ चौ. कि. मी. असून रुंदी ५२ कि. मी. आहे. या समूहातील सर्वात अखेरचे उत्तरेकडील द्वीप ' लँडफॉल ' या नावाने ओळखले जाते व दक्षिणेकडील अखेरचे द्वीप ' लिटिल् द्वीप ' म्हणून ओळखले जाते.

अंदमान द्वीपसमूह पुढील तीन मुख्य भागामध्ये विभागण्यात येतो. (१) उत्तर अंदमान द्वीपसमूह (२) मध्य अंदमान द्वीपसमूह (३) दक्षिण अंदमान द्वीपसमूह. हे तीनही भाग एकमेकाशी साधलेले नाहीत. याच्या मधेमधे सागराचे

पाणी आहे. परंतु त्यावर पूल बांधून हे तीनही भाग एकमेकाना जोडण्याची योजना आहे. त्या तीनही भागावर लोकवस्ती असून लहानलहान गावेही आहेत.

अंदमान द्वीपसमूहावरील हवामान उष्ण कटिबंधाप्रमाणे आहे. वर्षातील काही महिने येथे वेगवान वारे वहातात. बंगालच्या उपसागरात ही बेटे असल्यामुळे थंडीत फार थंडी व उन्हाळ्यात फार उन्हाळा अशी स्थिती नसते. मे पासून जुलैपर्यंत वादळाचा जोर असतो. या द्वीपावर पाऊसही खूप पडतो. नैऋत्य व ईशान्य या दोन्ही मान्सूनचा येथे पाऊस पडतो.

अंदमान द्वीपसमूहावरील भूमी सुपिक आहे. भरपूर पाऊस आणि चांगली जमिन यामुळे या प्रदेशात सर्वत्र घनदाट जंगल आहे. अलीकडे पुर्नवसनाच्या योजनानुसार काही ठिकाणचे जंगल तोडण्यात आले आहे. या जंगलामधून अनेक प्रकारचे वृक्ष आहेत. काही वृक्ष तर ३० मीटरहूनही जास्त उंचीचे आहेत. या वृक्षाच्या आजूबाजूला व खाली दाट झाडी आहे. हवामान, जमीन व पाऊस याच्या अनुरोधाने सदापर्णी वन, पर्णपाती वन आणि वनस्पती वन अशी तीन प्रकारात या जंगलाची वर्गवारी करण्यात आलेली आहे. या जंगलात निर्माण होणारी संपत्ती ही अंदमान द्वीपातील उत्पन्नाचा मुख्य वाटा आहे. विविध प्रकारचे लाकूड येथे निर्माण होते आणि त्याची निर्यात केली जाते. परंतु दळणवळणाची साधने फारशी उपलब्ध नसल्याने कोट्यवधी रुपयाचे लाकूड नाशही पावते.

प्राचीन काळी येथील जंगलातून राहणारे लोक कंदमुळे खाऊनच राहात असत. १८ व्या शतकापर्यंत त्याना धान्य कसे असते हेच ठाऊक नव्हते. आजही काही वन्य जातींच्या लोकाना धान्य अपरिचितच आहे. हे लोक शिकार, फळे, कंदमुळे आणि समुद्रातील मासे यावरच आपली उपजीविका करतात. १८ व्या शतकाच्या सुमारास अंदमान द्वीपसमूहावरील जमिनीत प्रथमतः शेती करण्यास प्रारंभ झाला. दक्षिण अंदमानमधील पोर्टब्लेअर या भागात ही सुरवात झाली. १८५८ मध्ये येथे बाहेरील कैद्याना आणून ठेवण्यासाठी मोठा तुरुंग बांधण्यात आला. तेव्हापासून त्या कैद्याकडून येथील जंगल तोडून जमीन साफ करण्यात येऊ लागली. काही वर्षानंतर पोर्टब्लेअर भागात ४५,००० एकर भूमी कृषीयोग्य बनवली गेली. या भागात शेती करण्यासाठी कैद्याना पाठवण्यात आले. अशा प्रकारे शेती करणाऱ्या कैद्याची संख्या त्यावेळी ७,००० होती. भात, डाळी, तीळ; ऊस, या पिकांबरोबरच भाजीपाला आणि अननस, आंबे, केळी, संत्री इ. फळ-

झाडाचीही लागवड येथे करण्यात येऊ लागली. चहा, कोको, रबर, नारळ व सुपारी या पिकासाठी येथील जमीन फारच अनुकूल आहे. म्हणून अलीकडे या पिकाच्या बागाही भरपूर वाढलेल्या आहेत.

अदमान द्वीपसमूहामध्ये प्राचीन काळापासूनच आदिम जातीचे लोक वस्ती करून आहेत. क्लॉडियस पटोलगी नावाच्या एका ग्रीक प्रवाशाने दुसऱ्या शतकात या प्रदेशाला भेट दिली होती. त्याने लिहिलेल्या आपल्या प्रवास वर्णनात येथील लोकांचा उल्लेख केलेला असून ते अगदी नग्न अवस्थेत असतात असे लिहिले आहे. या द्वीपावर मूल्यवान शंखाचे विशाल भांडार आहे असेही त्याने म्हटले आहे.

इ. स. ६७२ मध्ये चीनमधील एक बौद्ध यात्रिक मोंक इत्सिंग याने या प्रदेशाची यात्रा केली होती. त्यानेही अंदमान व येथील निवासी याच्याबद्दल लिहून ठेवले आहे.

९ व्या शतकात काही अरब लोकही येथे सोने शोधण्याच्या उद्देशाने आले होते. त्यानीही या प्रदेशासंबंधी व लोकासंबंधी लिहून ठेवले आहे. त्याने येथील लोकाना 'अंगामानियन' असे संबोधिलेले आहे.

मलेशियातील लोक या द्वीपांना 'हन्दुमान' या नावाने ओळखतात. हन्दुमानचे हळूहळू अन्दमान रूप झाले. मलेशियातील लोकाचा येथील लोकाशी घनिष्ट संबंध होता. येथील बहुमूल्य शंख व कवड्या घेण्यासाठी ते लोक येथे वरचेवर येत असत.

इ. स. १२८६ मध्ये मार्कोपोलोने अंदमान बेटांचा प्रवास केला होता. त्याने या प्रदेशाला द्वि-अंगमान म्हटलेले आहे.

इ. स. १३२२ मध्ये फिअर आइरिक हा प्रवासी भ्रमण करीत करीत तेथे आला होता. त्यानंतर १०० वर्षांनी १४३० मध्ये निकोलोकोर्ती नावाचा प्रवासी या प्रदेशात भ्रमण करीत आला होता. त्यानेच या बेटांना सुवर्णद्वीप असे म्हटले आहे. या सर्वच प्रवाशानी येथील आदिवासींचा उल्लेख केलेला आहे. येथील लोक नरभक्षक असून माणसाला पाहाताच ते फाडून खातात असे म्हटलेले आहे. मार्कोपोलेने देखील अंगामनीयन हे एक लांबवर पसरलेले द्वीप असून येथे राहाणारे लोक रानटी अवस्थेतील आहेत. त्याना कोणीराजा अथवा प्रशासक नाही. त्याचे मस्तक, दात आणि डोळे कुत्र्याप्रमाणे असतात. ते नरभक्षक आहेत. मासे, तांदूळ व दूध

यावर ते जगतात, असे म्हटलेले आहे. परंतु येथील लोक नरभक्षक होते हे विधान पूर्णतः काल्पनिक वाटते. कारण येथील लोक रानटी होते परंतु ते नरभक्षक नव्हते. केवळ दुसऱ्या देशातील लोकांच्या तोंडून ऐकल्यावरून या प्रवाशांना त्यांच्याबद्दल असा उल्लेख केलेला असावा. याचे आणखीही एक कारण असे असावे की अंदमान द्वीपसमूह मलेशिया, बर्मा व इंडोनेशिया येथील समुद्री डाकूंचे केंद्र होते. भारत, बर्मा, मलेशिया व इंडोनेशिया यांच्यातील व्यापार जलमार्गाने होत असे. ही बेटे मार्गावरच होती. त्यामुळे समुद्रावर चाचेगिरी करणारे डाकू या ठिकाणी आसरा घेत असत. हे चाचे येथील आदिवासींशी मिळून मिसळून रहात असत. आपल्या कामात अन्य लोकांचा उपद्रव होऊ नये व आपल्या ठिकाणाचा पत्ता लागू नये या हेतूने या डाकूंनीच येथील लोक नरभक्षक आहेत अशा अफवा पसरवलेल्या असाव्यात.



भूतबाधेपासून रक्षण करणाऱ्या मूर्ती

वस्तुतः येथील आदिवासी साधेभोळे आणि सरळ स्वभावाचे होते. बर्मा, इंडोनेशिया व मलेशिया येथील व्यापारी नौकांच्या द्वारा येथे येत जात असत. येथील बरेच लोक दास म्हणून आपल्या देशात घेऊन जात असत. प्राचीन काळी काही राजांनीही इतर प्रदेशावर आक्रमण करताना या प्रदेशाचा उपयोग केला आहे. हस्तीदंत, मसाल्याचे पदार्थ, ढाक्याची मलमल, हिरेमाणके इत्यादी बहुमोल वस्तूंचा व्यापार या मार्गाने चालत असे. या व्यापारी जहाजावर चाचे लोक हल्ले चढवून माल लुटीत असत. हिंदुस्थानात स्थापन झालेल्या ईस्ट-इंडिया-कंपनीचा व्यापारही याच मार्गाने चालत असे. कंपनीच्या जहाजावरही चाचेलोक हल्ला करीत

असत. बंगालच्या उपसागरातील ही चाचेगिरी पुढे इतकी वाढली की ईस्ट-इंडिया कंपनीच्या मोठ्या अधिकाऱ्यांना त्यात लक्ष घालणे भाग पडले. या समुद्री डाकूंचे पारिपत्य करण्यासाठी लॉर्ड कॉर्नवॉलीस याने कॅप्टन ब्लेअर याच्या नेतृत्वाखाली १७८९ मध्ये एक तुकडी अंदमानकडे रवाना केली. कॅप्टन ब्लेअर ज्या बंदरात उतरला त्यालाच पुढे ' पोर्ट ब्लेअर ' म्हटले जाऊ लागले. पोर्ट ब्लेअर हीच अंदमान निकोबार द्वीपसमूहाची राजधानी होय. याचा कलकत्ता-मद्रास याच्याशी सागरी संबंध आहे. अंदमानमध्ये येण्यासाठी कलकत्ता व मद्रास येथूनच बोटी सुटतात. मद्रास ते पोर्ट ब्लेअर हे अंतर १,१९१ कि. मी. आहे, तर कलकत्ता ते पोर्ट ब्लेअर हे अतर १,२५५ कि. मी. आहे. अंदमानात येण्यासाठी जहाजाने चार दिवस लागतात.

१८५७ सालच्या स्वातंत्र्यलढ्यात जन्मठेपेची शिक्षा झालेल्या स्वातंत्र्य-वीरांना ब्रिटिशांनी पोर्ट ब्लेअर येथील सेल्यूलर तुरुंगात आणून ठेवले होते. तेव्हा-पासून पुढे जवळ जवळ ६० वर्षे पर्यंत अंदमानचा हा सेल्यूलर तुरुंग ' काळेपाणी ' या नावाने ओळखला जात असे. या तरुंगात, राजकीय कैद्यांना अत्यंत अमानुष अशी वागणूक दिली जात असे. नाना प्रकारांनी त्याचा छळ केला जात असे. छळाच्या जाचाने त्रासून गेलेले कैदी मग प्राणावर उदार होऊनही प्रसंगी प्रति-कारही करत असत. १८७२ साली हिंदुस्थानचा व्हॉइसरॉय लॉर्ड मेयो हा एकदा तेथे गेला असताना छळाला कंटाळलेल्या एका कैद्याने तेथे त्याचा खून केला होता. स्वातत्र्यवीर सावरकर, त्याचे बंधू, भाई परमानंद, महावीरसिंह, सन्याल बंधू इत्यादी शेकडो भारतीय क्रांतीकारक देशभक्तांना ब्रिटिशांनी येथेच काळ्यापाण्यावर धाडले होते. मंडालेच्या तुरुंगात नेताना लोकमान्य टिळकानाही येथे ठेवले होते असे म्हणतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अंदमान द्वीपसमूह जपानी सैनिकाच्या ताब्यात गेला होता. त्यावेळी जपानने येथे भयंकर स्वरुपाचा बॉम्बवर्षाव केला होता. जपानी प्रशासन सुरू झाल्यावर जपानी ॲडमिरलने सर्व कैद्यांना सोडून दिले आणि जिथे मोकळी जागा दिसेल तेथे त्यानी शेती करावी असा आदेशही दिला. काही कैद्यांकडून रस्ते तयार करण्याचे काम केले. काही कैद्याकडून विमानतळही बाधून घेतला. १९४३ सालच्या २९ डिसेंबरला आझाद हिंद संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्र बोस याचे येथे भव्य असे स्वागत करण्यात आले. जपानी ॲडमिरल आणि सुभाषबाबू याच्यामध्ये अंदमान निकोबार ही बेटे लवकरात लवकर आझाद

हिंद फौजेच्या अस्थायी सरकारच्या ताब्यात द्यावीत असे ठरले होते. सुभाषचंद्र बोस यानीच सर्वप्रथम येथील तुरुंगावर भारताचा तिरंगी झेंडा फडकविला आणि त्यानीच अंदमान बेटाचे ' शहिद ' व निकोबारचे ' स्वराज्य ' असे नाव ठेवले.

दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाल्यावर ७ फेब्रुवारी १९४५ रोजी पुनश्च इंग्रजाची सत्ता अंदमान द्वीपसमूहावर नादू लागली. परंतु त्यानंतर लवकरच १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व त्याचबरोबर अंदमान–निकोबार द्वीपसमूह स्वतंत्र होऊन भारतीय संघराज्यात दाखल झाला.



अंदमानातील घर

या द्वीपसमूहाला चतुर्थ श्रेणीच्या राज्याचा दर्जा देण्यात आला असून केंद्र-शासित प्रदेश म्हणून भारताच्या राष्ट्रपतीचा अंमल तेथे चालतो. अलीकडच्या काळात अनेक निर्वासिताचे पुनर्वसन भारत सरकारने तेथे केले आहे. काळेपाणी म्हणून कुप्रसिद्ध झालेला सेल्यूलर जेल आता एका मोठ्या रुग्णालयात रूपातरीत झालेला आहे.

या भागातील अनेक लहान लहान बेटामधून लोकवस्ती असून तेथे मूळचे

आदिवासी आढळतात. या आदिम जमातीतील लोक मलेशियातील सन्मग आणि फिलिपाईनमधील ऐटा जातीतील लोकांशी पुष्कळसे मिळतेजुळते दिसतात. हे लोक रंगाने काळे असून त्यांची कातडी जाड असते. अंदमानी, औंगी, जरावा आणि सेंटिनली अशा चार प्रमुख जमाती याच्यात आढळतात. अंदमानातील हे मूळ रहिवासी जगातील प्राचीनतम आदिम जमातीचे उदाहरण म्हणून दाखवता येतात. या सगळ्या जमातीतील लोक मागासलेल्या स्थितीत जगत आहेत. शिकार करणे, मासे मारणे आणि जंगलातील कंदमुळे गोळा करून कशीबशी उपजीविका करणे, एवढेच त्याना ठाऊक होते. त्यासाठी त्याना भटके जीवन जगावे लागत असे. हे लोक धनुष्यबाण जवळ बाळगतात व ते तिरंदाजीत निष्णात आहेत. परंतु अलिकडे त्यानाही स्थिर करण्यासाठी व त्याच्यातही सुधारणा करण्यासाठी सरकारी पातळीवरून बरेच प्रयत्न सुरू झाले आहेत. शिक्षा झालेल्या अनेक कैद्याची कुटुंबे तेथेच स्थायिक झालेली आहेत व भारतातील कित्येक निर्वासित तेथे वसाहतीसाठी गेलेले आहेत. ह्या लोकानी तेथे शेतीभाती व इतर उद्योगधंदे सुरू केलेले आहेत. या लोकाच्या संपर्काने तेथील आदिवासी आता सुधारू लागले आहेत. ते आता गवताच्या झोपड्यातून रहातात, शेती करतात, जंगलातील बांबू, लाकूड, वेत याच्यापासून विविध तऱ्हेच्या वस्तू बनवतात. त्याचबरोबर शिकार व मच्छिमारीही करतात. याचा धर्म असा नाही परतु भूतपिशाच्चावर याचा विलक्षण विश्वास असतो. मृत्युनंतर माणूस पिशाच्च योनीत जातो असे ते मानतात. बाहेरून आलेल्या लोकामध्ये सर्व धर्मांचे व जातीजमातीचे लोक आढळतात येथे हिंदूंची मंदिरे आहेत, मुसलमानाच्या मशिदी आहेत, खिश्चनाची चर्चेसही आहेत. त्याचबरोबर बौद्धाचे मठही आहेत. परंतु हे सर्वधर्मीय लोक येथे मिळून मिसळून रहातात. हिंदु व मुसलमान याच्यात येथे रोटीबेटी व्यवहारही चालतो. येथील मुसलमान हिंदूच्या मंदिरात भक्तिभावाने जाऊन प्रसाद ग्रहण करतात. हिंदूही मुसलमानाच्या मशिदीत तेवढ्याच श्रद्धेने जातात. बंगाली-मद्रासी, मद्रासी-मराठी, गुजराती-पंजाबी असे विवाहसंबंध येथे सहज घडून येतात. जातीभेद, धर्मभेद आणि प्रांतभेद येथे आढळत नाहीत. या दृष्टीने अंदमान हे द्वीप भारताची अनेकतेमधील एकता सिद्ध प्रकट करून दाखवते.

लिटिल् अंदमानात औंगी लोकांची वस्ती विशेष आहे. यांचा अनेक शतकापर्यंत बाह्य जगाशी संबंध नव्हता. त्यामुळे पूर्वी हे लोक बाहेरच्या व्यक्तींवर तुटून पडत असत. परंतु आता त्याच्यातही परिवर्तन झाले आहे. त्याच्यापैकी काही लोक

रटलँड द्वीपावरही रहातात. ओंगी लोक कुत्रा हाच एकमेव प्राणी पाळतात. प्रत्येक कुटुंबाजवळ १५–२० कुत्री असतात. हे लोक झोपडीत रहातात. चांगल्या मजबूत बनवलेल्या झोपडीला ‘ बश ’ आणि साधारण झोपडीला ‘ कोराले ’ म्हणतात. भटक्या वृत्तीचे हे लोक सामान्यपणे १५ दिवसाच्यावर एकेठिकाणी रहात नाहीत. हे लोक स्वभावाने भोळेभाबडे आहेत. त्याच्या गरजाही कमी असून त्या प्रदेशात उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवरच ते निभावून नेतात. गोड्या पाण्यासाठी ते नदीनाल्यांवर विसंबून असतात आणि जेथे गोडेपाणी मिळत नाही तेथे आपल्या झोपडीपुढेच विहिर खोदतात. एक मीटर खोलीवर गोडेपाणी लागते.

सामाजिक सुव्यवस्था व संरक्षण यासाठी प्रत्येक समुदायाचा एक मुखिया असतो. त्याला राजा म्हणतात. राजा सर्वांवर अंकूश ठेवतो, पण लोकांच्या स्वातंत्र्याला कधी बाधा आणीत नाही. हे लोक बिनसाखरेचा व बिनदुधाचा चहा



पोर्टब्लेअरचा समुद्रकिनारा

पितात. शेतीवाडीशी याचा फारसा संबंध नाही. रोजच्या आहारासाठी बहुतेक लोक बाणाच्या साहाय्याने माशाची शिकार करतात. अलीकडे बांबूच्या व वेताच्या टोपल्या, बादल्या इत्यादी वस्तू ते बनवू लागले आहेत. याच्यामध्ये बालविवाहाची प्रथा आहे. विवाहाच्यावेळी हे लोक एकत्र येऊन आनंदाने नाचगाणे करतात.

जरावा जातीचे लोक मध्य व दक्षिण अंदमानातील जंगलात रहातात. हे लोक रानटी व उपद्रवी आहेत. त्याना माणसाळण्याचे बरेच प्रयत्न आजवर करण्यात आले. हे लोक नग्नावस्थेतच रहातात.

सेन्टिनली जमातीचे लोकही असेच जंगली आहेत. जरावा जमातीमधीलच सेन्टिनली द्वीपावर पोहोचलेले हे लोक आहेत असे म्हटले जाते.

पोर्टब्लेअर शहर हे या प्रदेशाची राजधानी असून निसर्ग सौंदर्य व हवामान या दृष्टीने उत्कृष्ट ठिकाण आहे. या शहराची उभारणी प्रथमत. भारतातून आणलेल्या लोकाच्या मार्फत झाली. नंतर जसजसे आधिकाधिक लोक येऊ लागले, तसतसे त्यांना पोर्ट ब्लेअरच्या आसपासच्या भागात वसविण्यात आले. ‘ अब्रबिन ’ नावाचे ठिकाण सर्वांत प्रथम वसविले गेले. पोर्ट ब्लेअर शहराची स्थापना व विस्तार फार सुंदर रीतीने करण्यात आलेला आहे. याच्या चोहोबाजूला खाड्या असून जमीन उंचसखल आहे. रस्ते सर्पाकार वळणावळणाचे आहेत. भारतामधील पहाडी नगरामध्ये पोर्ट ब्लेअरची गणना केली जाते. हेडो, दिलानीपूर, फॅनेक्सने, इत्यादी पोर्ट ब्लेअर शहराचेच भाग आहेत. सरकारी कर्मचारी व अन्य नोकर-पेशातील लोक येथे रहातात. अब्रबीन हा भाग व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. या देशातील सर्व द्वीपाचा व्यापार या ठिकाणाहून चालतो. या भागातील वस्ती दाट असून दुकाने, विश्रातीगृहे, सिनेमा, पोस्टऑफीस इत्यादी या भागातच आहेत. बाजारपेठेतील मध्यभागी स्मृतीस्तंभ आहे. १८५७ पासून स्वातंत्र्य लढ्यात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना येथल्या काळकोठडीत ज्यानी आपले जीवन समाप्त केले त्या हुतात्म्याची नावे या स्तंभावर लिहिलेली आहेत.

प्रोथेरोपूर पहाडगाव, मेभियो, ही या भागातील काही आणखी गावे आहेत. चयामद्वीप हे पोर्ट ब्लेअरचे बंदर आहे. येथे प्रचंड असा लाकडाचा कारखाना आहे. रोस, रायपर, नील, हॅवलॉक इत्यादी बेटे आसपास आहेत.

♠ ♠

# द्वीपसमूह– निकोबार

निकोबार द्वीपसमूहात लहान मोठे सुमारे ६२ द्वीप आहेत. परंतु त्यात केवळ १९ द्वीप प्रमुख आहेत. बंगालच्या खाडीत ही बेटे आहेत. निकोबार द्वीपसमूहाच्या पश्चिमेळा विशाल सागराच्या पलीकडे भारताची मुख्य भूमी येते. उत्तरेला अंदमान द्वीपसमूह असून पूर्वेला मलेशिया व दक्षिणेला इंडोनेशिया हे देश आहेत. निकोबार द्वीपसमूहामध्ये ग्रेट निकोबार हे द्वीप सर्वात मोठे आहे. उत्तर, मध्य व दक्षिण अशा तीन भागात या द्वीपसमूहाचे विभाजन केले जाते. उत्तर भागात कारनिकोबार, चौवडा, त्रासा, बम्पोका, बत्तीमाली, बिलंगचौंग आणि कमोरता ही बेटे येतात. मध्यभागात नानकोवरी, त्रिकंट आणि कच्चल ही बेटे येतात तर दक्षिण भागात ग्रेट निकोबार, लिटिल् निकोबार, कुल्लोमिलो, कोंडुल, मेंचल, कबरा, ट्रेक, आणि ट्रेयस ही बेटे येतात.

कार निकोबार बेटाचे स्थानीय नाव पु असे आहे. या द्वीपाची लोकसंख्या ९,८७९ इतकी आहे. येथे बरीच दाटवस्ती असून निकोबार द्वीपसमूहापैकी ⅓ लोकवस्ती येथेच आहे. येथील जमीन सुपीक असून समुद्र तटावर नारळाच्या मोठमोठ्या बागा आहेत. येथील लोकाना 'निकोबारी' या नावाने ओळखले जाते. हे लोक आपापल्या समाजामध्ये विखुरलेले असून मस, बिगलापती, चुकचुकीया, मलाका, पेरका इत्यादी पंधरा प्रमुख गावात त्यांची वस्ती आहे. ही गावे समुद्रतटावर वसलेली आहेत.

निकोबार द्वीपसमूहामध्ये निकोबारी आणि शोमपेन या दोन जमातींचे आदिवासी लोक प्रामुख्याने रहातात. त्यांच्या शिवाय सरकारी मजूर व व्यापारी लोकही येथे वस्ती करून आहेत. निकोबारी लोक या प्रदेशातील वेगवेगळ्या बेटावर पसरलेले आहेत. त्याची लोकसंख्या १७ ते १८ हजार इतकी आहे. एकेकाळी हे सर्व लोक एकाच परिवारातील सदस्य होते. परंतु वाढती लोकसंख्या आणि परपरातील

मतभेद यामुळे ते वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन राहिले. निकोबारी हे मूळचे कोण व या प्रदेशात केव्हा आले या संबंधी निश्चित अशी माहिती उपलब्ध नाही. परंतु कित्येक शतकापूर्वी हे लोक येथे आलेले आहेत. निकोबारी लोक मोठे चतुर आहेत. एखादी भाषा ते चटकन ग्रहण करतात. राहाणी, वेशभूषा इत्यादींचेही अनुकरण ते लवकर करू शकतात. हे स्वभावाने शांत आणि निर्मळ आहेत. कुठलेही काम करण्यास याना संकोच वाटत नाही. हे लोक मध्यम उंचीचे आणि धट्टेकट्टे



निकोबारी घर

असतात. याची त्वचा कोमल असते. नारळाच्या तेलाचा वापर हे अंगाला लावण्यासाठी करतात. याना सुपारी खाण्याची फार आवड असते. निकोबारी स्त्रिया घरकामात हुषार असतात. या लोकाचे मुख्य अन्न म्हणजे नारळ, मासे आणि मांस हेच आहे. अननसाप्रमाणे पाडुनस निरम् नावाचे एक फळ या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर तयार होते. नारळ व पाडुनस याचा आस्वाद भूकेच्यावेळी हे लोक घेत असतात. अलिकडे निकोबारी लोकांच्या जेवणात भात, रोटी, डाळ, साखर, चहा, मसाले, तेल, तूप, याचाही प्रादुर्भाव झालेला आहे. गाई व म्हशी याची कमतरता असल्यामुळे दुधाचा उपयोग हे लोक फारच

कमी करतात. चहाचे हे लोक फार शौकिन आहेत, पण हा चहाही बिनदुधाचा असतो. नारळाच्या पाण्यानेच हे लोक आपली तहान भागवतात. सुपारी, तंबाखू आणि विडी ही व्यसने स्त्री-पुरुषाना असतात. ते स्वतःच विड्या बनवतात, त्याना ते ' पोप ' म्हणतात.

निकोबारी लोकाची घरे समुद्राच्या काठी जमिनीपासून ७ ८ फूट उंचीवर झोपडीसारखीच बांधलेली असतात. त्याची घरे व घरापुढचा परिसर अतिशय स्वच्छ ठेवला जातो. डुकरे, बकऱ्या, कोंबड्या व गाई ही जनावरे ते पाळतात.

निकोबारी लोकाचा मूळ धर्म कोणता हे सागणे कठीण आहे. भटकत भटकत हे लोक या ठिकाणी आले. त्याच्याजवळ काहीच चीज वस्तू नव्हत्या. येथे आल्यावर गवत आणि पालापाचोळ्यावरच ते आपले काम भागवत असत. त्यामुळेच येथे आलेल्या प्रवाशानी नग्नलोकाची भूमी असे या भागाचे वर्णन केलेले आहे. अशास्थितीत ते कोणत्या एका विशिष्ट धर्माचे अनुयायी नव्हतेच. मिशनरी लोकानी याचा फायदा ख्रिस्ती धर्म प्रचारासाठी करून घेतला. त्यानी कारनिकोबार येथे मिशनरी स्कूल उघडले. तेथे इतर शिक्षणापेक्षा ख्रिस्ती धर्माचेच शिक्षण प्रामुख्याने दिले जाई. थोडक्याकाळातच त्यानी सपूर्ण द्वीपावर तेथील लोकाना ख्रिस्तीधर्माची दिक्षा दिली. त्यानंतर या प्रदेशात सुमारे ९८% लोक ख्रिस्तीधर्माचेच झालेले आहेत. उर्वरित २% लोक मुसलमान आहेत ते बाहेरूनच, विशेषतः लक्षद्वीपावरून आलेले आहेत. त्याच्यापैकी काहींनी निकोबारी मुलीशी विवाह केला व नंतर ते हळूहळू निकोबारी समाजातच सामावून गेले. अन्य द्वीपावरील मात्र लोक एवढ्या प्रमाणावर ख्रिस्तीधर्मीय बनले नाहीत. निकोबारी द्वीपसमूहामध्ये हिंदुधर्मीय लोक जवळजवळ नाहीतच. संपूर्ण द्वीपावर फक्त दोन हिंदू होते. एक नानकोवरी द्वीपाची राणी लक्ष्मी व दुसरी कच्चल द्वीपाची राणी चंगा. राणी चंगाने मोठ्या परीश्रमाने ' वेस्ट बे कच्चल ' या ठिकाणी एक मंदिर उभारले. या दोन्ही राण्या हिंदु असून त्याची मुले मात्र इस्लामी आहेत. याचे कारण ह्या लोकाना धर्माचा अर्थच समजला नसावा किंवा कोणत्याही धर्मावर या लोकाचा विश्वास नसावा.

निकोबार द्वीपातील लोकाची जी बोलभाषा आहे त्याला ' निकोबारी ' म्हणतात. ही केवळ एक बोलीभाषा असून तिच्यात साहित्य वगैरे नाही. या भाषेचे सामर्थ्य व शब्दसपत्तीही तोटकी आहे. व्यवहारापुरते शब्द या भाषेत असून पुष्कळसे

शब्द विदेशी व भारतीय भाषेतून त्यांनी घेतलेले आहेत. कित्येक शतकापासून निकोबारी लोक दूरदूरच्या देशात जाऊन व्यापार करीत असत. ब्रह्मदेश, इंडोनेशिया, विशेषत: जावा, सुमात्रा, व मलेशिया, त्याचप्रमाणे मुख्य भूमी भारत या देशाशी त्यांचे बरेच दळणवळण आहे. या प्रदेशातील भाषामधूनही बरेच शब्द निकोबारीत आले आहेत. त्यांच्या वापरातील कित्येक वस्तूंना अद्यापही उल्लेखण्यासारखे शब्द नाहीत. ज्या गोष्टी अथवा वस्तू नव्यानेच त्यांच्या जीवनात आल्या त्या अशा बिननावानेच वापरल्या जाऊ लागल्या. उदाहरणार्थ मीठ याला निकोबारी भाषेत शब्द नाही. कारण पूर्वी हे लोक मिठाऐवजी समुद्राचे पाणीच वापरत असत.



निकोबारी जोडपे

आजकालच ते मिठाचा वापर करू लागले आहेत. या भाषेला प्रारंभापासून लिपी

नव्हती, परंतु पुढे व्यवहारात लिहिण्यासाठी लिपीची गरज भासू लागली. तेव्हा मिशनरी प्रचारकानी रोमन लिपीचा वापर करायला सुरुवात केली. काही लोक आता रोमन लिपीच लिहीण्यासाठी उपयोगात आणतात. परंतु नानकोवरी, कचल, त्रासा, कमोरता आणि चोवडा या द्वीपामधील लोकाचा रोमन लिपीशी मुळीच परिचय नाही. हे लोक फक्त कामचलाऊ निकोबारी बोलतात. या व अन्य काही द्वीपावरील लोकाच्याही आपल्या अन्य अन्य बोली भाषा आहेत. अर्थात त्यांनाही लिपी वगैरे काही नाही. तथापि हिंदी भाषा बहुतेकाना कळते.

निकोबारी लोकामध्ये अंधविश्वास आणि विचित्र रितीरिवाज प्रचलित आहेत. निकोबारी समाजात 'मेनगुना' याचे महत्त्व सर्वश्रेष्ठ मानले जाते. मेन-गुना म्हणजे वैद्य किंवा मान्त्रिक असतो. तो वनस्पती आणि मंत्रतंत्र याच्या सहाय्याने लोकाचे रोग घालवतो. हे लोक प्रेतात्माला फार घाबरतात. प्रेतात्मा येऊनच लोकाना आजारी पाडतो किंवा ठार मारतो अशी त्याची श्रद्धा आहे. मेनगुना आपल्या मंत्रतंत्राच्या सहाय्याने प्रेतात्माला काबूत ठेवतो किंवा पळवून लावतो असा या लोकाचा विश्वास आहे. त्यामुळे गावच्या मुखियापेक्षाही या मेनगुनाचा अधिकार जास्त श्रेष्ठ मानला जातो. माणसाचा हात पाहून मेनगुना खरे-खोटे शोधून काढू शकतो.

एखाद्या व्यक्तीने नारळ, सुपारी अथवा अन्य प्रकारच्या बागा तयार करून त्यावर अनेक वर्षे आपला निर्वाह चालवल्यावर त्याच्या पश्चात त्याच्या जवळच्या वारसाला त्या बागाची मालकी मिळते. चोरी आणि बेईमानी या लोकाच्यात मुळीच नाही. त्यामुळे कधी कुणाच्या घराला कुलूप दिसत नाही. ज्याच्याजवळ रहायला चागले घर आहे, एक मोठी आणि एक छोटी अशा दोन नावा आहेत, फळे आणि भाजीपाल्याचा बगीचा आहे, नारळाची पुष्कळशी झाडे आहेत त्याच प्रमाणे कुत्री, कोंबड्या, डुकरे इत्यादी पाळीव जनावरे आहेत, अशा इसमाला श्रीमंत समजून सामाजिक प्रतिष्ठा लाभते. दत्तक घेण्याचीही प्रथा निकोबारी समाजात आहे. प्रसंगी मुलाला विकतही घेतले जाते. दुसऱ्या द्वीपावरूनही अशी चागली मुले विकत आणली जातात. ही प्रथा कारनिकोबार, त्रासा आणि बम्पोका या द्वीपावर रूढ आहे. जन्म आणि मरण या दोन्हीसाठी निकोबारी लोक काही विशेष विधी करतात. याच्यात प्रसूतीगृहे असतात व ती स्मशानाच्याजवळ असतात.

जेथे जन्म तेथेच मृत्यू अशी त्यामागली भावना आहे. मुलगा ५ वर्षांचा होईपर्यंत त्याला व त्याच्या आईला मासे खाण्यास मनाई असते. यांच्यात बालविवाह प्रचलित असून विवाहाच्यावेळी हुंडा देण्याची प्रथा नाही. विवाहाच्या वेळी नातलगाना व मित्रांना मोठी मेजवानी दिली जाते. तिला 'विगैंज' म्हणतात. विगैंजनंतर विवाह विधी होतो. विगैंजच्या-वेळी मुलीचा बाप नवऱ्यामुलाची परीक्षा घेतो. त्यावेळी त्याला नौका बनवणे, झोपडी तयार करणे, लोकगीत गाणे, इत्यादी कामे सांगितली जातात. पुनर्विवाहाची प्रथाही या समाजात रूढ आहे. स्त्री व पुरुष याना समान मानले जाते.



निकोबारी तरुणी

निकोबारी समाजामध्ये सण, समारंभ साजरे केले जातात. या वेळी गाणे, बजावणे, खेळ, नाच, मल्लयुद्ध किंवा नौकाची शर्यत इत्यादी विविध प्रकारचे कार्यक्रम उत्साहाने केले जातात. 'ओत्यो' नामक सणाच्यावेळी समुद्र तटावर बांधलेल्या घराच्यापुढे लोक मोठमोठे दंडे पुरतात. ते खूप सजवले जातात व त्यावर झेंडे फडकविले जातात. गावात कोणी फार आजारी पडला तर 'हा-नगोक-मत्ताई' नावाचा सण साजरा करून जेवणावळ घालतात. नव्या मेनगुनाच्या परिचयाच्यावेळी व अधिकार ग्रहणाच्या-वेळी 'मै-फैया' नावाचा समारंभ साजरा करण्यात येतो. नवे घर बांधल्यावर

किंवा जुन्या घराचे नूतनीकरण केल्यावर ‘है–चुअल’ नावाचा समारंभ साजरा करण्यात येतो. आणखीही बरेच सण–उत्सव साजरे केले जातात.



निकोबारी कुटुंब

मनोरंजनासाठी निकोबारी लोकामध्ये नौकाची शर्यत हा खेळ फार प्रिय आहे. या खेळात गावातील सर्व लोक भाग घेतात. सर्वजण आपापल्या नौका विशिष्ट पद्धतीने सजवतात. शर्यतीत प्रथम येणाऱ्याला पारितोषिक दिले जाते. गावात त्याला प्रतिष्ठा लाभते. शर्यती संपल्यावर मोठा उत्सव साजरा केला जातो. त्या-दिवशी रात्रभर गाणे-बजावणे चालते. त्याशिवाय कुस्ती, तिरंदाजी, भालाफेक आणि रानडुकराशी युद्ध इत्यादी प्रकारचे खेळही या लोकात प्रसंगानुरूप चालतात.

नृत्य आणि संगीत या लोकाना फार प्रिय आहे. सर्व आनंदाच्या प्रसंगी नृत्यसंगीताची योजना असते. मुलींना नृत्य आणि मुलाना नवीन नवीन गाणी म्हणता यावी लागतात. ज्याला उत्कृष्ट नृत्य करता येते व ज्याला उत्तम गाणे येते त्याना गावात प्रतिष्ठित मानले जाते. अलीकडे फुटबॉल व व्हॉलीबॉल या खेळातही इकडील तरुण मंडळी निष्णात बनली आहेत.

निकोबारी लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच असून नारळ, सुपारी,

आदि फळे आणि भाजीपाला इत्यादींची लागवड ते करतात. याशिवाय नारळाचे तेल काढणे, पशुपालन, मच्छीमारी, नौका तयार करणे, चटया व टोपल्या तयार करणे, शंख-शिंपल्याच्या वस्तू बनविणे, हे उद्योगही चालतात. शिक्षणाचा प्रसार अलीकडे बराच होऊ लागला आहे. त्यामुळे रहाणी, वेश इत्यादी मध्येही बदल होऊ लागला आहे. भारताच्या विकास योजनामध्ये या प्रदेशाचा अंतर्भाव असून विविध विकासयोजना येथे कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यात शिक्षण, आरोग्य, गृहरचना, आदिवासी कल्याण, दळणवळणाची सुव्यवस्था, शेतीला साहाय्य, व्यापार इत्यादी प्रकारच्या बऱ्याच योजना आहेत. त्यामुळे लोकाचे जीवनमानही उंचावण्यास मदत झाली आहे

बाहेरून आलेल्या किंवा आणवलेल्या निर्वासितासाठी नवीन वसाहती वसवण्याच्या योजनाही कार्यान्वित झालेल्या आहेत.

# द्वीपसमूह–लक्षद्वीप

बाहेरच्या जगापासून बराच कालपर्यंत उपेक्षित राहिलेली काही बेटे भारताच्या पश्चिमेला अरबी समुद्रात आहेत. लक्षद्वीप, मिनीकाय, आणि अमीनदीवी या नावाने या बेटांचा समूह ओळखण्यात येतो. लहानमोठी अशी ही सुमारे १९ बेटे असून मलबारच्या समुद्रतीरापासून सुमारे २०० मैल अंतरावर ही दाक्षिणोत्तर पसरलेली आहेत. 'लक्षद्वीप' या नावानेच आता ही सर्व बेटे ओळखली जातात. लक्षद्वीप याचा अर्थ लाख द्वीपाचा समूह असा असला तरी प्रत्यक्षात येथे तेवढी बेटे नाहीत. एकोणीस द्वीपाचे क्षेत्रफळ सुमारे ११ चौ. मैल आहे. या एकोणीस द्वीपापैकी मिनीकाय, कालपेनी, अंद्रोथ, अगाती, कावार्ती, आमिनी, काडमात, छेतलत, किल्तन आणि बितरा ही दहा बेटेच प्रमुख आहेत आणि यावरच लोकवस्ती आहे. या द्वीपसमूहावरील लोकसंख्या ३१,७९८ इतकी असून या बेटावरील राज्यकारभार कवार्थी अथवा कावार्ती येथे आहे. या ठिकाणची लोकसंख्या २,८२८ इतकी आहे. या बेटामधील अंतर २० मैलापासून ११४ मैलापर्यंत आहे. या द्वीपमालेच्या दक्षिण टोकाला मिनीकाय हे बेट असून उत्तर टोकाला चेत्तीलात्तू हे बेट आहे. ही बेटे अगदी लहान लहान आहेत त्याची लांबी एक मैलाहून अधिक नाही. या बेटाची समुद्रसपाटीपासून उंची २० ते ३० फूटाहून अधिक नाही. प्रत्येक बेट अर्धचंद्राकाराचे आहे. भौगोलिक दृष्ट्या ही बेटे राजस्थान व गुजरात या राज्यातून खंबायतच्या खाडीतून पुढे समुद्रात घुसलेल्या अरवली पर्वताच्या डोंगररांगेपैकीच आहेत असे मानण्यात येते. या द्वीपसमूहावर डोंगर अथवा नद्या नाहीत. या बेटावर जाण्यासाठी कालीकत व कोचीन या बंदरांतून जहाजाने जावे लागते.

या द्वीपसमूहाला भूगोल असला तरी इतिहास मात्र नाही. जो थोडाफार इतिहास म्हणून मागितला जातो, तो आख्यायिका व दंतकथा अशा स्वरूपाचा आहे. प्राचीन काळी केरळमधील काही हिंदू सर्वप्रथम या बेटांवर जाऊन राहीले होते असे

सांगितले जाते. त्यानंतर काही वर्षांनी ओबेदुल्ला नावाचा एक सुफी फकीर अरबस्तानातून या भागात आला होता आणि त्यानेच येथील रहिवाशांना इस्लाम धर्माची दिक्षा दिली. एकदा कन्नानौर येथील राजा चिराकल याने या बेटावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती, अशीही एक आख्यायिका आहे. परंतु त्या राजानेही काही काळानंतर ही बेटे अली नावाच्या एका मोपला सरदाराला ६,००० पनम्सला विकून टाकली. 'पनम' हे एक नाणे त्यावेळी रूढ होते. एक पनम म्हणजे आजचे २५ पैसे एवढे त्याचे मूल्य होते. येथील सर्व लोक मोपला नामक मुसलमान जमातीचे झाले असावेत. मोपला नावाची मुसलमान जमात आजही केरळात आहे. १६ व्या शतकात काही काळपर्यंत या बेटावर पोर्तुगीजांची सत्ताही होती. १७८७ मध्ये मंगलोर ताब्यात घेतल्यानंतर टिपू सुलतानाने पोर्तुगीजांना हुसकून लावून अमिनी द्वीपावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. परंतु १७९९ मध्ये टिपूचा पाडाव झाल्यावर श्रीरंगपट्टणम् ही टिपूची राजधानी ईस्ट-इंडिया कंपनीच्या ताब्यात गेली आणि त्याच्याबरोबर अमिनी द्वीपावरही कंपनीची सत्ता नांदू लागली. १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत या द्वीपसमूहावर ब्रिटिशांचीच सत्ता होती. असेही म्हटले जाते की अली राजाच्या वंशजाने हा टापू एक लाख रुपयाच्या बोलीने ईस्ट-इंडिया कंपनीकडून ठेक्याने घेतला होता. परंतु त्याच्याकडून एक लाख रुपये वसूल न झाल्याने ब्रिटिशांनी हा भाग परत आपल्या ताब्यात घेतला. या लाखाच्या व्यवहारावरूनच या द्वीपांना लक्षद्वीप नाव पडले असे म्हणतात. १९०८ साली ही बेटे ताब्यात घेतल्यानंतर याच्या उत्तर भागाची व्यवस्था दक्षिण कॅनरा जिल्ह्याच्या कलेक्टरकडे आणि दक्षिण भागाची व्यवस्था मलबार जिल्ह्याकडे सोपविण्यात आली होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही राज्य पुनर्रचना होईपर्यंत मद्रास राज्याच्या अंतर्गतच हा टापू होता. ही सर्व बेटे केरळ राज्यातच अंतर्भूत करावीत अशी शिफारस राज्य पुनर्रचना मंडळाने केलेली होती, परंतु दळणवळणाच्या साधनाचा अभाव आणि या टापूवरील सर्व तऱ्हेचे मागासलेपण लक्षात घेऊन केंद्रसरकारने ती शिफारस मान्य केली नाही आणि हा टापू केंद्रशासित प्रदेश म्हणूनच ठेवण्याचा निर्णय करण्यात आला; त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ पासून ही बेटे केंद्रशासित प्रदेश म्हणून अस्तित्वात आली. या प्रदेशाची व्यवस्था राष्ट्रपतीने नियुक्त केलेल्या एका अधिकाऱ्यामार्फत चालते. या भागाच्या तर्फे एक प्रतिनिधी भारताच्या लोकसभेत बसतो. या टापूवरील लोक समुद्रसानिध्यामुळे साहाजिकच धाडसी व दर्यावर्दी आहेत. मच्छीमारी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. मच्छीमारीसाठी आणि

केरळमध्ये जाण्यायेण्यासाठी याना लहानलहान होड्यांचाच वापर करावा लागतो. त्यामुळे नौका बांधण्याचा धंदाही येथे चालतो. नौका बांधण्यात हे लोक फार कुशल आहेत. आपल्या नौकातून हे फार लांबचा प्रवास करतात. या बेटावरील लोक इस्लाम धर्मीय असले तरी त्याची रहाणी व रीतीरीवाज हे मलबारमधील हिंदूंप्रमाणे जवळजवळ आहेत. शेकडो वर्षांपूर्वी मलबारमधूनच ते तिकडे गेलेले होते. त्यांच्यामध्ये मातृकुलीय पुत्राधिकार मानण्याची पद्धत आहे. त्या प्रथेला ते 'मारुमक्कतयम्' असे म्हणतात. सामाजिक बाबतींत स्त्रियाना अधिक स्वातंत्र्य आहे.

या टापूत अन्नधान्याची लागवड इतके दिवस केली जात नसे. अलीकडे थोड्याफार प्रमाणात केली जाते. परंतु बाहेरून धान्य आणूनच इथली गरज भागविण्यात येते. इथले मुख्य पीक म्हणजे नारळ हेच होय. सुमारे सात हजार एकर क्षेत्रात नारळीच्या बागा आहेत. लिंबू, केळी इत्यादी फळे येथे होतात. नारळींच्या बागांची वाढ सुधारलेल्या पद्धतीने केली जावी आणि नारळाच्या उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने सरकारी पातळीवरून लोकाना सहाय्य करण्यात येते. मच्छीमारी धंद्यालाही असेच उत्तेजन देण्यात आले असून यांत्रिक नावांमधून अलीकडे मच्छीमारी करण्यात येते. नारळाच्या काथ्यापासून दोर, चटया, इत्यादी वस्तू निर्माण करण्याचा व्यवसायही येथे मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला आहे. ग्रामोद्योगाना चालना देण्यासाठी सरकारी सोसायट्याही बऱ्याच निघालेल्या आहेत.

पूर्वी शिक्षणाची बरीच आबाळ या टापूत होती. परंतु अलीकडे केंद्र-सरकारच्या व्यवस्थापनामुळे बऱ्याच शाळा येथे उघडण्यात आल्या असून ७–८ हजार विद्यार्थी त्यात शिक्षण घेत आहेत. त्यांची गरिबी व मागासलेपण लक्षात घेऊन त्याना शिक्षण मोफत दिले जाते. पुस्तके व इतर शिक्षणाची साधनेही फुकट पुरवली जातात. तसेच तेथील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येथून ज्यावेळी बाहेर जातात तेव्हा त्याना तेथे वसतिगृहाची व्यवस्था फुकट केली जाते. मेडिकल व इंजिनिअरींग महाविद्यालयातून यांच्यासाठी खास राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

येथील लोकांच्या आरोग्याची काळजी शासनामार्फत घेतली जाते. कावार्ती व मिनीकाय येथे दोन हॉस्पिटल्स बांधण्यात आलेली आहेत. त्याशिवाय सात-आठ ठिकाणी दवाखानेही सुरू आहेत. या ठिकाणी मोफत औषधपाणी दिले जाते.

# उगवता अरुणाचल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नवीन क्र. ५०६
अ. क्र. २१७८६
२४-१-७४
ठाणे (स्थळ प्रत)

'नॉर्थ-ईस्ट फ्रॉन्टिअर एजन्सी' किंवा 'नेफा' या नावाने ओळखला जाणारा भारताच्या उत्तर-पूर्वेकडील प्रदेश हाच आता 'अरुणाचल' या नावाने अस्तित्वात आलेला आहे. आसाम, नागभूमी, भूतान, ब्रह्मदेश, चीन आणि तिबेट या प्रदेशानी अरुणाचलाची भूमी घेरलेली आहे. या भूमीचे क्षेत्रफळ ८३,५७८ चौ. कि. मी. असून दोन अडीच हजार गावे या प्रदेशात आहेत. ४,६७,५११ इतकी या प्रदेशाची लोकसंख्या आहे. मिश्मी, मानपा, दफला, आवर, तागिन, गालोंग, आपातानी, मीरी, मेम्बो, पाइलिबो, रामो, बोकार, बोरी इत्यादी जातीजमातींचे लोक या प्रदेशात राहतात. हिमालयाच्या पूर्वेकडील खडकाळ भूभागावर हा प्रदेश वसलेला आहे. त्यामुळे येथील भूमी उंचसखल स्वरूपाची आहे. या प्रदेशातून अनेक वेगवान नद्या व ओढे वाहतात. येथील लोक इंडो-मंगोलियन वंशाचे आहेत. प्रत्येक जातीमध्ये अनेक उपजाती आणि वंश आहेत. या विविध जातीजमाती शान, बोडिक, मध्य आणि दक्षिणी अशा चार जमातींमध्ये विभागण्यात येतात. या प्रदेशात कामेंग, सुबानसिरी, सियाग, लोहित आणि तिरप असे पाच जिल्हे आहेत. याच नावाच्या नद्या या प्रदेशात असून त्याच्यावरूनच जिल्ह्यांना नावे पडली आहेत. मोनपा जमातीतील लोक कामेंग जिल्ह्यात वरेच आढळतात. हे लोक बौद्ध धर्मीय असून स्वभावाचे सरळ, सौम्य व शांत आहेत. बौद्ध धर्मातील निंगमापा संप्रदायातील पद्मसंभव गुरूची पूजाअर्चा हे लोक करतात. तावांग येथील विशाल बौद्धमठ मोनपा लोकांच्या संस्कृतीचा केंद्रबिंदूच आहे. तिबेटमधील सहावा धर्मगुरू दलाईलामा याच प्रदेशात निर्माण झाला असे म्हणतात. मोनपा लोक रसिक व कलाप्रिय आहेत. संगीत, नृत्य व नाटक या कलांना त्यांच्या जीवनात मोठे स्थान आहे. आसाम प्रदेशाशी व तिबेटशी याचा प्राचीन काळपासूनच घनिष्ठसंबंध आहे.

कामेंग जिल्ह्याच्या पूर्व भागात डाफला जमातीतील लोक राहतात. सुबानसिरी जिल्ह्यातही डाफलाची बरीच वस्ती आहे. हे लोक स्वतःला आबोतेनी नावाच्या एका पुरुषाचे वंशज मानतात. व हिमालयाच्या अतिपूर्वेकडील सुपुंग नावाच्या एका ठिकाणी आपले मूळ वास्तव्य होते असे सांगतात. डाफला सुदृढ-हाडापेराचे आणि दिसण्यास सुरेख असतात. प्राचीन काळी हे लोक लूटमारी करणारे म्हणून प्रसिद्ध होते. आसाममधील आहोम राजावर हल्ले करून तेथील प्रजेला लुटीत असत. प्रसंगी कत्तलही करत असत. त्यामुळे त्याना या प्रदेशात प्रवेश करण्यास पुढे इंग्रजानी बंदी केली होती. पुढे विविध लोकाशी संबंध आल्यापासून यांच्यातील ही गुन्हेगारीवृत्ती कमी झाली. डाफलाचे गाव उंच पहाडावर वसलेले असते. याच्या घराभोवती प्रशस्त जागा असते घर जमिनीत खांब रोवून त्यावर बांबू व तट्ट्यानी तयार केलेले असते. त्याची ही घरे तीनचार वर्षेच टिकतात. म्हणून त्याना ती पुनः पुन्हा बांधावी लागतात. डाफला पुरुष कमरेभोवती एक कापड गुंडाळतात. डोक्यावर वेताचे शिरस्त्राण घालतात, त्यात रंगीबेरंगी पिसे खोवलेली असतात. कपाळावर केसाच्या आंबाड्याप्रमाणे 'पोडुम' बांधतात. स्त्रिया चट्यापट्याचा हिरव्या रंगाचा लेंगा वापरतात. तसलेच वस्त्र अंगावर घेतात. गळ्यात रंगीबेरंगी मण्याच्या पुष्कळ माळा घालतात. कानात मोठाली वळी आणि हातात भरपूर बांगड्या. सुबानसिरी भागात वेत व बांबू यांची जंगलेच आहेत. त्यामुळे वेत व बांबू यांच्यापासून ते अनेक तऱ्हेच्या वस्तू तयार करतात. डाफला लोक उत्तम शिकारी म्हणूनही प्रसिद्ध आहेत. प्रत्येकाकडे धनुष्यबाण असतेच. बालपणापासूनच तिरंदाजीचे शिक्षण दिले जाते.


डफला पुरुष

झूम पद्धतीची शेती सर्व अरुणाचलातच केली जात असे. स्त्रियाही शेतीत पुरुषाबरोबर काम करतात. भात, मांस, भाज्या, मक्याची भाकरी, कंद, बांबूचे

कोंब व मद्य हा या लोकांचा आहार असतो. हिमी नावाच्या धान्यापासून काढलेले मद्य डाफलाना फार आवडते. आबोतेनी या आपल्या पूर्वजाला डोडुम, डोल आणि डोपुम असे तीन पणतू होते. या तिघांच्या नावावरूनच डाफलांचे तीन वर्ग पडले आहेत. पहिल्या दोन डाफलांची संख्या अधिक असून डोपुम डाफला संख्येने कमी आहेत. या तिघांतही रोटीबेटी व्यवहार चालतो याच्यात पितृसत्ताक कुटुंबपद्धती प्रचलित आहे याच्यात पुरोहिताला फार मान दिला जातो. धार्मिक विधींच्या वेळी, त्याचप्रमाणे जन्ममृत्यु व बळी देणे इत्यादी वेळी पुरोहिताची गरज असते. आजाऱ्यालाही तोच औषध देतो.

आतापानी जमातीचे लोकही सुबानसिरी भागात पठारावर रहातात. हे लोक मोठे कष्टाळू आहेत. हे आपल्या शेतात वर्षातून दोन पिके काढतात. कापड विणण्यातही हे कुशल आहेत. हेही उंचावर लाकडाची घरे बांधतात.

आडी जमातीचे लोक सियाग जिल्ह्यात आढळतात. याच्यात अनेक उपजाती आहेत. सियाग व मामने नदीच्या काठी यांची वस्ती बरीच आहे. वेत आणि बांबू यांच्या विपुलतेमुळे त्यांच्या तरतहेच्या वस्तू बनविण्यात हे लोक कुशल आहेत. शेती हाच यांचा मुख्य व्यवसाय आहे. ‘केबाग’ ही यांची ग्रामपंचायतीसारखी ग्रामसंस्था असते. ‘मोराग’ नावाचीही एक संस्था यांच्या प्रत्येक गावात असते. गावातील तरुणतरुणी येथे वसतीला असतात. वयस्क स्त्रीपुरुषांची या मोरांगवर देखरेख असते. तेथे त्यांचे नृत्यसंगीतादी कार्यक्रम चालतात. आडी लोकांचे ‘पोनुग’ नामक नृत्य प्रेक्षणीय असते.

मिश्मी आणि त्यातील पोटजातीतील लोक लोहित जिल्ह्यामध्ये आढळतात. मिश्मी मंगोली लोकांसारखे दिसतात. त्यांच्या ग्रामसंस्थेला ‘अब्बाला’ म्हणतात. गावचे पंच या ठिकाणी बसून गावचा व्यवहार बघतात व न्यायनिवाडा करतात. येथून जवळच परशुराम कुंड आहे. मातृहत्येचा कलंक परशुरामाने या कुंडात स्नानकरून धुवून काढला अशी आख्यायिका आहे. मिश्मी लोक स्वतःला परशुरामाचे वंशज मानतात. हे रंगी-बेरंगी कपडे वापरतात. यांचे दागदागिने तिबेटी लोकांसारखे असतात. स्त्रिया शेतीत व कपडे विणण्याच्या कामात तरबेज असतात. बांबूच्या नळीत तंबाखू घालून चिरुटाप्रमाणे स्त्रीपुरुष दोघेही ओढतात.

तागसा जमातीचे लोक तिरप जिल्ह्यात आढळतात. यांच्यातही पुष्कळ पोटजाती आहेत. भूताखेतांवर या लोकांचा बराच विश्वास असून त्यासाठी ते

पूजाअर्चा, बळी देणे, इत्यादी करतात. नोकटे या नावाचीही एक जमात या भागात आढळते. या जमातीतील प्रमुखाची सत्ता आपल्या गावावर चालते. या प्रमुखाचे घर मोठे प्रशस्त असते. अरुणाचलमध्ये जे जातीजमातीचे प्रमुख असतात त्यांची घरे इतरांपेक्षा मोठी असतात. ती तयार करण्यासाठी जमातीतील इतर लोक जंगलातून लाकूड, बांबू वगैरे आणून देतात.

परशुराम कुंडाप्रमाणेच अरुणाचल प्रदेशात 'मालिनीस्थान' या नावाचे एक ठिकाण कामेंग जिल्ह्यात आहे. येथील भिष्मकनगर नावाने प्रसिद्ध असलेल्या गावाशी श्रीकृष्ण–रुक्मिणीचा संबंध जोडण्यात येतो. भिष्मकनगर ही भिष्मकराजाची राजधानी होती. रुक्मिणी ही त्याची कन्या. भिष्मक राजाने शिशुपालाशी आपल्या कन्येचा विवाह करण्याचे योजले होते. त्यावेळी श्रीकृष्णाने तिचे हरण केले अशी कथा प्रसिद्ध आहे. भिष्मक राजाचा पुत्र रुक्मी याने त्यावेळी श्रीकृष्णाशी युद्ध केले, त्यात त्याचा कृष्णाने पराभव केला. त्यावेळी रुक्मिणीच्या विनंतीवरूनच त्याचा जीव वाचला. म्हणूनच श्रीकृष्णाने त्याच्या पुढच्या केसांचा झुपका त्याला शिक्षा म्हणून कापून टाकला. त्यावेळेपासून इदुमिश्मी जमातीचे लोक त्याच पद्धतीने आपले केस कापतात. रुक्मिणीला घेऊन श्रीकृष्ण द्वारकेला निघाला. पार्वतीने त्याचे स्वागत एके ठिकाणी केले. तिने आपल्या हाताने बनवलेली पुष्पमाळ त्याला अर्पण केली. श्रीकृष्णाने पार्वतीला आनंदाने 'मालिनी' या शब्दाने संबोधले. तेव्हापासून त्या स्थळाला मालिनीस्थान असे नाव पडले.



मिश्मी स्त्री

लोहित जिल्ह्यातील तेजू या गावात तांम्रेश्वरीचे मंदिर आहे. हे मंदिर फार

प्राचीन असून आसाममधील छुतीया नावाच्या राजाने बांधले अशी आख्यायिका आहे. या शिवाय काही शिवालये व अन्य देवदेवतांची मंदिरे या प्रदेशात आढळतात.

अरुणाचल या पहाडी प्रदेशातील लोकांचे जीवन मोठे कष्टाचे आहे. निसर्गाशी झगडून हे आपली शेतीभाती पिकवतात. हे लोक तसे श्रद्धाळू आहेत. यांच्यातही बऱ्याच लोककथा प्रचलित आहेत. निसर्गातील चमत्कार आणि देव-देवता यांच्याविषयी अनेक कथा यांच्यात आहेत. प्रत्येक जातीजमातीमध्ये त्यांचे संगीत व नृत्य आहेच.

लोकटे जमातीतील लोक 'लोकु' नावाचा उत्सव जुन्याकाळापासून साजरा करतात. शरदऋतूच्या वेळी धान्ये कापण्याच्या सुमारास लोकु उत्सव साजरा करतात. शेतीभाती पिकली आणि धनधान्य हाती आले ही ईश्वराची कृपा आहे असे मानतात. 'राग' हे त्यांच्या देवाचे नाव. लोकु–उत्सव तीन दिवस साजरा करतात. या वेळी संध्याकाळी गावात ठिकठिकाणी गीत गायन व नृत्य चालते. ढोल आणि गोगुल नावाचे वीणेसारखे वाद्य या वेळी साथीला असते. मोरुंगप्रमाणे तरुणतरुणी यात प्रामुख्याने भाग घेतात. अशाच प्रकारे अरुणाचलमधील प्रत्येक जातीजमातींचे सण-समारंभ, उत्सव आणि नृत्यसंगीत असते.

पूर्वी अरुणाचल हा प्रदेश आसाम प्रदेशाशी जोडलेला होता. आसाम-मध्ये जसजशा राजकीय उलाढाली झाल्या, तसतशा या प्रदेशात त्यांचे प्रतिसाद उमटले. १९ व्या शतकात आसामप्रमाणे हा प्रदेशही इंग्रजी सत्तेखाली गेला. स्वातंत्र्यानंतर अरुणाचल या नावाने हा प्रदेश २२ जानेवारी १९७२ रोजी केंद्रशासित म्हणून जाहीर करण्यात आला. या प्रदेशाची राजधानी शिलाँग येथे आहे.

स्वातंत्र्यानंतर या प्रदेशाच्या विकासाकडे शासनाने लक्ष पुरविले. दळण-वळणासाठी रस्ते; शाळा, आरोग्य केंद्रे, हस्तकला आणि सांस्कृतिक केंद्रेही आता या प्रदेशात उघडण्यात आलेली आहेत. १९४८ पूर्वी या प्रदेशात फक्त दोन प्राथमिक शाळा होत्या. परंतु आता महाविद्यालयापर्यंतचे सर्व शिक्षण मिळण्याची सोय झालेली आहे. येथील आदिमजातीमधील मागासलेपण घालवून त्यांचे जीवनमान सुधारण्याचे सर्व प्रयत्न केले जात आहेत. शेतीमध्येही सुधारणा होत आहे. पूर्वी झूम पद्धतीची म्हणजेच प्रतिवर्षी जागा बदलून शेती करण्याची पद्धती होती;

त्यामुळे मानवी श्रम फार खर्ची पडत असत व अन्नधान्याचे उत्पादनही फार कमी होत असे. अलिकडे स्थिर पद्धतीची डोंगरभागातील उतारावर शेती करण्याची पद्धती या भागात सुरू झालेली आहे.

ग्रामीण भागात पंचायती राज्याचा कारभार १९६० सालापासून सुरू झालेला आहे. त्यामुळे सहकार्य आणि स्वावलंबन या द्वारा गावचा कारभार लोकशाही पद्धतीने करण्याचे शिक्षण इकडील लोकांना मिळू लागलेले आहे.

# मिझोंचा मिझोरम

आसाम राज्यात ' मिझोर हिल्स ' नावाचा एक जिल्हा बरेच वर्षांपासून होता. या भागात रहाणाऱ्या ' मिझोर ' जमातीच्या लोकावरून हे नाव पडलेले आहे. मिझोर याचा अर्थच पहाडी माणूस असा होतो. मिझोर हिल्स या प्रदेशाला ' लुशाई टेकड्या ' असेही म्हणत असत. लुशाई ही मिझोर जमातीमधील एक उपजमात आहे. परंतु या लुशाई लोकांचेच शासन काही काळ या प्रदेशावर चालत होते; त्यामुळे हा प्रदेश लुशाई टेकड्या या नावाने ओळखला जात असे.

भाषावार प्रांताची पुनर्रचना करण्यात आली त्यावेळी आसाम राज्याचीही विभागणी करण्याची मागणी त्या प्रदेशात भिन्न भाषिक टोळ्यानी पुढे आणली होती. या प्रदेशात राहणाऱ्या मिझो लोकानाही स्वतःचा असा प्रदेश असावा, आसामच्या अंतर्गतच आपल्याला रहावे लागू नये, अशी त्याची आकांक्षा होती. या त्यांच्या आकांक्षेनुसारच २१ जानेवारी १९७२ रोजी मिझोर हिल्स हा आसाममधील भाग ' मिझोरम ' या नावाने केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला.

मिझो लोकाचे पूर्वज प्राचीन काळी ब्रह्मदेशातील चीन पहाडातून आले असावेत असे मानले जाते. चीन पहाडात रहात असताना ब्रह्मदेशातील आदिम जमातीमधील लोकानी त्याना हुसकून लावेले व त्यामुळे हे लोक आसाममधील लुशाई पहाडावर येऊन राहिले. तेथे आल्यावर त्यानी आपल्या संख्येच्या जोरावर येथील लहान लहान जमातींना उत्तरेकडे हुसकून लावून या प्रदेशाचा ताबा घेतला. मिझो लोकाचे पूर्वज छिनलुंग हे पृथ्वीच्या एका छेदामधून उत्पन्न झालेले होते अशी एक आख्यायिका याच्यासंबंधी या प्रदेशात प्रचलीत आहे. १९ व्या शतकामध्ये मिझो लोकानी या प्रदेशात आपले बस्तान बसवले त्यावेळी या प्रदेशावर साइलो राजवंशाचे राज्य होते. या राज्यातच मिझो नादत आले. साइलो राजवट ब्रिटिशाचा अंमल भारतावर लागू होईपर्यंत अस्तित्वात होती. मिझो लोकाच्या हिंसक उपद्रवा-

पासून इतर भागातील लोकांच्या संरक्षणासाठी ब्रिटीशाना याच्याविरुद्ध लष्करी उपाययोजना करावी लागली होती.

ब्रिटिश अंमलात मिझो टोळीवाल्याना भारताच्या इतर भागापासून मुद्दामच अलग ठेवण्यात आले होते. त्यांच्यावर व्हॉइसरॉय आणि आसामचा गव्हर्नर याचा अधिकार चालत असे. आसाम प्रातात असूनही आसामच्या विधानसभेत मिझोंचा प्रतिनिधी नव्हता. त्यामुळे आपण भारतीय असूनही भारताशी आपला काहीही संबंध नाही अशा तऱ्हेची विचित्र भावना या लोकामध्ये निर्माण झालेली होती. खिस्ती मिशनऱ्यानी याला खतपाणीच घातले होते. याचा परीणाम मिझो टोळीवाल्याचा बंडात परिणत झाला होता. भारतीय स्वातंत्र्यानंतर मिझोतील बंडखोर नेत्यानी मिझोंना भडकावून दिले होते आणि भारताशी आमचा कसलाही संबंध नसल्याने आम्हाला भारतापासून स्वतंत्र राज्य हवे अशी मागणी केली होती.

दुर्गम प्रदेशामुळे हा भाग खूपच मागासलेला आहे. भारतातील इतर प्रदेशाच्या मानाने या भागाचा विकास म्हणावा तसा झालेला नाही. त्यामुळे आपल्याकडे केंद्रसरकारचे दुर्लक्ष आहे व आपल्याला दडपून टाकण्याचाच याचा बेत आहे अशी भावना त्याच्यात निर्माण झाली होती. आपली भाषा संस्कृती व परंपरा हळूहळू नष्ट होण्याची भीती मिझो लोकाना वाटू लागली होती. अशा अनेक प्रकारच्या कारणामुळे सर्वसामान्य मिझो लोकातही असंतोष खदखदत होता. 'मिझो नॅशनल फ्रंट' नावाचा एक पक्षही मिझो बंडखोर तरुणांनी संघटीत केला होता या बंडखोर तरुणानी आसाममधील इतर भागात बराच उपद्रव माजवला होता. आपल्या प्रदेशात आसाम लोकाना शासन चालवायला कठीण केले होते. चीन व पाकिस्तानसारखी भारताची शत्रू राष्ट्रे मिझो लोकाना भारताविरुद्ध चिथावून देत होती व शस्त्रेही पुरवित होती.

या बंडखोराच्या पक्षाव्यतिरिक्त 'मिझो युनियन' नावाचा दुसराही एक पक्ष या प्रदेशात जन्माला आलेला होता. या पक्षाने भारताच्या अंतर्गतच मिझो लोकाच्या स्वतंत्र प्रदेशाची मागणी केलेली होती. 'मिझो युनियन' आणि 'मिझोरम कॉंग्रेस' या दोन पक्षाचे या बाबतीत एकमत होते म्हणून त्याचा 'युनायटेड मिझो पार्लमेंटरी पार्टी' नावाचा एक संयुक्त पक्ष स्थापण्यात आला. बऱ्याच वाटाघाटी व घडामोडीनंतर मिझोरम हा केंद्रशासित प्रदेश म्हणून १९७२ मध्ये अस्तित्वात आला.

मिझोरम प्रदेशाचे क्षेत्रफळ २१,०८७ चौ. कि. मी. आणि येथील लोकसंख्या ३,३२,३९० इतकी आहे. या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी 'ऐजेल' या शहरात आहे. या प्रदेशाच्या उत्तरेला आसाम व मणिपूर हे प्रदेश असून पूर्वेला व दक्षिणेला ब्रह्मदेशाचा शेजार आहे. पश्चिमेला त्रिपुरा व बांगला देश यांची सोबत आहे. सर्व प्रदेश डोंगराळ असून बारमाही हिरव्या वृक्षांनी व वनस्पतींनी लहडलेला असतो. हा प्रदेश तसा लहान असला तरी संरक्षणाच्या दृष्टीने सीमेवरील प्रदेश म्हणून फार महत्त्वाचा आहे.

मिझोरम प्रदेशात मिझो यांच्या व्यतिरिक्त लुशाई, लाखेर, चकमा, राल्टे, पवी, हमार इत्यादी भिन्न भिन्न जमातींचे लोकही रहातात. यांची भाषा तिबेट–ब्रह्मदेश या समूहापैकी असून ते रोमन लिपीत लिहितात.

मिझो हे लोक मंगोलियन वंशाचे आहेत. यांचा पोशाख साधाच असतो. [illegible] पुरुष कमरेभोवती गोल शाली गुंडाळतात व त्याच शाली अंगावर घेतात. थंडीच्या दिवसात आणखी एक शाल ते यावरून गुंडाळतात. उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून डोक्याला पागोटे बांधतात. पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही कमरेपासून खाली लुशाई शाल गुंडाळतात. अंगात पोलके घालतात. त्यांच्या कपड्यावर रंगीबेरंगी अशा सुंदर आकृत्या काढलेल्या असतात. यास लागणारे बहुतेक कापड मिझो स्त्रिया घरच्याघरी हातमागावर विणतात. विणकामात त्या फारच वाकबगार असतात. पुरुषांच्या खांद्यावर लटकवलेल्या पिशवीत तंबाखू, गारगोटी, पाइप अशा वस्तू असतात. त्याशिवाय त्यांची शिदोरी व डाओ नावाचे त्यांचे हत्यारही असते. स्त्रिया व पुरुष दोघेही नक्षीदार कपड्याप्रमाणे गळ्यात रंगीबेरंगी खड्यांच्या माळा घालतात. पुरुषांच्या कानात पिवळ्या रंगाचा स्फटीक मणी किंवा लहानसा लाकडी गोल घातलेला दिसतो. स्त्रियांच्या कानात हस्तिदंती वळये असतात. मातीची व लाकडाची कर्णफुलेही त्या वापरतात. अलीकडे आधुनिक पद्धतीची वेशभूषा व केशभूषा स्त्री व पुरुष करताना दिसतात. प्रत्येकाच्या घरात हातमाग असतात. आसाम व ब्रह्मदेश या देशातून तागाची आयात केली जाते. कापडावरील कलाकुसरीत या स्त्रिया कुशल आहेत. त्यांच्या अंगावरील पादऱ्या [illegible] रंगीबेरंगी कलाकुसरीचे काम केलेले दिसते.

मिझो लोक आपली घरे बांधताना पाण्याजवळची, डोंगरमाथ्यावरची जागा निवडतात. जमिनीत खांब रोवून त्यावर चौकोनी आकाराची घरे ते बांधतात. या

प्रदेशात वारंवार वेगवान वादळी वारे वहातात. त्याच्यापासून बचाव होईल अशी ही घरे लाकडाची, पण भक्कम असतात. मिझो लोक पूर्वी आपल्या घराना खिडक्या ठेवीत नसत. विशिष्ट प्रकारचा धार्मिक विधी केल्यावर घराला खिडक्या ठेवता येत असत. तसे न करता खिडक्या ठेवल्यास संकटे येतात अशी त्याची समजूत होती. परंतु अलीकडे मिशनऱ्याच्या सहवासामुळे व खिस्ती धर्माच्या प्रसारामुळे ही समजूत टाकून देऊन लोक घराना खिडक्या ठेवू लागले आहेत. शेती हाच याचा प्रमुख व्यवसाय आहे. पूर्वी ते झूम पद्धतीने शेती करीत. त्यासाठी दरवर्षी जंगल तोडून शेतीसाठी जमिन निर्माण करावी लागत असे. भात हे मुख्य पीक आहे. त्याशिवाय मका, बाजरी, बटाटे इत्यादी पिकेही घेतली जातात. नारळ, सुपारी, फणस, संत्री इत्यादी फळेही होतात. हे लोक मांसाहारी असून शिकारही करतात. मच्छीमारीचाही उद्योग चालतो. बांगला देशातून मासोळीची आयात बरीच होते. या प्रदेशात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो, परंतु पावसाचे पाणी साठवण्याच्या सोयी नसल्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासते.



मिझो युवती

बांबूंची बने विपुल असल्यामुळे बांबूपासून विविध प्रकारच्या टोपल्या मिझो विणतात. स्त्रिया, पुरुष व मुलेही तंबाखू ओढतात आणि तांदळापासून बनवलेले मद्य आवडीने पितात. झू आणि रोही नावाचे तांदुळापासून बनवलेले मद्य घरोघर असते.

या भागातील तरुण मोठ्या प्रमाणात फौजेत आढळतात. आसाम रेजिमेंट, आसाम रॉयफल, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, आसाम पोलीस यात ते मोठ्या प्रमाणात भरती होतात.

६०% मिझो लोक खिश्चन धर्माचे अनुयायी बनलेले आहेत. मिशनऱ्याच्या प्रचारामुळे साक्षरतेचे प्रमाण याच्यात ५०% हून अधिक आहे. खिश्चन

धर्माचा प्रसार व पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रघात यामुळे मिझोंच्या मूळ चालीरीती



सुंदर वेतकाम

नष्ट होत चाललेल्या आहेत. या जमातीतील तरुण व तरुणी स्वत:च आपला जोडीदार निवडतात. मग मध्यस्ताच्या मार्फत देण्याघेण्याच्या वाटाघाटी सुरू होतात. या वाटाघाटी जितक्या लांबतील तितका शुभशकून मानतात. देणे ठरल्यावर लग्नाचा दिवस पक्का करतात. लग्नाच्या दिवशी मेजवानी होते. त्या दिवशी नृत्य व गीते गायली जातात. हुंड्याच्या रकमेपैकी काही भाग वधूपिता आपल्या नातेवाइकांना देतो. मुलीवर जर काही संकट आले तर त्यावेळी त्यांनी तिच्या पाठीशी असावे असा त्यामागे हेतू असतो पतीच्या निधनानंतर ३ महिने पर्यंत पत्नीने त्याच्या घरी रहावयास पाहिजे. असा दंडक आहे. 'ख्लाउअल' नावाच्या विधीनंतर ती दुसरे लग्न करावयास मोकळी होते. याच्यात घटस्फोट अगदी सुलभ आहे. हुंड्याची रक्कम स्त्रीला परत केल्यावर घटस्फोट मिळतो. इस्टेटीचा वारसा सर्वांत लहान मुलाला मिळतो.

मोठी मुले मिळवती होऊन प्रपंचाला लागलेली असतात. म्हातारपणी धाकटा मुलगाच आईबापाची काळजी वाहू शकतो, अशी याच्यामागची कल्पना आहे. ग्रामप्रमुखाच्या बाबतीत मात्र त्याचा मोठा मुलगा त्याच्या इस्टेटीचा वारसदार ठरतो. कारण गावच्या जबाबदाऱ्या त्याला पार पाडायच्या असतात. पूर्वी प्रत्येक गावावर मुखिया असे व त्याची सत्ता चालत असे. मुखियाला सल्ला देण्यासाठी



हत्तीच्या सहाय्याने लाकूड वाहतूक

गावातील वृद्धांची एक कमिटी असे. मुखियाचे हुकूम दवंडी पिटवून गावाला सांगण्यासाठी आणि लोहार व पुरोहित असे गावकामासाठी लोक मुखिया नेमीत असे. या लोकांना प्रत्येक घरातून वर्षाकाठी थोडेथोडे भात मिळत असे. मुखियाला प्रत्येक घरातून दरवर्षी १ मण भात दिले जाई. गावात कोणी शिकार केली तर

त्यातील काही भाग त्याला मिळे. मुखियाचे घर प्रशस्त व मोठे असे. गावातील लोकानाच ते बाधून द्यावे लागे. पूर्वी गावाला उपद्रव देणाऱ्या माणसाला हद्दपार करण्याचा अधिकारही मुखियाला होता. अलीकडे गावातील कारभार ग्रामपंचायतीमार्फत चालतो.

ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यापूर्वी हे लोक भूताखेताची पूजा करीत असत. चागली व वाईट दोन्ही प्रकारची भूते त्यात असत. त्यापैकी श्रेष्ठ भुताला ते 'पथियन' असे म्हणत आणि त्याला ते सृष्टीनिर्माता समजत. भुतांच्या कोपामुळे आजारपण येते, त्यासाठी त्याला बळी देऊन संतुष्ट करण्याची प्रथा होती. अलीकडे बहुसंख्य लोकानी ख्रिस्तीधर्म स्वीकारल्यामुळे या जुन्या श्रद्धा नष्ट झाल्या असून शिक्षणाच्या प्रसारामुळे त्याच्यातही पुष्कळ सुधारणा झाल्या आहेत.

लुशाई लोक निरनिराळ्या टोळ्यात राहतात. लुशाई टेकड्यांत याची वस्ती आहे. हे लोक उजळ आणि उंच आहेत. यातील पुरुषाचा पोषाख म्हणजे उजव्या हाताखालून डाव्या खाद्यावर टाकलेले एक फडके एवढाच असतो हे विविध प्रकारची केशरचना करतात. हे लोक गळ्यात वाघाचा दात व कानात मणी घालतात. वाघाच्या दातामुळे दुष्ट शक्तीपासून निवारण होते अशी याची श्रद्धा आहे.

लुशाई लोकाचे खेडे अगदी स्वतंत्र असे. त्यावर साइलो कुळातील राजा राज्य करी. त्या कुळातील मुलाचे लग्न झाले म्हणजे त्याच्याबरोबर काही लोक नवीन खेडे वसविण्यासाठी पाठवले जात. गावच्या कारभारात मदत करण्यासाठी काही जाणकारही जात. लुशाई लोकाची घरे बाबू व लाकूड यापासून बनवलेली असतात.

भातशेती हाच याचा प्रमुख व्यवसाय असून-पूर्वी ते झूम पद्धतीची शेती करीत. अलीकडे डोंगर उतरणीवर बंधारे बाधून स्थायी पद्धतीची शेती करू लागले आहेत. लुशाई लोकाच्या भाषेला 'लुशेयी' आणि 'दलिएनतोंग' अशी नावे आहेत. 'डेव्ते' आणि 'फन्नैयी' अशा या भाषेच्या दोन उपभाषा आहेत. लुशेयी भाषेची व्याकरणे काही विद्वानानी लिहिलेली आहेत; त्याचप्रमाणे सर्व्हीज नावाच्या तज्ज्ञाने 'लुशेयी-इंग्रजी' व 'इंग्रजी लुशेयी' असे शब्दकोशही केले आहेत प्राचीन 'कुकिचित' भाषेशी लुशेयी भाषेचा संबध आहे असे म्हणतात. लुशेयी भाषेतील साहित्य उपलब्ध नाही, परंतु लोककथा व लोकगीते उपलब्ध आहेत. काही लुशाई लोकानी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेला आहे.

त्याच्यामध्ये भोळ्या समजुती व रूढी बऱ्याच प्रचलित आहेत. सूर्याला ते स्त्री समजतात आणि म्हणूनच तिला रात्री अंधारात फिरण्याची भीती वाटते अशी त्याची समजूत आहे. त्याच्यामते चंद्र मात्र पुरुष असल्यामुळे तो रात्री निर्भयपणाने हिंडूफिरू शकतो. चंद्रावर जे डाग दिसतात ते त्याच्यामते एका वडाचे झाड असून त्याच्या त्या फांद्या आहेत. त्यापैकीच एका फांदीवर एक बिनडोक्याचे माकड बसलेले आहे. ते माकड पहाणारा मृत्यू पावतो अशी त्याची समजूत असल्यामुळे ते चंद्राकडे पहाण्याचे टाळतात. 'आषक' हे कोई नावाच्या राजाचे भूत असून ते पशुसारखे आहे. आणि त्याच्यामुळेच चंद्र व सूर्याला ग्रहणे लागतात अशी त्याची श्रद्धा आहे. आषकाच्या तावडीतून चंद्र सूर्यांची सुटका व्हावी म्हणून ग्रहणकालात ढोल व घंटा मोठमोठ्याने ते वाजवतात. इंद्रधनुष्याला लुशाई लोक 'छिंबाल' असे म्हणतात. एखादे खूप उंच व मोठे भूत पाणी पिण्यासाठी नदीवर वाकते तेव्हा इंद्रधनुष्य उमटते अशी त्याची कल्पना आहे. जादूटोण्याची या लोकाना फार भीती वाटते. अंगात येणे वगैरे प्रकार याच्यात बरेच चालतात. सृष्टीनिर्माता म्हणून ते 'पाथियन' देवाला मानतात. 'फू आवाग' नावाच्या दुष्ट स्वभावाच्या देवामुळे रोगराई होते अशी याची समजूत आहे. माणसाला एक भला आणि एक बुरा असे दोन आत्मे असतात अशी याची श्रद्धा आहे. या प्रत्येकाचे वेगवेगळे कुळ असते. आणि प्रत्येक कुळाचे एक दैवत असते. या कुलदैवताला ते 'साकुआ' म्हणतात. मृतात्म्याची स्मारके लाकडाच्या ओंडक्याची करतात. टोळीच्या प्रमुखाचे स्मारक दगडी असते. ज्याने माणसाची शिरे तोडण्याचे शौर्य दाखवलेले असते अशाचे स्मारक दगडी असते. स्मारकाच्या उभ्या दगडावर जनावराची डोकी, घंटा, बंदूक इत्यादी चित्रे कोरलेली असतात. त्यावरून त्या माणसाने किती प्राणी मारले, त्याच्याजवळ किती बंदुका होत्या व किती घंटा होत्या हे कळून येते.

लाखेर ही एक या प्रदेशातील आदिमजमात आहे याला 'मरा' असेही नाव आहे. लुशाई, चीन, आणि आराकान टेकड्याच्या प्रदेशात लाखेराची वस्ती आहे. या प्रदेशात पोलोडाइन नावाच्या नदीच्या काठावर याची लहान लहान गावे आहेत. लुंग्लेह नदीच्या काठीही काही खेडी आहेत. हे लोक उत्तरेकडून इकडे आले असावेत असे अनुमान आहे.

या जमातीमध्येही सबेयू, तलॅंगसई, झिडहूनंग, लियलयी आणि हैमा नावाच्या उपजाती आहेत. त्यातही पुन्हा असंख्य पोटजाती आहेत. त्यात राजकुळे,

खानदानी कुळे व सामान्य कुळे अशी उच्चनीचता आढळते. लाखेर ही लढाऊ व बंडखोर जमात आहे. ते शरीराने दणकट असून रंगाने निमगोरे असतात. त्यांची रहाणी गलिच्छ असते. हे लोक स्वयंकेंद्रीवृत्तीचे आहेत. लाखेर पुरुष एकच सलग धोतरासारखा कपडा संबध अंगभर वापरतो. डोक्यावर एक प्रकारची पगडी घालतो. काशिदा काढलेली पिशवी प्रत्येकाच्या खांद्यावर दिसते; तिच्यात चिलीम, चकमक किंवा काड्याची पेटी व निकोटीनचे पाणी असते. लाखेर स्त्रिया त्यामानाने जास्त कपडे वापरतात पूर्वी ह्या झाडांच्या साली नेशीत असत. पण अलीकडे गडद निळ्या रंगाचा घागरा वापरतात. त्यावर खालच्या बाजूला रेशमी काशिदा काढलेला असतो मोठ्या घागऱ्यावर एक लहान घागरा व अंगात जाकीट असते. सधन किंवा प्रमुख घराण्यातील स्त्रिया मूल्यवान कपडे वापरतात. त्यावर बरेच पट्टे असतात. या पट्ट्यावरूनच त्यांची श्रीमंती कळते ' लबू ' नावाची बांबू व वाळलेली पाने यांच्यापासून बनवलेली टोपी स्त्रिया-पुरुष दोघेही वापरतात. ' ख्वाग ' नावाचे शिरस्त्राण वरच्या वर्गातील मुली वापरतात. गळ्यात मण्याच्या माळा स्त्रिया घालतात. ' थग्राहेवू ' नावाची लाकडाची कर्णभूषणे घालतात. ' पमटेकचा ' नावाने ओळखला जाणारा एक हार असतो तो स्त्रियांना फार आवडतो.

यांची घरे टेकडीच्या उतरणीवर जमिनीपासून ३-४ फूट उंचीवर लाकूड व बांबू यांचा वापर करून बांधलेली असतात. घराच्या भिंती व आतील जमीन बांबूच्या चटयाची असते. ताडाच्या पानाचे घरावर छप्पर असते तेही बांबूच्या चटयांनी आच्छादिलेले असते. मुखियाचे घर गावच्या मध्यभागी मुद्दामच बांधलेले असते, कारण परक्याच्या हल्यापासून त्याचे संरक्षण व्हावे असा त्या मागचा हेतू असतो. बांबू व वेत यांच्या टोपल्या, भोपळ्याच्या पळ्या, मातीच्या पराती, घागरी आणि विणण्याची व शेतीची अवजारे असे फारच थोडे सामान त्यांच्या घरात असते.

लाखेर लोकाचा शेती हाच प्रमुख धंदा असून ते झूम पद्धतीने शेती करतात. भात, कापूस, मका, कडधान्ये, भाजीपाला इत्यादी पिके ते घेतात. विणकाम, वेतकाम, बांबूच्या वस्तू व मच्छीमारी हे उद्योगही करतात. कपडे विणणे व रंगवणे प्रामुख्याने स्त्रियाच करतात. शिकार आणि गाई, डुकरे, कोंबड्या इत्यादी पशु-पालनही करतात ' सहम ' नावाची दारू तांदुळापासून तयार करतात. बांबूच्या नळ्या पेय पिण्यासाठी वापरतात. भात, भाज्या, मासे, मांस, कंदमुळे यावर यांची

गुजराण चालते. याच्यात मोठेपणी तरुण-तरुणींचे विवाह होतात. एखादी मुलगी पसंत पडल्यावर मुलाचे आईबाप मध्यस्थाकरवी 'दाओ' नावाचे एक शस्त्र मुलीकडे पाठवतात. दाओ हे शुभस्वप्नाचे प्रतीक मानले जाते. ते घेतल्यावर मुलीच्या आई-बापाला जर शुभस्वप्ने पडली तर तो मुलगा पसंत केला जातो व लग्न होते. मद्य-पानाने विवाहविधी सुरू होतो.

लाखेर आपल्या देवाला तो सर्वांचा पिता आहे असे समजून त्याला त्या अर्थानेच 'खझगपा' म्हणतात तो खिसाग पर्वतावर राहतो. झंग नावाचा त्यांचा आणखी एक देव असून तो संतुष्ट झाल्यास संपत्ती, संतती व दीर्घायुष्य मिळते अशी यांची श्रद्धा आहे. आत्म्यासंबंधीची यांची कल्पना वेगळी असून ते व्यक्तीच्या आकाराएवढाच त्याचा आत्मा अदृश्य स्वरूपात असतो असे ते मानतात हा आत्मा दिवसा माणसाच्या शरीरात असतो व रात्री तो भटकतो; तरीसुद्धा हू नावाच्या एका अदृश्य दोरीने तो व्यक्तीच्या शरीराशी बांधलेला असतो. रात्रीच्या भ्रमंतीमध्ये ज्या घटना दिसतात त्या तो स्वप्नरूपाने माणसाला सांगतो, अशी त्यांची श्रद्धा आहे. याच्यातही मृतात्म्याची स्मारके करण्याची-प्रथा आहे.

चकमा जमातीतील लोक चितगाव, आराकान भागात बरेच आढळतात. लहानलहान टोळ्यातून हे लोक रहातात. बंगाली संस्कृतीची याच्यावर बरीच छाप दिसून येते. यांची वेशभूषाही बंगाली पद्धतीची असते.

पवी जमातीचे लोक मंगोलियन असून मिझोरमच्या दक्षिणेकडील लुशाई टेकड्यात यांची वस्ती आढळते. पवी लोकही प्रारंभी बंडखोर वृत्तीचे होते. ब्रिटिशांशी त्यांनी मोठा झगडा केला. त्यांच्या टोळीचा प्रमुखच सगळी व्यवस्था पाहतो. हे लोक झूम पद्धतीची शेती करतात. भात व मका पिकवतात. तागापासून बनवलेले कपडे हे लोक वापरतात. स्त्रियांचे कपडे मात्र फारच सुंदर व रंगीबेरंगी असतात. त्या रंगीत विणकाम केलेली शाल वापरतात व गळ्यात विविध प्रकारच्या मण्यांच्या माळा घालतात.

या प्रदेशातील लोकही संगीत व नृत्याचे शौकीन आहेत. चेराव, खुवाल्लम, सोलकीया, इत्यादी यांची लोकनृत्ये प्रसिद्ध आहेत. चेराव हे मिझो लोकांचे नृत्य फारच लोकप्रिय आहे. एखाद्याच्या मृत्यूनंतर त्याला स्वर्गात जाताना वाटेत त्या मृतात्म्याला भूतपिशाचापासून त्रास होऊ नये म्हणून हे नृत्य आयोजित केले जाते. बांबूच्या सहाय्याने ढोलाच्या तालावर हे नृत्य करतात. लाखेर व पवी जमातींतील

लोक सोल्कीया नावाचे नृत्य करतात. पाच भिन्नभिन्न प्रकारच्या तालावर हे नृत्य चालते. शिकारीत जय मिळावा म्हणून या नृत्याची योजना केली जाते. नर्तक व नर्तिका ढोलाच्या तालावर एका ओळीत उभे राहून हे नृत्य करतात.

इतके दिवस हा प्रदेश मागासलेल्या स्थितीतच होता तसा तो आजही आहे. परंतु अलिकडे आर्थिक विकासाच्या अनेक योजना या प्रदेशात कार्यान्वित झालेल्या आहेत. ऐजल, कोलासिब, मोमिट, सयिच्चिप, साइतुबाल, चंप्फाई, लुंगलेह, लाहथियाल आणि लावंगल्लाई अशा नऊ ठिकाणी सामुदायिक विकास प्रकल्प सुरू केलेले आहेत. या भागात वरचेवर दुष्काळ पडतात त्यावरही उपाय-योजना केली जात आहे. इकडे पूर्वीपासूनच झूम पद्धतीने शेती केली जाते, पण त्यामुळे मनुष्यशक्तीचा व्यर्थ वापर होऊन उत्पादन म्हणावे तसे होत नाही म्हणून अलिकडे डोंगराच्या उतरणीवर बंधारे बांधून टप्याटप्प्याची शेती कशी करावी हे इकडील शेतकऱ्यांना शिकवण्यात आले आहे जेवढी उपलब्ध होईल तेवढी सपाट जमीनही लागवडीखाली आणलेली आहे. ५००० एकराचा ‘सेंट्रल स्टेट फार्म’ लेंगीचेरा या ठिकाणी तयार करण्यात आला आहे. थिंगडावल येथे एक हजार एकर जमिनीवर सामुदायिक शेतीचा प्रयोग करण्यात आलेला आहे. अन्नधान्याबरोबरच संत्र्याच्या बागा व फुलांची उद्याने तयार करण्याला उत्तेजन दिले जाते. कॉफी, कोको, रबर, वेलची, काजू इत्यादींची लागवडही करण्यात आली आहे.

पूर्वी मिझोरममधील ऐजल व लुंगलेह या दोन प्रमुख ठिकाणी जाण्यासाठीच रस्ते होते; परंतु अलीकडे आणखी काही रस्ते तयार करून दळणवळणाच्या सोयी करण्यात आलेल्या आहेत. डोंगराळ प्रदेशात अद्यापही घोड्यावरून दळणवळण चालते. काही प्रमुख शहरांना वीज पुरवण्यात आली असून सध्या पाच डिझेल वीजकेंद्रे येथे आहेत. पाणीपुरवठ्यासंबंधी बांध घालून सोय करण्यात आलेली आहे.

# राजधानी दिल्ली

दिल्ली ही भारताची राजधानी आहे दिल्लीने प्राचीन काळापासून अनेक राजे-महाराजे आणि त्यांची साम्राज्ये पाहिलेली आहेत. दिल्ली शहराइतका दीर्घकालीन राजकीय इतिहास दुसऱ्या एखाद्या शहराने क्वचितच पाहिला असेल.

दिल्लीचा उल्लेख 'इंद्रप्रस्थ' या नावाने महाभारतात आढळतो. महाभारतात तत्का-लीन महापदाचा उल्लेख आहे. त्यात 'कुरुवन' नामक एक विशेष प्रसिद्ध प्रदेश होता. याच प्रदेशात पांडवांनी आपली 'इंद्रप्रस्थ' नामक राजधानी वसविली होती. याच प्रदेशात प्राचीन 'प्राणीप्रस्थ' म्हणजे हल्लीचे पानिपत, 'श्रोणिप्रस्थ' म्हणजे हल्लीचे सोनीपत इत्यादी ऐतिहासिक स्थळे होती. आज ही गावे दिल्ली-नजीकच्या हरियाना राज्यात आहेत. पांडवांनी शांती व सलोखा राहावा आणि परस्परांतील कलह मिटावा म्हणून कौरवांच्याकडे जी पाच गावे मागितली होती त्यापैकीच ही गावे होती. पांडवांनी आपल्या तरुणपणी इंद्रप्रस्थ नावाची नगरी वसवलेली होती. त्यांनी आपला राजसूययज्ञ याच इंद्रप्रस्थ नगरीत केला होता. आणि आपले स्वतंत्र राज्यही येथेच स्थापन केले होते इंद्रप्रस्थ नगरीत पांडवांच्या वंशजांनी पुढे सुमारे १८५० वर्षे राज्य केले होते असे म्हणतात. आज इंद्रप्रस्थ हा विस्तीर्ण दिल्लीचा एक भाग आहे.

इ. स. ९७३६ पासून पुढे दिल्ली शहराचा इतिहास सुसंगत रीतीने उपलब्ध होतो. दिल्ली या शहराची स्थापना तोमर वंशातील अनंगपाळ नावाच्या राजाने केली.

दिल्ली या नावाबद्दल अनेक आख्यायिका आहेत. अनंगपाळ राजाने ही नगरी वसविल्यावर तिचे नाव बदलून 'लालकोट' असे नाव ठेवले होते. याच अनंगपाळाने या नगरीत एक लोहस्तंभ उभारला होता. त्या वेळी 'या स्तंभाचे खालचे टोक शेषाच्या मस्तकाला जाऊन भिडले असल्यामुळे तो अगदी भक्कम झाला आहे आणि जोपर्यंत तो असा राहील तोपर्यंत तुझे राज्य शाश्वत ठरेल' असे एका ब्राह्मणाने

अनंगपाळाला सांगितले होते. याची प्रचीती पाहाण्यासाठी अनंगपाळाने तो लोह-स्तंभ उपटून काढण्याची सेवकांना आज्ञा दिली. आणि तो उपटून काढताच स्तंभाच्या खालच्या मुळाला खरोखरच रक्त लागलेले दिसले. ते पाहून ब्राह्मणाच्या वचनाची खात्री राजाला पटली व तो भयभीत झाला. त्याने तो स्तंभ पुन्हा पूर्वी-सारखा रोवून टाकण्यास सांगितले. परंतु या वेळी तो रोवताना पूर्वीप्रमाणे पक्का रोवला गेला नाही आणि थोडा ढिलाच राहिला. हा लोहस्तंभ म्हणजे ही लोखंडी लाट अशी ढिली राहिल्यामुळे या स्थानाला 'ढिली' असे नाव प्राप्त झाले. ढिलीचे पुढे ढिल्ली व त्याचेच पुढे दिल्ली असे रूपांतर झाले. 'किली तो ढिली भयी, तोमर भया पतिहीन' अशी एक हिंदी काव्यपंक्ती या संदर्भात प्रसिद्ध आहे.

काही जुन्या शिलालेखातही 'ढिल्लिका' असा उल्लेख आढळतो. सुल्तान मोहब्बत-बिन-तुघलक याच्या काळातील हा शिलालेख दिल्लीपासून दक्षिणेकडे पाच मैलावर असलेल्या 'सारबन' नावाच्या गावात मिळाला आहे. हल्ली हा शिलालेख दिल्लीच्या म्युझियममध्ये आहे. या शिलालेखात सोळा श्लोक असून त्यातील तिसरा असा आहे:

> देशोऽस्ति हरियानाख्यः पृथिव्यां स्वर्गसन्निभः ।
> ढिल्लिकाख्या पुरी तत्र तोमरैरस्ति निर्मिता ।
> तोमरानन्तरं तस्यां राज्यं हितकंटकम् ।
> चाहमाना नृपाश्चक्रुः प्रजापालनतत्पराः ॥

यात हरियाणाचाही उल्लेख असून त्याला 'स्वर्गसंनिभः' म्हणजे स्वर्ग-तुल्य म्हटले आहे. या श्लोकातील दुसऱ्या चरणातील 'ढिल्लिकाः' म्हणजे 'पुरी' तोमर वंशजांनी वसवली असा उल्लेख आहे, म्हणजे याचा अर्थ असाही होतो की दिल्ली व आसपासचा प्रदेश हा त्या वेळी हरियाणा म्हणूनच ओळखला जात असे. किंबहुना दिल्ली केंद्रस्थानच मानले जात असे. 'दिल्ली दिप हरियाना' अशी एक लोकोक्ती प्रसिद्ध आहे.

इंद्रप्रस्थ या प्राचीन नगरीच्या जागी जे एक लहान गाव वसलेले आहे त्यात यादव वंशातील धिल्लन नावाच्या जाट लोकांची बरीच वसती होती म्हणून या नगरीला 'धिल्ली' असे म्हणण्यात येऊ लागले व त्याचेच पुढे 'दिल्ली' झाले असेही सांगतात.

कोणी एक ' देल्हू ' नावाचा राजा होऊन गेला, त्याची इथे राजधानी होती, म्हणून या ठिकाणाला दिल्ली नाव पडले असे म्हणतात. परंतु या देल्हू राजाचा ठावठिकाणा इतिहासात व अन्यत्र कोठेही लागत नाही.

इंद्रप्रस्थ या प्राचीन नगरीच्या परिसरात गेल्या सुमारे १००० वर्षांच्या काळात जी नगरे निर्माण झाली त्या सर्वांचा समावेश आजच्या दिल्लीत होतो. काही ग्रंथातून इंद्रप्रस्थ, रायपिठौरा, मुबारकपूर, तुगलकाबाद, सीरी, शाहजहाबाद आणि दिल्ली अशा उपनगरासह दिल्लीच्या परिसराचे वर्णन दिले आहे. दिल्लीच्या परिसरात दिसणारे जुन्या वास्तूंचे भग्नावशेष दिल्लीच्या प्राचीनत्वाची साक्ष देतात. प्रतिहार, गहड्वाल, चौहान, गुलाम, खिलजी, तुगलघ, सैयद, लोधी, सूर, मोगल, इंग्रज इतक्या राजवटी दिल्लीने पाहिलेल्या आहेत. निरनिराळ्या राजवटींतील राजानी वेगवेगळ्या इमारती, किल्ले, मंदिरे, मशिदी या परिसरात बाधल्या.

दुसऱ्या अनगपाळाने ११ व्या शतकात दिल्ली येथे बाधलेला कुतुबमिनार आहे. त्याच्याजवळ नगराभोवती लालपरकोटे म्हणजे लालकोट नावाचा एक तट बाधलेला होता. हा लालकोट सव्वा दोन मैल परिघाचा होता. आणि तटाच्या भिंतींची उंची ६० फूट होती. लालकोटाचा काही काही भाग अजूनही काही ठिकाणी भग्नावस्थेत दिसतो. शिवालिक पर्वताच्या विष्णुपद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिरीवर चंद्र नावाच्या राजाने उभारलेला एक मिश्र धातूचा स्तंभ या परिसरात आणून अनंगपाळाने उभारला असेही सागितले जाते.

तोमर राजवटीनंतर दिल्लीवर चौहानाचे राज्य आले. त्यातील पृथ्वीराज चौहान हा अत्यंत प्रसिद्ध शूर राजा होऊन गेला. याने लालपरकोटाच्या भोवती दुसरा एक प्रचंड तट बाधला, त्यालाच रायपिठोरा म्हणतात. महंमद घोरीने अनेक वेळा दिल्लीवर स्वाऱ्या केल्या परंतु पृथ्वीराज चौहानाने दरवेळी त्याचा पराभव केला. पृथ्वीराजाच्या दरबारात चंदबरदाई नावाचा एक कवी होता. त्याने ' पृथ्वीराज रासो ' नावाचे एक काव्य लिहिलेले असून त्यात त्या काळाचा इतिहास व पृथ्वीराज चौहानाचे शौर्य वर्णन केले आहे.

अनेक वेळा पराभव होऊनसुद्धा महंमद घोरीने दिल्ली सोडण्याचा नाद सोडला नाही. ११९२ मध्ये त्याने पुन्हा मोठ्या तयारीनिशी दिल्लीवर स्वारी केली आणि यावेळी मात्र पृथ्वीराज चौहानाचा पराभव झाला. दिल्लीवर मुसलमानी

राजवट सुरू झाली. घोरींच्या पश्चात त्याच्यातीलच एक सरदार कुतुबुद्दीन याने येथे राज्य केले. याच्याच कारकीर्दीत कुतुबमिनार बांधण्यास सुरुवात झाली असे म्हणतात. काहींच्या मते पृथ्वीराज चौहान यानेच कुतुबमिनार बांधला असे आहे.

१३ व्या शतकामध्ये पठाण वंशातील कैकुबाद नावाच्या बादशहाने किलो-खिडी नावाचे एक शहर याच परिसरात वसवले होते अशी आख्यायिका आहे. १६ व्या शतकापर्यंत अकबराच्या कारकिर्दीपर्यंत दिल्ली ही भारताची राजधानी म्हणूनच राहिली. १३०३ मध्ये बाहेरच्या मंगोल आक्रमणापासून संरक्षण मिळावे या हेतूने अल्लाउद्दीन खिलजीने सीरी नावाची एक नगरी या परिसरातच वसवलेली होती. त्या नगरीचे भग्नावशेष आजही दिल्लीच्या परिसरात आढळतात.

१३२१ मध्ये गियासउद्दीन तुघलक याने तुघलकाबाद वसवले. याच वंशातील महंमद तुघलक याने आपली राजधानी दिल्लीहून दक्षिणेत महाराष्ट्रातील दौलताबाद येथे आणली होती परंतु काही दिवसांनी पुनश्च त्याने दिल्लीलाच आपली राजधानी बनवले. १३५४ मध्ये फिरोज तुघलक याने फिरोजाबाद नावाची नगरी वसविली. फिरोजशाह कोटला नावाची प्रचंड वास्तू तेथे त्याने बांधली. फिरोज तुघलकने मेरठ येथील अशोक स्तंभ आणवून तो या इमारतीत उभारला. १५५३ मध्ये हुमायून या मोगल बादशहाने ‘ दिनपनाह ’ नावाची आणखी एक नगरी वसवण्यास सुरुवात केली होती. परंतु शेरशाह सुरीने ती उध्वस्त करून ‘ शेरगढ ’ नावाचे एक नवीनच नगर वसवले. १५४० मध्ये वसवलेले स्थान आज पांडवाचा किल्ला किंवा पुराणा किल्ला या नावाने प्रसिद्ध आहे. शेरशहा सुरीचा मुलगा सलीमशहा सुरीने १५४६ मध्ये सलीमगढ नावाचे शहर वसवले. शेरशहा सुरीने पराभव केल्यावर हुमायून इराणमध्ये पळून गेला होता. परंतु १८ वर्षांनंतर तो परत मोठ्या तयारीनिशी हिंदुस्थानात परत आला व शेरशहा सुरीच्या वंशजांचा पराभव करून त्याने दिल्ली काबीज केली.

मोगल सम्राट अकबर याने दिल्लीहून आपली राजधानी आग्रा येथे नेली होती. आणि १६५० पर्यंत मोगल बादशहांनी आग्र्याहूनच राज्यकारभार केला. परंतु शहाजहान बादशहाने आग्र्याहून राजधानी दिल्लीला आणली. जुनी दिल्ली नावाने जे शहर आज प्रसिद्ध आहे त्याची निर्मिती त्याने केली. शहाजॉंहची मुलगी जहॉंनारा बेगम हिने चांदणी चौकातील बाजार वसवला. त्यानंतर जवळजवळ १०० वर्षे मोगल बादशहांनी दिल्लीवर राज्य केले. परंतु १७३९ मध्ये नादीर-

शहाने आक्रमण करून दिल्ली उध्वस्त करून टाकली होती. येथून पुढे दिल्लीच्या नशिबी पतनकाल आला. ब्रिटिशानी १८०३ मध्ये दिल्ली आपल्या ताब्यात घेतली. परंतु १८५७ पर्यंत मोगलाचेच राज्य तेथे होते. १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर दिल्ली शहर हा पंजाब प्रांतातच एक भाग बनवून टाकलेला होता. कारण इंग्रजानी आपली राजधानी कलकत्ता येथे ठेवली होती. परंतु दिल्लीचे राजकीय महत्त्व कमी झालेले नव्हते.

१९११ साली दिल्लीमध्येच इंग्रजांनी आपला मोठा दरबार भरवला होता. तेव्हापासून दिल्ली हीच त्यानी भारताची राजधानी केली होती. आज प्रसिद्ध असलेली नवी दिल्ली सर एडविन लुटेन्स आणि हरबर्ट बेकर याच्या देखरेखीखाली इंग्रजानी निर्माण केलेली आहे. राष्ट्रपतीभवन, लोकसभा, सचिवालय, आणि इंडिया गेट इ. इमारतीची निर्मिती पुढे नव्या दिल्लीतच झाली. कॅनॉट प्लेस नावाचा मोठा बाजारही नव्या दिल्लीतच आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यानी भारताचा राष्ट्रध्वज लाल किल्ल्यावर फडकविला. स्वतंत्र भारताची राजधानी म्हणून दिल्ली जगप्रसिद्ध आहे.

शिवालिक व अरवली पर्वतमालेच्या संगमावर दिल्ली वसलेली आहे. थंडी व उन्हाळा हे दोन्ही ऋतू येथे तीव्र असतात. यमुनेच्या काठी वसलेल्या या राजधानीचे क्षेत्रफळ सुमारे ५७८ चौ. मैल आहे. आणि येथील लोकसंख्या सुमारे ४० लाख आहे. दिल्ली उत्तर भारतातील रेल्वेचे मोठे जंक्शन असून भारतातील प्रमुख शहराशी ते रेल्वेने जोडलेले आहे. दोन विमानतळही येथे आहेत भारताची राजधानीच येथे असल्यामुळे देशोदेशींच्या राजदूताची निवासस्थानेही येथे आहेत. 'चाणक्यपुरी' म्हणून हा भाग ओळखला जातो. दिल्ली शहर केंद्रशासित प्रदेश म्हणून गणले जाते. 'दिल्ली विश्वविद्यालयही' येथे असून अनेक प्रकारच्या उद्योगधंद्याची वाढ आजूबाजूच्या परिसरात झालेली आहे.

अनेक ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे दिल्लीत आहेत. दिल्ली म्हटल्याबरोबर लाल किल्ल्याची आठवण सहजच होते. लाल रंगाच्या दगडानी हा प्रचंड किल्ला बांधलेला असल्यामुळे याला 'लाल किल्ला' असे म्हटले जाते. परंतु शहाजहान आणि औरंगजेब या बादशहाच्या काळी याचे नाव 'किला-ए-मुबारक' म्हणजे

भाग्यवान किल्ला असे होते. बहादुरशहाच्या वेळी याला ' किला-ए-मुअला ' असे म्हटले जात असे.

शहाजहान बादशहा आग्रा येथे राज्य करीत असल्यामुळे दिल्ली येथे आपली राजधानी हलविण्याचा त्याने विचार केला आणि १६३९ मध्ये लाल किल्ला बांधण्यास सुरुवात केली. सुमारे ९–१० वर्षांनंतर नऊ कोट रुपये खर्चून बांधलेला हा किल्ला तयार झाला. मुकरम्मत नावाच्या वास्तुशास्त्रज्ञाने याची उभारणी केली. हा किल्ला अष्टकोनी असून सुमारे दीड मैल याचा परिघ आहे. किल्ल्याच्या भोवती मोठ्या रुंदीचा खंदक असून पूर्वी तो पाण्याने भरलेला असे. पश्चिमेकडील बाजूच्या भव्य दरवाजाला ' लाहोरी दरवाजा ' असे नाव आहे. दक्षिणेकडील दरवाजाला ' दिल्ली दरवाजा' असे म्हणतात. लाल किल्ल्यात दिवाण-इ-खास, दिवाण-इ-आम, रंगमहाल, मोती मशीद इत्यादी बऱ्याच जुन्या इमारती आहेत. दिवाण-इ-आम हा भव्य दरबार महाल आहे. या महालात जागोजागी ऐतिहासिक प्रसंग चित्रित केलेले होते. या महालातच सुमारे १० फूट उंचीचा एक संगमरवरी चौथरा आहे. या चौथऱ्यावरच विशेष समारंभाच्या वेळी मयूर सिंहासन ठेवले जाई.

'रंगमहाल' या सुंदर इमारतीमध्ये बादशाही जनानखाना असे. या महालात सर्वत्र सुंदर वेलपत्तीचे नक्षीकाम असून त्यात भिन्न रंगाचे आणि विविध आकाराच्या फुलांचे खडे बसवलेले आहेत. त्यामुळेच याला रंगमहाल म्हटले जाते. दिल्ली व लाल किल्ला हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक ध्येयमंदिर बनलेले होते. सुभाषबाबूंनी ' आझाद हिंद सेना ' परदेशात उभी केली त्या वेळी ' चलो दिल्ली ' अशीच घोषणा दिली होती व नंतरचा खटलाही लाल किल्ल्यातच चालला होता !

लाल किल्ल्याच्या पुढेच काही अंतरावर जुम्मा मशिद आहे. तिला ' जामा मशिद ' असेही म्हणतात. भारतातील ही एक मोठी मशिद मानली जाते. शहाजहान बादशहाने या मशिदीचे बांधकाम सुरू केले होते व औरंगजेबाने ते १६५८ मध्ये पूर्ण केले.

यमुनेच्या पात्रात सलिमगढ नावाचा एक प्राचीन किल्ला आहे. १५४६ मध्ये सलिमशाह नावाच्या बादशहाने याचे नाव नाहरगढ असे ठेवले आज हा किल्ला भग्नावस्थेतच आहे.

जंतरमंतर नावाने प्रसिद्ध असलेली वेधशाळा नव्या दिल्लीत आहे. १७४२ मध्ये जयसिंह नावाच्या जयपूरच्या राजाने ही बांधली. खगोलशास्त्रासंबंधीची बरीच माहिती येथे मिळते व जुन्या धर्तीची बरीच साधने पाहावयास मिळतात. सूर्य, चंद्र व इतर नक्षत्राच्या स्थितीगतीचे अध्ययन येथील यंत्राच्या साहाय्याने करता येते.

बिर्लामंदिर ही अलीकडच्या काळात उभारलेली नव्या दिल्लीतील वास्तू फारच प्रेक्षणीय आहे. १९३९ साली महात्मा गांधींच्या हस्ते या मंदिराचे उद्‌घाटन झाले होते. येथील लक्ष्मीनारायणाचे मंदिर मध्यवर्ती असून बाजूला लहानलहान मंदिरे आहेत. मंदिराच्या परिसरातच गीता भवन आहे. तसेच बुद्ध-मंदिरही आहे. मंदिरात ठिकठिकाणी धार्मिक व पौराणिक चित्रे रेखाटलेली आहेत विविध धर्म ग्रंथातील वचनेही लिहिलेली आहेत. मंदिरातील वातावरण पवित्र व शांत असते

शहरापासून काही अंतरावर कुतुबमिनार हा प्रसिद्ध मनोरा आहे. याच्या जवळच कुतुब मशीद आहे. भारतात मुसलमानाची सत्ता प्रस्थापित झाल्या-नंतर बांधलेली ही पहिलीच मशीद म्हणून हिला एक वेगळेच महत्त्व आहे या मशिदीच्या जागी पूर्वी एक विष्णुमंदिर होते. कुतुबुद्दीन ऐबकने ११९५ मध्ये ते उध्वस्त करून तेथे त्याने ही मशिद बांधली. आसपासच्या सत्तावीस मंदिराचे भाग तोडून या मशिदीसाठी वापरण्यात आल्यामुळे तेथे सर्वत्र हिंदू शिल्प व नक्षीकाम याचे उत्तम नमुने पहावयास मिळतात. या मशिदीला ' कुव्वत-उल् इस्लाम म्हणजे ' इस्लामची शक्ती ' असे आणखी नाव आहे. या कुतुबमिनारामुळेच आजू-बाजूचा परिसर कुतुबनगर या नावाने ओळखला जातो येथील प्रचंड व भव्य दरवाजाला ' अलाई दरवाजा ' असे नाव असून तो अल्लाउद्दीन खिलजीने बांधलेला आहे. यावरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. येथून काही अंतरावर योगमायेचे किल्ल्यासारखे दिसणारे एक मंदिर आहे. याशिवाय आणखी बऱ्याच मशिदी, हिंदूंची, जैनाची, बौद्धांची मंदिरे, शिखांची शिखद्वारे या शहरात आहेत.

त्याशिवाय लालकिल्ल्यातील जफर महल, शाह बुर्ज, अजायबघर, हयातबख्श बाग, सावन तथा भादो, इत्यादी स्थळे आणि शहरातील कॅनॉट प्लेस ही भव्य, अद्यावत व सुंदर वर्तुळाकार अशी बाजारपेठ, तसेच सफदरजंग का मकबरा, इमाम जामीन का मकबरा, अलाई मिनार, शमशुद्दीन अल्‌मश का मकबरा,

अल्लाउद्दीन का मकबरा, दरगाह कुतुब साहिब इत्यादी मोगल राजवटीतील अनेक वास्तू पाहण्यासारख्या आहेत. त्यातील बऱ्याचशा आज भग्नावस्थेत असून गतकालाची केवळ याद करीत उभ्या आहेत. हुमायूनची समाधी ही वास्तू तर अतिशय विशाल व भव्य आहे. दिल्लीनगरीपासून ही वास्तू सुमारे चार-साडेचार मैलावर असून तिच्या सभोवताली मोगली पद्धतीचा विस्तीर्ण बगीचा आहे. त्याच्या भोवती भक्कम दगडी तटबंदी आहे. दक्षिणेला व पश्चिमेला अशी दोन भव्य प्रवेशद्वारे आहेत. सम्राट हुमायूनने आपण हयात असतानाच स्वतःच्या कबरीसाठी हे स्थान निवडले होते. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या बेगमेने ही भव्य वास्तू १५५६ मध्ये बांधली. या वास्तूच्या मध्यभागी हुमायूनची संगमरवरी कबर आहे. हुमायूनची बेगम, जहांदार शाह, फर्रुख सियार, दुसरा आलमगीर, आणि दाराशिकोह यांच्याही कबरी येथेच आहेत.



म. गांधी

आधुनिक भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या ज्या बिर्लाहाऊस-मध्ये ३० जानेवारी १९४८ च्या सायंकाळी झाली ते स्थानही आता राष्ट्रीय स्मारक

बनले आहे. राजघाटावर गांधीजींची साधी परंतु शांत, पवित्र अशा वातावरणातली समाधी आहे. " हे राम " असे गांधीजींनी अंतिमसमयी उच्चारलेले दोनच शब्द समाधीवर लिहिलेले आहेत. भारतभेटीसाठी येणारे परदेशी पाहुणे राजघाटावर जाऊन गांधीजींच्या स्मृतिसमाधीवर पुष्पचक्र अर्पण करतात.



पं. नेहरू

येथून जवळच रमणीय निसर्ग सान्निध्यात 'शातीवनात' भारतभाग्य-विधाते पं. जवाहरलाल नेहरू यांची समाधी आहे. समाधीस्थळी नेहरूंना प्रिय असलेल्या गुलाब पुष्पांची शेकडो झाडे लावलेली आहेत.

विजयघाटावर लालबहादुर शास्त्रींची समाधी आहे.

राष्ट्रपतीभवन, लोकसभा, सचिवालय, इत्यादी ब्रिटिशकालीन वास्तू प्रचंड, भव्य आहेत.

लोकसभेची वास्तु-संसदभवन किंवा पार्लमेंट हाउस-हे गोलाकार बांधलेले असून ब्रिटिश वास्तूकलेचा अप्रतीम नमुना आहे. १९२१ साली ड्यूक ऑफ कॅनॉट यांनी या भवनाचा पाया घातला आणि पाच वर्षानंतर ही वास्तू बांधून झाल्यावर १८ जानेवारी १९२७ रोजी लॉर्ड आयर्विन यांच्या हस्ते उद्घाटन झाले.



भारतीय लोकसभा

या गोलाकार वास्तूच्या बाहेरच्या व्हराड्यात वर्तुळाकार १४४ फूट उंच व भव्य असे १४४ स्तंभ उभे आहेत. या वास्तूतच लोकसभेचे एक व राज्यसभेचे एक अशी भव्य दालने आहेत. अन्य कामकाजासाठी पुष्कळच दालने असून तिथे निरनिराळ्या कचेऱ्या आहेत. भारतीय लोकशाहीचा अभिमान बिंदू अशीच ही प्रेरणादायी वास्तू आहे.

स्वातंत्र्यानंतर विज्ञान भवन, कृषी भवन, योजना भवन आदी बऱ्याच सुंदर, व भव्य वास्तू बांधण्यात आल्या असून त्यांनी दिल्लीची शान वाढवलेली आहे.

दिल्लीला आंतरराष्ट्रीय महत्त्व आहे. जगातील बहुतेक सर्व देशातील लोक दिल्लीत आढळतील. त्यांची निवासस्थाने, आरामगृहे आहेतच, शिवाय मोठमोठी अद्ययावत अशी हॉटेल्स, चित्रपटगृहे, क्रीडागृहे, क्लब्स इत्यादींनी दिल्ली झगमगून टाकलेली आहे.

राजकीयच केवळ नव्हे तर दिल्ली ही आता भारताची साहित्य, संगीत, चित्र, नृत्य, नाट्य इत्यादी ललित कलांचीही राजधानी बनलेली आहे. भारताची साहित्य अकादमी, संगीत व नाटक अकादमी, नॅशनल बुकट्रस्ट इत्यादी अनेक संस्था दिल्लीतच आहेत.

सर्व तऱ्हेच्या ज्ञानशाखातील शिक्षण देणाऱ्या मोठमोठ्या संस्थाही दिल्लीत आहेत.

दिल्लीने मानवी आणि राष्ट्रीय जीवनातील अनेक स्थित्यंतरे पाहिलेली आहेत. शूरवीर, राजे-महाराजे, सरदार-नवाब पाहिले, तसेच लुटारू, फंदफितूर, भ्याड, सत्तेसाठी भावाची हत्या करणारे, बापाला कैदेत टाकणारेही पाहिले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारे महान क्रांतीकारक जसे पाहिले तसेच थोर मुत्सद्दी, युगप्रवर्तक, शांतीदूतही पाहिले. दिल्लीने आनंदमहोत्सव, राज्योत्सव विविधहर्ष-सोहाळे पाहिले, तसेच दु:खाश्रू, रक्ताचे पाट, आगीचे लोळही पाहिले. तोफा-बंदुकींचे आवाज ऐकले तसे नाच-गाण्याचे, वाद्यांचे, मधुर, स्फूर्तीदायक स्वरही ऐकले. मिर्झा गालीब, अमीर खुसरो, मीर नकी 'मीर' सारखी साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रातली महान माणसे पाहिली, ऐकली. आजही केवळ हिंदी, उर्दू, पंजाबी भाषातीलच नव्हे तर सकल भारतीय भाषातील अनेक साहित्यकार व कलाकार दिल्लीत आहेत.

भारतातील सर्व राज्यातील, सर्व प्रदेशातील लोक दिल्लीत आहेत. आपल्या भारतीयत्वाचा अभिमान बाळगतानाच आप-आपली भिन्नता, विविधता जतन करीत आहेत. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृती हातातहात घालून दिल्लीत नांदताना दिसतात.

♠ ♠

# अद्ययावत चंदीगड

पंजाब आणि हरियाणा या दोन राज्याची संयुक्त राजधानी म्हणून आज चंदिगड प्रसिद्ध आहे.

तशी चंदीगडची ख्याती त्याच्या अद्ययावत अशा नावीन्यपूर्णतेमुळे आहे. अन्य शहराना असतो तसा प्राचीन इतिहास किंवा आख्यायिका, दंतकथा, इत्यादीही चंडिगडशी निगडित नाहीत. नाही म्हणायला या शहरापासून काही अंतरावर असलेले चंडीदेवीचे स्थान हेच एकमेव चंदिगड नावाशी नाते सागत आहे.

चंदीगड हे एक नवे कोरे करकरीत असे शहर आहे. या शहराचे अस्तित्व आणि इतिहास हा केवळ पंचवीस एक वर्षांच्या आत बाहेरला आहे.

पंजाब-हरियाणा ही राज्ये वेगवेगळी झाली, पण राजधानीची समस्या उभी राहिली. १९४७ च्या फाळणीच्या वेळीच पंजाबची राजधानी लाहोर हे शहर पाकिस्तानात गेले होते व पंजाबला राजधानीच नव्हती. काही दिवस जालंदर येथे राजधानी ठेवल्यानंतर पंजाबसाठी नवीन राजधानीच वसवण्याचा निर्णय भारत सरकारने केला व शिवालिक टेकड्यांच्या पायथ्याशी असलेल्या रम्य परिसरात चंदीगड हे अद्ययावत, सुदर, प्रशस्त शहर बाधून काढण्यात आले. या शहराची रचना ल कार्बूजी या विख्यात फ्रेंच स्थापत्यशास्त्रज्ञाकडे सोपवण्यात आली होती. त्याने आधुनिक पद्धतीने साऱ्या शहराची आखणी केली आहे. शहरातील विविध विभाग, दुकाने, घरे, बाजारपेठा, उद्याने, क्रीडास्थाने, मनोरंजनाची ठिकाणे इत्यादी सोयीस्कर व आकर्षक स्वरूपात आहेत. तसेच सरकारी इमारती, सचिवालय, विधानसभा, हायकोर्ट इत्यादींची भव्य आकर्षक रचना पाहण्यासारखी आहेत. ठिकठिकाणी विस्तीर्ण जलाशयही ठेवलेले आहेत.

चंदीगडवरून पंजाब-हरियाणात, दोन्ही स्वतंत्र राज्ये झाल्यानंतर तेढ निर्माण झाली होती, पण दोन्ही पक्षाशी वाटाघाटी होऊन २९ जानेवारी १९७० रोजी

निर्णय करण्यात आला की चंदिगड हे शहर पंजाबला देण्यात येईल. हरियाणाला त्याच्या नव्या राजधानीसाठी केंद्रसरकार २० कोटी रुपये देईल. त्यापैकी निम्मी



चंडीदेवीची मूर्ती

रक्कम कर्ज म्हणून राहील व निम्मी अनुदान म्हणून राहील. पुढील काही वर्षे

दोन्ही राज्याची राजधानी चंदिगड येथेच राहील व चंदिगड हे शहर तोवर केंद्र–शासित राहील.

आणि त्यानुसार आज चंदिगड हे केंद्र शासित शहर असून हरियाणा व पंजाब या दोन्ही राज्यांची संयुक्त राजधानी आहे. सचिवालयाच्या एकाच इमारतीत एका भागात पंजाब सरकारच्या कचेऱ्या आहेत, तर दुसऱ्या भागात हरियाणा सरकारच्या कचेऱ्या आहेत. विधान सभाही एकाच इमारतीत भरतात.




भांगडा नृत्य

चंदिगड शहरात पंजाबी व हरियाणामधील दोन्ही राज्यातील लोक राहातात.

धिप्पाड शरीराचा, गव्हाळ वर्णाचा, उंचापुरा, रुबाबदार, दाढीमिशावाला, मनगटात कंगन घातलेला, आणि डोक्यावर विशिष्ट पद्धतीची, व्यवस्थित बांधणीची पगडी घातलेला ‘ सरदारजी ’ येथे सर्वत्र दिसतो. तसेच हरियाणी जाट, राजपूत, गुर्जर लोकही दिसतात.

घेरदार घागरा, अंगात कुर्ती, माथ्यावर ओढणी अशा सर्व साधारण वेषातील हरियाणी स्त्रिया जशा बाजारहाट करताना दिसतात, तशाच पंजाबी वेषातल्या स्त्रियाही आढळतात.

शहरात शिखांचा गुरुद्वारा आहे तसेच हिंदूंची मंदिरेही आहेत.

शिख आणि हिंदू यांचे धार्मिक सण-समारंभ, उत्सव त्या त्या वेळी शहरात चाललेले असतात पंजाबी नर्तकांचा भांगडा रंगलेला असतो. हिंदूंची रामलीला, रावण दहन लोकांची गर्दी खेचीत असतात.

पंजाबी आणि हिंदी अशा दोन्ही भाषा चंदिगडमध्ये सर्वत्र कानावर पडतात. ' पंजाब युनिव्हर्सिटी ' चंदिगडमध्येच आहे. पंजाबी व हरियाणी तरुण-तरुणी येथे उच्चस्तरीय शिक्षण घेत असतात

पंजाबी आणि हरियाणी, शिख आणि हिंदू अशा दोन धर्मपंथातील लोक-जीवनाचे चंदिगड हे संगमस्थानच आहे. या संगमात मुस्लीम, खिश्चन, जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथांचेही सहकार्य लाभलेले आहे. तसे पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्ये अनेक वर्षे शासकीयदृष्ट्या एकत्रच होती. सांस्कृतिकदृष्ट्या तर त्यांची भिन्नता ही एका अभिन्नतेत सामावलेली आहे. दोन्ही लोकजीवनावर, व्यवहारावर एक-मेकांची दाट छाया उमटलेली दिसते.

# लोकसाहित्य

लोकसाहित्य ही त्या त्या भाषेची एक अमूल्य अशी ठेव आहे. लोकभावना, लोकाचार, आणि लोकस्थिती याचे दर्शन लोकसाहित्य घडवीत असते. प्रत्येक भाषेत आणि बोलीत असे साहित्य आहे. दीव, गोवा व चंदिगडच्या परिसरातील लोककथाची ही वानगी :

## दीवमधील लोककथा

### पान-दे-जेठी

गोष्ट आहे घडलेली. फिरंग्याच्या काळातली. दीव-दमण-गोवा हा सगळाच प्रदेश पोर्तुगीजाच्या सत्तेखाली होता. पोर्तुगीज सरकारचे अधिकारी मन मानेल तसा कारभार करायचे. प्रजेला छळायचे. कायद्याचा दुरुपयोग करायचे. तर त्याकाळी एक कायदा होता. एखाद्या मुलाचे आईबाप जर वारले आणि ते मूल अनाथ झाले तर त्याचे पालक सरकार बने.

सरकार ते मूल ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या ताब्यात देत असे; त्याला ख्रिश्चन धर्माची दीक्षा मिळत असे.

अधिकारी ह्या कायद्याची अंमलबजावणी करताना निष्ठुरपणाची घाईगर्दी करू लागले होते. मुलाचा ताबा मिळवू लागले होते. मुलाच्या आईचे किंवा बापाचे प्रेत घराबाहेर नेण्याचीही वाट ते पाहात नसत. मूल रडले-ओरडले तरी नौकर लोक त्याला ओढून न्यायचे आणि पादरी मंडळीच्या हवाली करायचे. हा अन्याय हा जुलूम लोक मुकाट्याने सहन करायचे. मुलाचे काके, मामे उघड्या डोळ्यानी बघायचे. परकी सरकारशी कोण लढणार?

पण याही अन्यायाला वाचा फुटली, आणि ती एका खत्री जमातीमधल्या जेठीबाई नामक स्त्रीने फोडली. तिला हा जुलूम सहन झाला नाही.

जेठीबाई तशी गरीबच होती. रंगाऱ्याचा धंदा करायची नी पोट भरायची. पण तिने हा अन्याय वेशीवर टांगण्याचा निश्चय केला आणि बोटीत बसून गोव्याला आली. गोव्यात पोर्तुगीजांचा मोठा अधिकारी असे. राजप्रतीनिधी. तर जेठीबाईने हाती जळती मशाल धरली, दुसऱ्या हातात लहानशी चंदनी पेटी घेतली आणि डोक्यावर धगधगत्या निखाऱ्याची पाटी ठेवली; आणि आली राजप्रतीनिधीच्या दारापुढे. म्हणू लागली, " न्याय द्या ! न्याय द्या ! "

जेठीबाईचा पुकारा ऐकून राजप्रतीनिधीने खिडकीतून बाहेर पाहिले तर अशा विचित्र अवस्थेत एक स्त्री ! त्याने येऊन विचारले, " बाई, हे काय ? "

जेठीबाई म्हणाली, " साहेब, तुमच्या राज्यात दिवसाउजेडी अंधार माजला आहे म्हणून ही मशाल घेतली आहे आणि जुलूम जबरदस्तीच्या आगीत प्रजा होरपळून निघत आहे म्हणून डोक्यावर ही निखाऱ्याची पाटी आहे ". साहेब चकित झाला. साहेबाने जेठीबाईला घरात नेले. तिची फिर्याद लक्षपूर्वक ऐकली. आणि 'अन्यायाचा बंदोबस्त करतो' असे आश्वासन देऊन तिच्या डोक्यावरची पाटी उतरवली.

जाता जाता जेठीबाई म्हणाली, " साहेब, महाराणींचा वाढदिवस जवळ आला आहे तर त्यांना माझीही एवढी भेट द्या ! "

जेठीबाईने ती चंदनी पेटी साहेबाच्या हाती दिली. त्या पेटीत ढाक्याच्या मलमलीचे अत्यंत मुलायम, तलम, नाजूक असे पान होते. साहेब ती अपूर्व वस्तू पाहून खूष झाला; आणि म्हणाला,

" जेठीबाई, फारच सुंदर भेट आहे ही ! अवश्य महाराणींना देईन. त्यांना फारच आवडेल ! "

जेठीबाई परतली.

राजप्रतीनिधीला वाटले, कुठली कोण जेठीबाई. कोण तिला तिकडे ओळखणार ! त्याने ती सुंदर भेट आपलीच म्हणून महाराणींना नजर केली. राणीही ती तलम मलमल पाहून फार खुष झाली. आणि रंगही कसा अस्मानी. राणीचा आवडता ! राणी पुनः पुन्हा मलमलीचे पान उलगडून पाहू लागली तर विविध रंगाच्या छटा त्या पानावर दिसू लागल्या. कडेला तर फुलापुलाची नाजुक कशिदाकारी !

एकदा राणीने मलमलचे पान आपल्या गळ्याभोवती स्कार्फसारखे घेतले. पण त्या निळसर रंगाचीच छटा तिच्या गालावर उमटली.

राणीने स्कार्फ धुऊन आणायला नौकराणीला सांगितले. तिने स्कार्फ पाण्यात घातला तोच अस्मानी रंग गेला आणि मलमलीचे पान पोपटी दिसू लागले. पोपटी रंगही किती छान खुलून दिसत होता. राणीने गळ्याभोवती ते लपटले तर तिच्या गालावर पोपटी छटा उमटली. राणीने नौकराणीला पुन्हा ते धुऊन आणायला सांगितले. तिने ते पाण्यात बुडवितांच पोपटी रंग गेला नि ते पान गुलाबी दिसू लागले !

राणीला गुलाबाच्या फुलासारखा तो सतेज रंगही आवडला, पण त्या मलमलीच्या पानाची रंग बदलण्याची किमया पाहून तिला नवल नि कुतूहलही वाटले. तिने नौकराणीला पुन्हा ते पान पाण्यात घालायला सांगितले.

नौकराणीने ते पाण्यात घालतांच गुलाबी रंग अदृश्य झाला आणि ते पान छान केशरी दिसू लागले !

अशा तऱ्हेने सात वेळा सात रंग त्या पानावर प्रकट झाले ! आणि शेवटी पांढरा शुभ्र रंग आला. त्या पांढऱ्या रंगावर काळी अक्षरेही उमटली !

राणीने नवलाईने वाचली तर तो जेठीबाईचा सरकारी अधिकाऱ्याच्या जुलुमाविरुद्ध दाद मागणारा अर्ज होता !

राणीला वस्तुस्थिती कळली. तिने आपला खास प्रतिनिधी पाठवून चौकशी केली. जेठीबाईचे गाऱ्हाणे खरेच होते.

राणीने जेठीबाईची मोठी कदर केली आणि ताबडतोब शाही फर्मान काढले. त्यानुसार दीव, दमण व गोवा प्रदेशातील प्रजेच्या तक्रारी सरळ महाराणींच्याकडे धाडण्याचा अधिकार जेठीबाईला मिळाला. ह्या फर्मानात पुढील गोष्टी नमूद केलेल्या होत्या

( १ ) अनाथ मुलांना ख्रिस्तीधर्माची दीक्षा देणारा कायदा ताबडतोबीने रद्द करण्यात येत आहे.

( २ ) जेठीबाईला महाराणीची कन्या समजून तिच्या सन्मानार्थ आठवड्यातून एकदा बँडवादन ठेवण्यात यावे.

( ३ ) जेठीबाईच्या पुढून किंवा तिच्या घरासमोरून गव्हर्नरासह जो जो कोणी सरकारी अधिकारी जाईल त्याने डोक्यावरील हॅट काढून अभिवादनाची सलामी दिली पाहिजे.

जेठीबाईचे मलमलचे पान पोर्तुगालमध्ये 'पान-दे जेठी' या नावाने विख्यात झाले. पोर्तुगीजांच्या इतिहासातही त्याला स्थान मिळाले आहे. 'पान-दे-जेठी'

याच नावाने जेठीबाईचे घराणेही दीवमध्ये प्रसिद्धीस आले.

जेठीबाई होती तोवर सरकारी अधिकारी सलामी देतच, पण ती गेल्यावरही तिच्या घरासमोरच्या पिंपळाच्या झाडापुढे उभे राहून पोर्तुगीज अधिकारी तिच्या स्मृतीला सलामी देत असत !

## गोमंतकातील लोककथा

### शितेचे पोहे

गोष्ट आहे गोवा-कोकणातली. फणस-काजूंच्या देशातली. तर एकदा काय झालं, एक कवडा उठला, घरट्यामधून भुर्रकन बाहेर पडला. उडत उडत एका घराच्या अंगणात जाऊन थांबला. अंगणात तांदूळ वाळत घातलेले होते. कवड्याला भांडारच सापडले. कवडा हळूच गेला. चोचीनं एकेक तांदूळदाणा टिपू लागला. टिपता टिपता एकदम त्याच्या कानी घरातून आवाज आला—

नातुण्डम् ! पन्तुण्डम् !
नातुण्डम् ! पन्तुण्डम् !

आवाज ऐकून कवडा दचकला. घाबरला. भुर्रकन उडून शेजारच्या शेवग्याच्या झाडावर बसला. तेवढ्यात 'खो खो खो खो' करून हसण्याचा आवाज आला. कवड्यानं भीतभीतच पाहिलं तर ओसरीवर टांगलेल्या पिंजऱ्यातला पोपट हसत होता. हसता हसताच म्हणाला,

"काय कवडेदादा, काय झालं घाबरायला ? अहो, एवढे भ्यालात का ?"

कवड्याला थोडा धीर आला. पोपटाजवळ जाऊन म्हणाला, "मिठूमियाँ, अरे, ह्या आवाजाला घाबरलो मी. बघ केवढा आवाज येतोय तो— 'नातुण्डम् ! पण्तुण्डम् ! नातुण्डम् ! पन्तुण्डम् !... कसला रे हा आवाज ? तुला नाही भीती वाटत, पोपटा ?"

"छट् ! मुळीच नाही. अरे, हा आवाज आहे मुसळाचा."

"मुसळाचा ?"

"हा हा मुसळाचा ! आमच्या घरात बायकानी— आज कांडण घातलंय पोह्यांचं !" पोपटानं सांगितलं. पण पोहे म्हणजे काय, हे काही कवड्याला कळलेच नाही. त्यानं विचारलं,

"पोह्यांचं कांडण म्हणजे रे काय, पोपटा ?"

"अरे, तांदूळ कांडून, कांडून पोहे करतात !"

" पोहे कसे लागतात रे, पोपटा ? "

" झकास ! तू नाही कधी खाल्लेस ? "

" पाहिलेसुद्धा नाहीत तर ! बरं, मग हा आवाज का असा येतोय ? " कवड्याने विचारले.

" अरे, तांदूळ काडताना मुसळांचा असा आवाज येतो. ही मुसळं काय सांगतायत ठाऊक आहे का ?

" ती सागतायत की, जो कोणी हे पोहे खाईल तो आपली नातवंड पतवंड पाहील. " नातुण्डम् ! पन्तुडम् ! नातुण्डम् ! पन्तुन्डम् ! "

" असं, असं ! बरं पोपटभाऊ, येतो मी आता. "

कवड्यानं पोपटाचा निरोप घेतला आणि तो आपल्या घरट्याकडं उडत उडत निघाला. उडता उडता तो मनाशी पोह्याचाच विचार करीत होता. जाता जाता दिसतील तेवढे तादूळ टिपीत होता. टिपता टिपता चागले दोन शेर तादूळ जमा झाले. कवडा ते घेऊन घरी गेला.

कवड्याच्या घरी त्याची बायको होती आणि बहीण पण होती. बहिणीचे नाव होते शिता. कवडा घरी आला. त्याने बायकोला आणि बहिणीला हाक मारली. म्हणाला,

" एक एक शेर तादूळ घ्या. त्याचे पोहे करून द्या ! "

दोघानी एक एक शेर तादूळ घेतले. मुसळाने कांडून त्याचे पोहे बनवले. कवड्याच्या बायकोने कोंड्यासकट पोहे पुढे आणून ठेवले. ते ढीगभर दिसले. शितेने मात्र पोहे चागले काडून काडून पातळ केले. नीट पाखडले. कोंडा, कणी काढून टाकली. कवड्याच्या पुढं आणून ठेवले. ते एवढेसे दिसले. तसा कवडा रागवला. संतापला. बहिणीला बोल बोल बोलला. घरातून तिला हुसकून लावले. तिचे पोहे फेकून दिले.

मग कवड्यानं बायकोनं आणून ठेवलेले मूठभर पोहे घेतले. तोंडात टाकले; तर त्याला ना चव ना ढव. "थु. थुः थु." करून उठला. पोपटाकडे गेला. म्हणाला,

" काय रे हे खाणं ! ह्याला का चव आहे. तुझा धनी असलेच पोहे खातो वाटते ! "

कवड्याच्या मुठीतले पोहे पाहून पोपट हसला. म्हणाला,

" कवडेदादा, अहो हे तर नीट पाखडलेलेसुद्धा नाहीत, यात कोंडा-कणी तशीच आहे. कुणी केले हे पोहे ? "

मग कवड्यानं सगळी हकीकत सांगितली. ती ऐकून पोपट म्हणाला, "बाईलवेड्या, बहिणीने दिले तेच चांगले पोहे होते. खाऊन तरी पहायचेस. चवदार लागले असते! उगाच बिचारीवर रागवलास. जा तिला परत आण, तिची समजूत घाल."

कवडा तसाच परत फिरला, घरी आला. शिता केव्हाच गेली होती कवड्यानं तिचा शोध घेतला "शिते-शिते-शिते" म्हणत रानभर हिंडला. पण शिता कुठंच दिसली नाही. दिसले मात्र शितेचे पोहे—एक प्रकारचे गवत. शितेने केलेले पोहे कवड्याने फेकून दिले ते वाऱ्याने रानभर झाले. जमिनीत रुजले. त्याचे गवत उगवून आले. गवताच्या टोकावर त्याचे झुपकेदार त्री फुलले. ते पोह्यासारखेच दिसते.

कवडा फिर फिर फिरला. सगळीकडं हे गवतच गवत त्याला दिसले. त्याला आपल्या चुकीबद्दल फार फार वाईट वाटले. शिता कधी सापडलीच नाही. पण वेडा कवडा मात्र अजूनही तिचा शोध घेत भिरभिरत असतो. शितेला हाक देत असतो—

**उठ ग शिते! कौडा पोर! पोर! पोर!**
**शितेच्या हातचे पोहे गोड! गोड! गोड!"**

अजूनही रानोमाळ कवड्याच्या हाका अधुनमधुन ऐकू येतात. अजूनही रानोमाळ '*शितेचे पोहे*' *उगवलेले आढळतात.*

## चंदिगडच्या परिसरातील लोककथा

### जशास तसे

कोण्या एका गावात दोन भाऊ राहात होते. एकाचे नाव होते चंद्र आणि दुसऱ्याचे नाव होते भोला. दोघे लहान असतानाच त्याचे आई-वडील देवाघरी गेले होते. या अफाट जगात दोघेच्या दोघेच भाऊ राहिले होते. त्याना कोणी नव्हते. दोघानी मग काबाड—कष्ट करून कसेबसे पोट भरायला सुरुवात केली. ते कधी कुणाच्या शेतावर जायचे, तिथे राबायचे, कधी कुणाच्या घरकामात मदत करायचे, कधी काही, कधी काही असे पडेल ते. मिळेल ते काम ते करायचे. एकमेकाला जीव लावून राहायचे.

दिवस आपले चालले होते. दोघे भाऊ वाढत होते. तर एकदा असेच थंडीचे दिवस होते. संध्याकाळची वेळ होती. भोला आणि चंद्र कामावरून परतले

होते. पाला–पाचोळा, काटक्या-कुटक्या जमवून शेकोटी पेटवून हात पाय शेकत बसले होते. शेकता शेकता दोघांच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. कामाधामाबद्दल ते बोलत होते. बोलता बोलता चंद्र म्हणाला,

" हे बघ भोला, या खेड्यात राहून जगणं आता दिवसेंदिवस कठिण होणार आहे. अलीकडे किती तरी दिवसरात्र मला कामच मिळालेलं नाही. तुलाही गुरं राखायचंच काम मिळालेलं आहे. तेव्हा मला वाटतं, की कुठं तरी दुसऱ्या गावात जावं नी काम पहावं. "

भोलालाही चंद्राचे म्हणणे पटले. कारण काम नसल्यामुळे होणारी पोटाची ओढाताण, आबाळ, तोही सोसत होताच. पण म्हणाला,

" चंद्रभैया, तुझं म्हणणं बरोबर आहे. पण तू राहा इथं नि मी जातो दुसरीकडं. "

" नाही नाही भोला, तसं नाही होणार. तू राहा इथंच नि मीच जातो दुसरीकडं. तू अजून लहान आहेस. मी नाही तुला परक्या ठिकाणी जाऊ देणार."

भोलाने मग चंद्रभैयाचे ऐकले. तो काही बोलला नाही. गप्प राहिला.

दुसरे दिवशी भल्या सकाळीच भोलाला नीट सांगून-सवरून, समजावून, चंद्र घराच्या बाहेर पडला; दुसऱ्या गावाची वाट चालू लागला. या आधी कधी तो गाव सोडून कुठे गेलेला नव्हता. त्यामुळे कसे जावे, कुठे जावे, काय करावे, हे काहीच त्याला ठाऊक नव्हते. पण मग तो आपला नाकासमोरच्या वाटेने चालायलाच लागला. पोहोचू तिथे पोहोचू, असे मनाशी म्हणाला.

चालता चालता दुपार झाली. सूर्य डोक्यावर आला. ऊन तापले. चंद्रभैयाच्या पोटात भुकेने कावळे ओरडायला लागले होते. म्हणून मग तो एका विहिरीजवळ झाडाखाली थांबला. बांधून आणलेली शिदोरी सोडली. पोटभर खाल्ली. पाणी प्याला. विश्रांतीसाठी घटकाभर तिथेच लवंडला.

थोड्याच वेळाने तिथे एक जाट आला. जाटाने विहिरीचे पाणी घेतले, प्याला, निघाला. तशी चंद्रने त्याला विचारले, " ही वाट कुठल्या गावाला जाते हो ? "

" तुला कुठं जायचं आहे पोरा ? " जाटाने त्यालाच प्रश्न केला. पण या प्रश्नाचं उत्तर चंद्राला तरी कुठं ठाऊक होते ? म्हणून तो म्हणाला,

" कुठं जायचंय हे मलादेखील कुठं ठाऊक आहे हो ? "

" म्हणजे ? "

"म्हणजे, असाच निघालोय गाव सोडून कुठं तरी पोट भरायला काम-धंदा पहायला." चंद्र म्हणाला. जाट क्षणभर गप्प राहिला. मनाशी कसला तरी विचार केला. नंतर म्हणाला,

"भाई, मलासुद्धा एक चाकर हवाच आहे. बघ तुला वाटलं तर. राहा माझ्याकडं."

हे ऐकून चंद्र खूष होऊन गेला. त्याला तो जाट म्हणजे देवच वाटला. तो उठला आणि जाटाबरोबर त्याच्या घरी गेला. घरी गेल्यावर कामधामाबद्दल, पगार-पाण्याबद्दल बोलणी निघाली. जाट म्हणाला,

"मी तुला महिना पाच रुपये पगार देईन. जेवण–खाण, कपडा–लत्ता, हे अलग."

"ठीक आहे."

"पण एक शर्त आहे."

"कोणती?"

"शर्त अशी की जर कधी तू नोकरी सोडून जायला निघालास तर मी तुझं नाक कापून घ्यायचं आणि जर कधी मी तुला चाकरीवरून काढलं तर जाताना तू माझं नाक कापून टाकायचं. बघ, ही शर्त मान्य असेल तर, आजपासून काम सुरू कर!"

"पण मला काम तरी काय करावं लागेल?"

चंद्राने विचारले. यावर टाळके खाजवीत जाट म्हणाला, "हेच, आपलं घरचंदारचं, शेतीवाडीतलं."

चंद्रभैयाने शर्त मान्य केली. काम सुरू केले. कारण, दुसरे काम त्याच्यापुढे तरी कुठे होते? म्हणून फार विचार न करता तो कामाला लागला. चटकन् काम मिळाले याचाच आनंद त्याला झाला.

काम करता महिना भरला. पगाराचा दिवस उद्यावर येऊन ठेपला. चंद्र आपल्या मनात खूष झाला होता. तर जाट आपल्या मनात कष्टी बनला होता. चंद्र आपल्या मनात आनंदाची मनोराज्ये रचीत होता, तर जाट आपल्या मनात वेगळाच बेत आखीत होता. जाट होता शेतीवाडीचा, घरदाराचा, गुराढोराचा धनी, पण तसाच होता कंजूष देखील! महा चिकट! कुणाला दोन पैसे उचलून द्यायचे म्हटले, म्हणजे त्याच्या अगदी जिवावर यायचे! चंद्राचा महिना भरला तसा जाटाच्या पोटात गोळा उठला. आता पाच रुपये द्यावे लागणार! म्हणून

तो मनाशी विचार कर करून असा उपाय शोधू लागला की, आपले पाच रुपयेही वाचतील आणि चंद्र चाकरी सोडूनही जाईल.

जाटाने बराच वेळ डोकं खाजवलं. बराच वेळ विचार केला. मग त्याला एक युक्ती सुचली. तशी तो झटकन् उठला. सादी कोपऱ्यातून एक गळका घडा काढला. चंद्रला हाक मारून म्हणाला,

"उद्या पुष्कळ पाहुण यायचे आहेत, पाणी लागणार. तर परसातला राजण या घड्यानं संध्याकाळपर्यंत भरून टाक!"

चंद्र घडा घेऊन नदीवर गेला. भरून खांद्यावर घेतला घराकडे परत निघाला. पण अर्ध्या वाटेतच घड्यातले पाणी गळून गेले, घडा रिकामा झाला.

चंद्र परत नदीवर गेला. घडा भरून घेतला. घराकडे निघाला, अर्ध्यावाटेवर जाईतो पुन्हा तीच गत झाली.

चंद्राच्या अंगावरले कपडेही भिजून गेले, चिंब झाले.

पण चंद्र परत नदीवर गेला. घडा भरून घेतला. घराकडे निघाला. अर्ध्या वाटेवर जाईतो परत तीच गत.

घड्याचे छिद्र एवढे बारीक होते की, ते पटकन् दिसूनही येत नव्हते.

बिचारा चंद्र! अर्ध्या वाटेवरून परत जायचा, घडा भरून घ्यायचा पण थोड्याच वेळात घडा रिकामा होऊन जायचा.

होता, होता सकाळ टळली; दुपार झाली. दुपारही टळली; संध्याकाळ झाली. पण रांजणात एक थेंबभर पाणी काही पडले नव्हते. चंद्र नदीपर्यंत फेऱ्या मारून हैराण झाला होता. पार दमून गेला होता.

संध्याकाळ झाली तशी जाटाने राजणात डोकावून पाहिले. त्याला राजण रिकामा राहाणार हे माहीतच होते, पण वरकरणी तणतणत गेला आणि चंद्राला म्हणाला,

"दिवसभर पाणी वाहतोस, पण राजण नाही भरून झाला? काय करत होतास? कुठं गेला होतास?"

"धनी कुठं गेलो नाही, आलो नाही, पाणीच वाहातोय. पण घडा गळका आहे त्याला काय करू?"

"घडा गळका आहे?"

"होय धनी."

"बघू बरं छिद्र"

पण छिद्र इतकं बारीक की चंद्रला काही ते दाखवता येईना.

जाट म्हणाला, " खोटं बोलतोस आणखी? बरं, आज झालं नाही ते नाही, पण उद्या पहाटेच या घड्यानं राजण भरून टाक!"

" या घड्यानं राजण भरता येणार नाही, धनी."

" भरलाच पाहिजेस."

" मग ते राजण भरणंही नको नि तुमची असली चाकरीही नको." चंद्र वैतागून म्हणाला.

जाटाला हेच हवे होते. तो म्हणाला,

" नको चाकरी तर सोडून दे. पण शर्तीप्रमाणं नाक कापून दे!"

बिचारा चंद्र मोठ्या संकटातच सापडला होता. काही तरी करून वेळ मारून नेण्यासाठी तो म्हणाला, " बरं तर, भरतो पहाटे राजण."

आणि मग संधी साधून रातोरातच चंद्र आपल्या गावी परत आला. भोलाला नवल वाटले. त्याने विचारले, " चंद्रभैया, असा कसा अंधारात आलास?" चंद्रभैयाने सगळी हकिगत सांगितली. ती ऐकून भोलाला या दुष्ट जाटाचा फार फार राग आला. त्याच्या मनातला डाव भोलाने ओळखला. त्याने ठरवले, या ठकाला चांगली अद्दल घडवली पाहिजे. तो म्हणाला, " चंद्रभैया, आता मी परगावी जातो. तू इथे राहा." आता भोलाला 'जाऊ नको' म्हणायला चंद्राला जागाच नव्हती. तो गप्प बसला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच भोला निघाला. चाकरी शोधायला जाता जाता दुपारच्या वेळी त्याच गावी जाटाकडे तो गेला. जाटाला नवा चाकर हवाच होता. त्याने आपली शर्त सांगितली, " तू स्वतःहून नोकरी सोडलीस तर मी तुझं नाक कापीन आणि मी जर तुला चाकरीवरून काढलं तर तू माझं नाक कापायचं."

" मंजूर आहे आपली शर्त," भोला म्हणाला. कामाला लागला.

होता होता महिना झाला. पगाराचा दिवस जवळ येऊन ठेपला. कंजूष जाटाने तोच डाव रचला. तोच गळका घडा भोलाला देऊन म्हणाला,

" उद्या संध्याकाळपर्यंत राजण भरून टाक." सकाळी भोलाने घडा घेतला आणि नदीकडे निघाला. जाता जाता रस्त्यात मुद्दामच निसरड्यावरून घसरला. दाणकन् पडला. घडा खळकन् फुटला! खापराचे तुकडे जाटापुढे टाकीत तो म्हणाला, " घसरून पडलो. घडा फुटला, तर दुसरा द्या."

जाट मुकाट्याने उठला. दुसरा घडा आणून दिला. पण तोही पहिल्या-

सारखाच गळका होता. म्हणून भोलाने पुन्हा घसरून तोही फोडून टाकला. मग जाटाने कुरकुरतच तिसरा तसलाच घडा दिला. भोलाने त्याचीही तशीच वाट लावली.

जाटाने मग विचार केला; दुसरी युक्ती काढली पाहिजे, म्हणून डोके खाजवीत बसला.

दुसऱ्या दिवशी तो भोलाला म्हणाला, " मी बाहेर जातो आहे. परत येईपर्यंत जेवण करून ठेव. माझ्याबरोबर दोन पाहुणेही असतील, त्यांचेही भोजन तयार कर."

जाट बाहेर गेल्यावर भोलाने जेवणाची तयारी सुरू केली. पण घरात गवताची काडी नव्हती की साधी जळणाची लाकडे नव्हती. मग भोलाने काय केले, शेतीची जी लाकडी औजारे होती तीच चुलीत घातली. दणकून पेटविली. स्वैंपाक तयार करून ठेवला.

दुसऱ्या दिवशी जाट शेतीवर निघाला. औजारे पाहू लागला, तर औजाराचा पत्ताच नाही. त्याने भोलाला विचारले, भोलाने ती का ? जळणासाठी वापरल्याचे सागून टाकले.

ते ऐकून जाट भोलावर दात–ओठ खात तणतणत बसला. दुपारी शेतावर गेल्यावर जाटाने तोडलेल्या उसाची मोळी भोलाच्या डोक्यावर दिली आणि म्हणाला, " ही घरी टाकून ये."

भोला मोळी डोक्यावर घेऊन घरी गेला. घरी जाटाची महतारी होती. तिला भोलाने विचारले, " आजीबाई, ही मोळी कुठं ठेऊ ?"

" ठेव माझ्या डोंबलावर." म्हातारी म्हणाली. भोलाने चटकन उसाची मोळी म्हातारीच्या डोक्यावर टाकली. म्हातारी पटकन् मरून गेली !

जाट संध्याकाळी घरी आला, पाहतो तर उसाच्या मोळीखाली म्हातारी चेंगरलेली ! त्याने भोलाला विचारले, भोलाने सागितले, " आजीबाईने सागितले तसे केले. त्याच म्हणाल्या, ठेव माझ्या डोंबलावर. मी ठेवली. यात माझी काय बरं धनी चूक ?"

जाट कपाळाला हात लावीत पुढच्या उद्योगाला लागला. पण भोला दररोज काही ना काही तरी नवीन नुकसान करू लागला. हे मोड, ते मोड, अशा त्याच्या खोड्यांनी जाट काळजीत पडला. तो चाकरी सोडून जावा यासाठी जाटाने नाही नाही ते उपाय योजले, नाही नाही ती कामे त्याला सागितली, पण भोला

भलतेच काही तरी करून ठेवायचा ! जाट अगदी हैराण झाला !

शेवटी त्याने आपल्या बायकोशी विचारविनिमय केला. दोघा नवरा-बायकोने मिळून ठरवले की, आज अर्ध्या रात्री उठायचे आणि झोपलेल्या भोलासकट त्याचे बाजले गावाबाहेरच्या विहिरीत टाकून द्यायचे. पीडा जाईल मागची, कायमची.

पण हाही बेत भोलाने ऐकला होता.

रात्री सगळीकडे सामसूम झाल्यावर भोला हळूच उठला. जाटाच्या बायकोचे लुगडे स्वतःच नेसला, आपल्या जागी घोरत पडलेल्या जाटाच्या बायकोची बाज नेऊन ठेवली. तिच्या अंगावर आपली चादर टाकून दिली. आणि जाटालाही जाऊन त्यानेच उठवले. रात्रीच्या अंधारात आणि अर्धवट झोपेत जाटाच्या काही लक्षात आले नाही. भोलाला तो आपली बायको समजला. दोघांनी मिळून ते बाजले उचलले. गावाच्या बाहेर नेऊन तिथल्या विहिरीत टाकले. रातोरात अंधारात गुपचूप घरी येऊन झोपले.

सकाळी उठून जाट पाहतोय तर भोला आहेच आणि बायको नाही ! त्याला आश्चर्य वाटले. त्याने भोलाला विचारले,

" काय रे, तुझी मालकीण कुठं गेली ? "

" मालक, रात्रीच नाही का गावाबाहेरच्या विहिरीत नेऊन टाकली ? विसरलात वाटतं ! "

हे ऐकून जाट मटकन खालीच बसला. दुःख करू लागला. जाटाला आता स्वतःच्याच जिवाची भीती वाटायला लागली. एके दिवशी हा भोला आपलाच जीव घेईल, असे त्याला वाटू लागले. पण भोलाच्या तावडीतून सुटायचे तर त्याला चाकरीवरून काढले पाहिजे, आणि चाकरीवरून काढायचे तर शर्तीप्रमाणे नाक कापून घेतले पाहिजे !

जाटाने विचार केला, जीव जाण्यापेक्षा नाक गेलेले परवडले !

त्याने भोलाला बोलावून तसे सांगितले. झाल्या दिवसाचा पगार मोजून दिला. आपले नाक कापून घेतले.

चंद्रभैयाला जाटाने फसवले होते. त्याचा बदला घेऊन भोला खुषीने घरी परत आला. चंद्रभैयालाही भोला परत आल्याचा आनंद झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रा. क्र.
ग्रंथ ... (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नवीन क्रमांक २९८८
ग्रंथ - प्रवास
स्थळ

**आभार** 'आपला भारत' मालेतील हे अखेरचे— विसावे पुस्तक.

बरेच दिवस मनात एक योजना,

संकल्प बाळगून होतो. त्या संकल्पाची सिद्धी अशा प्रकारे होत आहे.

मन आनंदाने भरून आले आहे.

एक प्रकारची कृतार्थता अनुभवीत आहे.

'आंतरभारती'चे काम करीत असताना अनेक शाळांमधून शिक्षक— विद्यार्थ्यांशी राष्ट्रीय एकात्मतेविषयी, भारतीयत्वाविषयी बोलत असे; चर्चा करीत असे.

त्यातून काही प्रकल्प पुढे येत असत.

परंतु ते साकार करण्यासाठी आवश्यक अशा साधनांची, साहित्याची उणीव फार तीव्रतेने जाणवत असे.

या जाणिवेतूनच ही माला अवतरली.

एका प्रचंड प्रकल्पामधला हा एक लहानसा, नम्र प्रयत्न. यातील उणीवांची जाणीव आहे. असे आणखी प्रयत्न व्हावेत. देश महान बनावा. वैभवी व्हावा.

ही माला घरोघर पोचावी. शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावी, अशीच आता इच्छा आहे.

या निमित्ताने माझा देश मला हिंडून फिरून पाहता आला. विविध निसर्ग, विविध कला, विविध लोकजीवन... न्याहाळता आले.

पुष्कळ फिरलो, तसे पुष्कळ ऐकलेही; आणि त्याहून पुष्कळ वाचलेही.

या कामी अनेक व्यक्तींचे, ग्रंथांचे साहाय्य झाले.

त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण.

एवढी ही माला एवढ्या आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध करण्यास पुढे सरसावलेले माझे प्रकाशक मित्र श्री. वसंतराव गोगटे व मुद्रक मित्र श्री. बापूसाहेब देव यांचे मनःपूर्वक आभार !

राजा मंगळवेढेकर

# ‘ आपला भारत ’ माला

आपल्या भारतातील प्रत्येक राज्याचा व केन्द्रशासित प्रदेशाचा ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक — सर्वांगीण दृष्टिकोणातून ललितरम्य भाषेत परिचय करून देणारी

## वीस पुस्तके

(१) प्रियतम भारत
(२) सहोदर आंध्र
(३) प्यारो राजस्थान
(४) गरवी गुजरात
(५) सोनसळी बंगाल
(६) कामरूप आसाम
(७) हरित हरियाणा
(८) पंचनद पंजाब
(९) लावण्यखनी काश्मीर
(१०) हिमवंत हिमाचल
(११) करूनाडु कर्नाटक
(१२) कथकली केरळ
(१३) द्राविड तमिळनाडु
(१४) उत्कल ओडिसा
(१५) बुद्धभूमी बिहार
(१६) गंगामैयाचा उत्तर प्रदेश
(१७) विंध्यमित्र मध्यप्रदेश
(१८) मराठमोळा महाराष्ट्र
(१९) सीमान्त राज्ये
(२०) केन्द्रशासित प्रदेश


REFBK-0021486


भारतीयत्वाची ओळख व राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव यासाठी आवश्यक वाचन !

**नितीन प्रकाशन : ११८२ सदाशिव पेठ, पुणे ३०**





आपला भारत महान देश आहे.

या भारतात विपुल विविधता आहे.

प्रांत, भाषा, साहित्य, कला, घरदार, रीतीरिवाज, वेषभूषा या सर्वांतच विविधता आहे.

तरीही या सर्व विविधतेत एकच भारतीय आत्मा आहे.

या संपूर्ण भारतवर्षाची ओळख करून देणारी

आपला भारत

ही माला आम्ही प्रकाशित करीत आहोत.

प्रत्येक राज्याची माहिती देणारी स्वतंत्र अशी पुस्तके लिहीत आहेत,

राजा मंगळवेढेकर

नितीन प्रकाशन, पुणे ३०